MSSIDC

महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित

कृपानिधी, ९, वालचंद हिराचंद मार्ग, बॅलार्ड इस्टेट,
मुंबई - ४०० ००१
फोनः (०२२) २२६१११२१-२२२-२३
http://www.mssidc.maharashtra.gov.in

६०वा वार्षिक अहवाल २०२१-२२

लघुउद्योग घटकांना
खालील ग्राहक उपयोगी सेवा पुरविणे

महाकॉयर

- महाराष्ट्र काथ्या निर्मिती, प्रदर्शन आणि प्रशिक्षण केंद्र

कच्चा माल

- गोदाम सुविधा

विपणन साहाय्य

- शासकीय/निमशासकीय संस्थांच्या निविदांमध्ये लघुउद्योग घटकांच्यावतीने सहभाग घेणे.

हस्तव्यवसाय विकास आणि प्रदर्शन

- हस्तकला वस्तूंचे प्रशिक्षण व प्रदर्शन ह्यांचे आयोजन

महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित

कृपानिधी, ९, वालचंद हिराचंद मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१.

दूरध्वनी : (०२२) २२६१११२१-२२-२३

http://www.mssidc.maharashtra.gov.in

६० वा वार्षिक अहवाल
(वर्ष २०२१-२२ दि. २६.०९.२०२५)

कंपनीबाबत माहिती

संचालक मंडळ	श्री. जयदीप कवाडे (दिनांक २९.११.२०२४ पासून)
	श्री. दीपेंद्रसिंह कुशवाह, भा.प्र.से. (दिनांक १६.११.२०२२ पासून)
	डॉ. कुणाल खेमनार, भा.प्र.से. (दिनांक १७.०३.२०२५ पासून)
	श्री. विकास पानसरे, भा.प्र.से. (दिनांक २२.०९.२०२५ पासून)
	श्री. भानुदास पालवे, भा.प्र.से. (दिनांक २३.०५.२०२५ पासून)
	श्रीमती. गीतांजली बाविस्कर, भा.प्र.से. (दिनांक ०६.०३.२०२५ पासून)
	श्री. जगन्नाथ डांगे, माजी (ex) भा.प्र.से. स्वतंत्र संचालक (दिनांक ३०.१२.२०२४ पासून)
व्यवस्थापकीय संचालक	श्री. विकास पानसरे, भा.प्र.से. (दिनांक २२.०९.२०२५ पासून)
संयुक्त व्यवस्थापकीय संचालक	श्रीमती. प्रशाली दिघावकर (दिनांक २१.०५.२०२५ पासून)
मुख्य वित्तीय अधिकारी	श्रीमती. स्मिता खरात (अतिरिक्त कार्यभार) (दिनांक २३.०५.२०२५ पासून)
कंपनी सचिव	श्री. अक्षय पाठक (दिनांक १८.०७.२०२२ पासून)
बँकर्स	स्टेट बँक ऑफ इंडिया
वैधानिक लेखापरीक्षक	अंबावत जैन अँड असोसिएट्स एलएलपी चार्टर्ड अकाउंटंट, मुंबई
नोंदणीकृत कार्यालय	कृपानिधी, ९, वालचंद हीराचंद मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१.

संचालक मंडळाचा अहवाल

प्रति,
सदस्य,
महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादित,
मुंबई.

मंडळाच्यावतीने ३१ मार्च २०२२ रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षित लेखा विवरणपत्रे व त्यावरील वैधानिक लेखा परीक्षकांच्या अहवालासह महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादितचा ६० वा वार्षिक अहवाल सादर करताना या संचालक मंडळाला आनंद होत आहे.

१. वित्तीय निष्कर्ष : संकलित आर्थिक सारांश/ कंपनीची कामगिरी

दिनांक ३१ मार्च २०२२ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षातील वित्तीय प्रपत्र तसेच मागील वर्षाची संबंधित आकडेवारी पुढीलप्रमाणे आहेः

(रक्कम रु. लाखात)

तपशील	२०२१-२२	२०२०-२१
व्याज, घसारा आणि कर वगळता नफा/तोटा	(९५.२८)	९४.६१
वजा: वित्तीय खर्च	६.४७	६.१४
वजा: घसारा आणि कर्जमाफी खर्च	२४.३८	२४.८५
कर पूर्व नफा	(१२६.१३)	६३.६२
कराची तरतूद	–	–
मागील कालवाधीचे उत्पन्न	(१०.३४)	(१०२६.३९)
कर पूर्व नफा/तोटा	(१३६.४७)	(९६२.७७)
चालू कर	–	–
स्थगित कर (मालमत्ता/दायित्व)	(१.९५)	(२.६९)
मागील वर्षातील कर समायोजन	–	–
कर नंतरचा नफा	(१४६.९१)	(९६५.४७)
वजा: प्रस्तावित लाभांश आणि त्यावरील कर	–	–
ताळेबंदातील नेलेली शिल्लक	(१४६.९१)	(९६५.४७)

२. राखीव व अतिरिक्त:

३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा एकूण तोटा रु. १,४६,७०९.०० हा ढोबळ राखीव निधीतून समायोजित करण्यात आला आहे.

३. चालू वर्षातील कंपनीचे कार्याबाबत तसेच भविष्यातील उलाढालीबाबत संक्षिप्त वर्णन:

महामंडळाचे व्यवस्थापक आपणास सूचित करू इच्छितात की आर्थिक वर्ष २०२०-२१ मधील रुपये ९.६५ कोटी तोट्याच्या तुलनेत आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये कंपनीला रुपये १.४६ कोटी तोटा झाला आहे.

४. आर्थिक विवरणपत्रांच्या तारखेनंतरच्या घटना:

महाराष्ट्र शासनाच्या खरेदी धोरणातील मोठ्या बदलामुळे महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळास महसूल निर्मितीचा

मुख्य स्रोत उपलब्ध नाही. त्यामुळे महामंडळास महसूलप्राप्तीमध्ये बाधा आली आहे. निविदा खरेदी प्रक्रियेतही कोणतेही ठोस साहाय्य अस्तित्वात नाही. महाराष्ट्र शासनाने दिनांक २७.१०.२०२२ च्या शासन निर्णयाद्वारे, महाराष्ट्र राज्यात रॅम्प (आरएएमपी) कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादित (एमएसएसआयडीसी लि.) ची राज्य नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती केली.

५. लाभांश:

महामंडळाला आलेल्या तोट्यामुळे, संचालक मंडळ वित्तीय वर्ष २०२१–२२ साठी कोणत्याही लाभांशाची शिफारस करीत नाही.

६. सभा:

वित्तीय वर्षादरम्यान संचालक मंडळाच्या चार सभा झाल्या.

क्र.	तारीख	अनुक्रमांक
१.	११.०६.२०२१	३६४वी मंडळ बैठक
२.	३०.०९.२०२१	३६५वी मंडळ बैठक
३.	१४.१२.२०२१	३६६वी मंडळ बैठक
४.	३०.०३.२०२२	३६७वी मंडळ बैठक

७. संचालक आणि प्रमुख व्यवस्थापकीय कर्मचारी:

वित्तीय वर्ष २०२१–२२ पासून सद्यकालीन संचालकांचे तपशील:

अनु. क्र.	संचालकाचे नाव	पदनाम	नियुक्तीची तारीख	पदमुक्तीची तारीख
१	श्री. हर्षदीप कांबळे, भा.प्र.से.	नामनिर्देशित संचालक	०८.०६.२०१७	३०.०९.२०२२
२	डॉ. मेरी नीलिमा केरकेट्टा, भा.प्र.से.	नामनिर्देशित संचालक	०४.०५.२०१८	०२.०७.२०२१
३	श्री. अविनाश जे. सुभेदार, भा.प्र.से.	नामनिर्देशित संचालक	१०.०५.२०१९	३१.०५.२०२१
४	श्री. प्रवीण दराडे, भा.प्र.से.	व्यवस्थापकीय संचालक	२१.१०.२०२०	३०.०९.२०२२
५	श्रीमती. आस्था लुथरा, भारतीय लेखापरीक्षा आणि लेखा सेवा	नामनिर्देशित संचालक	२६.०२.२०२१	२४.११.२०२२
८	श्रीमती. अंशू सिन्हा, भा.प्र.से.	नामनिर्देशित संचालक	०२.०७.२०२१	०६.०६.२०२३
९	श्री. अभिषेक कृष्णा, भा.प्र.से.	नामनिर्देशित संचालक	२९.०९.२०२१	२२.१०.२०२१
१०	श्री. अजित पाटील, भा.प्र.से.	नामनिर्देशित संचालक	२२.१०.२०२१	२३.०९.२०२२
११	श्री. ए. एस. रंगानायक, भा.प्र.से.	नामनिर्देशित संचालक	२३.०९.२०२२	१६.०३.२०२२
१२	श्री. राजेंद्र निंबाळकर, भा.प्र.से.	व्यवस्थापकीय संचालक	०३.१०.२०२२	२५.०२.२०२५
१३	श्री. दीपेंद्र सिंह कुशवाह, भा.प्र.से.	नामनिर्देशित संचालक	१६.११.२०२२	कार्यरत
१४	श्री. अनिल भंडारी, भा.प्र.से.	नामनिर्देशित संचालक	१६.०३.२०२३	०४.०२.२०२५
१५	श्रीमती. आर. विमला, भा.प्र.से.	नामनिर्देशित संचालक	०७.०७.२०२३	२९.०८.२०२४
१६	श्रीमती. मनीषा वर्मा, भा.प्र.से.	नामनिर्देशित संचालक	०१.०९.२०२३	२९.०१.२०२५
१७	श्रीमती. फरोग मुकादम (अतिरिक्त कार्यभार)	व्यवस्थापकीय संचालक	२५.०२.२०२५	२५.०३.२०२५
१८	श्री. प्रदीप पी., भा.प्र.से.	नामनिर्देशित संचालक	२९.०८.२०२४	३१.१२.२०२४
१९	श्रीमती. गीतांजली बाविस्कर, भा.प्र.से.	नामनिर्देशित संचालक	०६.०३.२०२५	कार्यरत

अनु. क्र.	संचालकाचे नाव	पदनाम	नियुक्तीची तारीख	पदमुक्तीची तारीख
२०	श्री. जयदीप कवाडे	नामनिर्देशित संचालक	२९.११.२०२४	कार्यरत
२१	श्री. कुणाल खेमनार, भा.प्र.से.	नामनिर्देशित संचालक	१७.०३.२०२५	कार्यरत
२२	श्री. जे. पी. डांगे, माजी भा.प्र.से.	स्वतंत्र संचालक	३०.१२.२०२४	कार्यरत
२३	डॉ. निधी पांडे, भा.प्र.से.	व्यवस्थापकीय संचालक	०२.०४.२०२५	२२.०९.२०२५
२४	श्री. भानुदास पालवे, भा.प्र.से.	नामनिर्देशित संचालक	२३.०५.२०२५	कार्यरत
२५	श्री. विकास पानसरे, भा.प्र.से.	व्यवस्थापकीय संचालक	२२.०९.२०२५	कार्यरत

२०२१–२२ पासून सद्यकालीन मुख्य व्यवस्थापकीय अधिकाऱ्यांचे तपशील:

अनु. क्र.	मुख्य व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांचे नाव	पदनाम	नियुक्तीची तारीख	राजीनामा / पदमुक्ती
१	श्री. प्रवीण दराडे, भा.प्र.से.	व्यवस्थापकीय संचालक	२१.१०.२०२०	३०.०९.२०२२
२	श्री. राजेंद्र निंबाळकर, भा.प्र.से.	व्यवस्थापकीय संचालक	०३.१०.२०२२	२५.०२.२०२५
३	डॉ. निधी पांडे, भा.प्र.से.	व्यवस्थापकीय संचालक	०२.०४.२०२५	२२.०९.२०२५
४	श्री. विकास पानसरे	व्यवस्थापकीय संचालक	२२.०९.२०२५	कार्यरत
४	श्रीमती. संध्या पवार	मुख्य वित्त अधिकारी	०१.०६.२०२०	३१.०३.२०२२
५	श्री. विजय कपाटे	मुख्य वित्त अधिकारी	०१.०४.२०२२	३१.१२.२०२४
६	श्रीमती. फरोग मुकादम (अतिरिक्त कार्यभार)	मुख्य वित्त अधिकारी	०१.०१.२०२५	२५.०३.२०२५
७	श्री. सदाशिव सुरवसे (अतिरिक्त कार्यभार)	मुख्य वित्त अधिकारी	२६.०३.२०२५	२८.०४.२०२५
६	श्रीमती. स्मिता खरात	मुख्य वित्त अधिकारी	२२.०५.२०२५	कार्यरत
७	कुश केशरी	कंपनी सचिव	१९.०८.२०१४	०८.०४.२०२२
८	अक्षय पाठक	कंपनी सचिव	१८.०७.२०२२	कार्यरत

८. संचालक नियुक्ती, पारिश्रमिक (मोबदला) आणि कर्तव्यमुक्तीबाबतचे महामंडळाचे धोरण:

कंपनी अधिनियमाच्या कलम १७८(१) च्या तरतुदीनुसार हे महामंडळ शासकीय असल्यामुळे तसेच संचालक हे शासनाने नियुक्त केलेले असल्यामुळे संचालकांचे नामनिर्देशन व पारिश्रमिक या बाबी महामंडळास लागू होत नाहीत. त्यामुळे कंपनीने संचालकांच्या नियुक्तीबाबत, त्यांच्या पारिश्रमिकाबाबत, त्यांच्या अर्हतेबाबत, त्यांच्या श्रेयनिश्चितीबाबत, स्वातंत्र्याबाबत तसेच इतर बाबींसंबंधी कंपनी अधिनियम २०१३, कलम १७८(३) नुसार कोणतीही धोरणनिश्चिती केलेली नाही.

९. स्वतंत्र संचालकांची घोषणा:

महामंडळ हे अधिनियम १९५६ अंतर्गत स्थापन केलेली राज्य शासनाची कंपनी असल्याने; भारतीय कंपनी कायदा २०१३ च्या कलम १४९ च्या तरतुदीनुसार, महामंडळाने कंपनी कायदा २०१३ च्या तरतुदीनुसार स्वतंत्र संचालकांच्या नेमणुकीचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविला आहे. शासनाने ०४.१०.२०२४ रोजी दोन स्वतंत्र संचालकांना नामनिर्देशित केले असून त्यापैकी एका संचालकांनी आपली संमती दिली असल्याने कंपनीद्वारे त्यांची ३०.१२.२०२४ रोजी नियुक्ती करण्यात आली. स्वतंत्र संचालकांनी कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १४९(६) मध्ये तरतूद केल्यानुसार ते स्वतंत्रतेचे निकष पूर्ण करत असल्याचे घोषणापत्र सादर केले आहे.

१०. कंपनीने तिच्या कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी उपक्रमांवर विकसित केलेल्या आणि अमलात आणलेल्या धोरणांची माहिती:

कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी समिती (सीएसआर समिती) ने कंपनीने हाती घेण्याच्या उपक्रमांना दर्शविणारे कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी धोरण (सीएसआर धोरण) तयार करून मंडळाला शिफारस केली असून त्यास मंडळाने मान्यता दिली आहे.

सीएसआर धोरण कंपनीच्या वेबसाइटवर या दुव्याद्वारे उपलब्ध आहे:
https://mssidc.maharashtra.gov.in/Site/
ViewPDFList?doctype=k5uhqtZV9uZiTHbP1VqMVkAOT012hftEOuLwHRcP76bOgK5jeEeEOB
z9nVEtX2ZCciTsQ7Jj_M/fofreaOjW6pTWkwwcUpcIdvVxa55DL7o=

गेल्या ३ वर्षांपासून महामंडळास तोटा होत असल्याने; या आर्थिक वर्षात कोणताही सीएसआर उपक्रम हाती घेण्यात आला नाही.

११. अंतर्गत नियंत्रण प्रणाली पद्धती:

कंपनीची अंतर्गत नियंत्रण प्रणाली कार्यक्षम आणि प्रभावी अंतर्गत लेखापरीक्षकांच्या टीमद्वारे लेखापरीक्षण आणि अनुपालनाची आहे. अंतर्गत लेखापरीक्षक स्वतंत्रपणे अंतर्गत नियंत्रणाचे पुरेसे मूल्यांकन तसेच व्यवहारांचे लेखापरीक्षण करतात. शिवाय, अंतर्गत नियंत्रण प्रणाली मजबूत करण्यासाठी देखील योग्य ते उपाय करण्यात येत आहेत.

१२. नियामकांनी दिलेले महत्त्वाचे आणि भौतिक आदेश:

वर्षादरम्यान नियामक किंवा न्यायालये किंवा न्यायाधिकरणांकडून कंपनीच्या चालू स्थितीवर आणि भविष्यातील कामकाजावर परिणाम

१३. समभाग भांडवलातील बदल:

पुनराविलोकन वर्षात महामंडळाच्या अधिकृत समभाग भांडवलात कोणताही बदल झाला नाही.

१४. वैधानिक लेखापाल:

मेसर्स अंबावत जैन अँड असोसिएट्स, एलएलपी, चार्टर्ड अकाउंटंट, मुंबई यांना सी.ए.जी.कडून आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षक म्हणून नेमण्यात आले होते.

१५. लेखापरीक्षकांच्या अहवालातील पात्रता आणि प्रतिकूल टिप्पण्यांना उत्तर:

जोडपत्र १ पाहावे.

१६. नियंत्रक आणि लेखापरीक्षक जनरल यांचा आढावा :

महामंडळाच्या कार्यपद्धतीबाबत नियंत्रक आणि लेखापरीक्षक जनरल यांच्या टिप्पण्या सदर वार्षिक अहवालामध्ये अंतर्भूत आहेत.

१७. वार्षिक परताव्याबाबतचा सारांश:

कंपनी अधिनियम २०१३ कलम ९२ (३) आणि कंपनी नियम १२(१)(व्यवस्थापन आणि संचालन) २०१४नुसार महामंडळाच्या एमजीटी ९ मधील वार्षिक परताव्याबाबतचा सारांश या वार्षिक अहवालाच्या जोडपत्र २ मध्ये पाहावा.

१८. भाग १८६ नुसार कर्ज, हमी आणि इतर गुंतवणुकांबाबतचे तपशील:

कंपनी अधिनियम २०१३, कलम १८६ नुसार महामंडळाने कुठल्याही कर्ज, गुंतवणूक, किंवा हमी याबाबतची तरतूद केलेली नाही.

१९. अनामत:

अहवाल वर्षामध्ये महामंडळाने कुठलीही अनामत रक्कम स्वीकारली नाही अथवा तिचे नूतनीकरण केलेले नाही.

२०. कर्मचाऱ्यांचे तपशील:

कंपनी अधिनियम ५(२), २०१४ (नियुक्ती आणि व्यवस्थापकीय अधिकाऱ्यांचे पारिश्रमिक) नुसार पारिश्रमिकाची मर्यादा ओलांडली जाईल असे अधिकारी व कर्मचारी महामंडळामध्ये नियुक्त झालेले नाहीत.

२१. संबंधित ठेकेदारांशी केलेले करार याबाबतचे तपशील:

चालू आर्थिक वर्षांमध्ये उपरोक्त प्रकारचे कोणतेही करार करण्यात आलेले नसून महामंडळाच्या सामान्य घडामोंडींमध्येही कोणतेही व्यवहार करण्यात आलेले नाहीत.

२२. दुय्यम कंपनी, संयुक्त उपक्रम आणि सहकारी कंपनीबाबत:

कृपानिधी लिमिटेड ही महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादितची दुय्यम कंपनी आहे. महामंडळाकडे या कंपनीच्या ६२% भागांची मालकी आहे. महामंडळाचा कुठलाही संयुक्त उपक्रम किंवा सहकारी कंपनी नाही.

२३. अफरातफरीबाबतचा अहवाल:

अहवाल वर्षामध्ये व्यवस्थापन मंडळ अथवा लेखापाल यांच्या निदर्शनास कुठल्याही प्रकारची अफरातफर आढळून आली नाही.

२४. कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक शोषणाबाबत प्रतिबंध, निर्बंध आणि निवारण अधिनियम, २०१३ अंतर्गत प्रकटीकरण:

महामंडळाच्या अंतर्गत स्त्रियांच्या लैंगिक शोषणाबाबतची तक्रार दखल घेण्यासाठी (प्रतिबंध, निर्बंध व निवारण अधिनियम, २०१३ नियमानुसार) एक समिती स्थापन करण्यात आली असून चालू आर्थिक वर्षामध्ये (२०१९-२०) अशा प्रकारची कोणतीही तक्रार दाखल करण्यात आलेली नाही.

२५. इंधन बचत, तांत्रिक देवाण घेवाण, परकीय चलन व खर्च:

निरंक.

२६. गुंतवणूकदार प्रशिक्षण आणि सुरक्षा फंडामध्ये निधीचे हस्तांतरण:

गेल्या सात वर्षांपासून महामंडळाचा कुठल्याही प्रकारचा निधी शिल्लक अथवा बेवारस पडून राहिलेला नाही. त्यामुळे गुंतवणूकदार प्रशिक्षण आणि सुरक्षा फंडामध्ये (आयइपीएफ) महामंडळातर्फे असा निधी वळविण्यात आलेला नाही.

२७. संचालकांच्या जबाबदारीबाबतचे निवेदन:

कंपनी अधिनियम, २०१३ कलम १३४ पोटकलम (३) खंड (सी) नुसार आवश्यक असलेल्या संचालकांच्या जबाबदारीबाबतचे निवेदन याद्वारे मान्य करण्यात येत आहे.

अ) महत्त्वाच्या विक्रीशी संबंधित वार्षिक लेखे तयार करताना लागू असलेली लेखांकन मानके योग्य त्या स्पष्टीकरणासह पाळण्यात आलेली आहेत.

संचालकांनी योग्य लेखांकन पद्धती निवडून त्या नियमितपणे व काटेकोरपणे अंमलात आणल्या जेणेकरून कंपनीच्या वर्षभराच्या कारभाराबाबत तसेच आर्थिक वर्षअखेर होणाऱ्या नफ्याबाबत सत्य व यथार्थ चित्र समोर येईल.

ब) कंपनी कायद्यातील तरतुदीनुसार कंपनीच्या मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी, लबाडी व इतर अनियमितता इत्यादींचा शोध घेण्यासाठी व त्याला आळा घालण्यासाठी संचालकांनी आवश्यक ते लेखे अभिलेख ठेवण्यासाठी योग्य व पुरेशी काळजी घेतली आहे.

क)संचालकांनी सद्यपरिस्थितीशी संबंधित आधारांवर वार्षिक लेखे तयार केले आहेत.

ड) संचालकांनी महामंडळास लागू असलेल्या सर्व कायद्यांबाबत तसेच तरतूदींबाबतची पूर्तता करण्यासाठी योग्य ती यंत्रणा उभारली असून ती महामंडळाचे कामकाज सुरळीतपणे पार पडण्यासाठी परिणामकारक आहे.

२८. श्रेयनिर्देश:

संचालक मंडळ चालू वर्षात बँका आणि वित्तीय संस्था यांनी दिलेल्या अमूल्य सेवांची आणि विविध शासकीय विभाग, पुरवठादार, ग्राहक आणि सभासद, रीटेलर्स व वितरक यांच्या सहकार्याची कृतज्ञतापूर्वक नोंद घेत आहेत.

तसेच संचालक मंडळ महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी दिलेल्या कौतुकास्पद सेवेबाबतची आपल्या दप्तरी नोंद घेत आहे

तसेच पुढेही असेच सहकार्य मिळत राहील अशी आशा व्यक्त करीत आहे.

संचालक मंडळाच्या वतीने व करिता

सही/-	**सही/-**
व्यवस्थापकीय संचालक	**संचालक**
DIN : 11317828	DIN : 10741883

स्थळ : मुंबई
दिनांक : २६.०९.२०२५

जोडपत्र – २

नमुना क्र. एमजीटी – ९

वार्षिक परताव्याचा गोषवारा
दि. ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी

कंपनी अधिनियम २०१३ कलम ९२ (३) आणि कंपनी नियम १२ (१)
(व्यवस्थापन आणि प्रशासन), २०१४ नुसार

१. नोंदणी विषयक आणि इतर तपशील :

i.	**सीआयएन :**	**यू७४९९९एमएच१९६२एसजीसी०१२५०१**
ii.	नोंदणीची तारीख	**१९/१०/१९६२**
iii.	कंपनीचे नाव	**महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित**
iv.	कंपनीचा प्रकार/ उपप्रकार	**शेअर्सद्वारे मर्यादित/सरकारी कंपनी**
v	**कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता व संपर्काचा तपशील:**	**कृपानिधी, ९, वालचंद हिराचंद मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई, महाराष्ट्र – ४०० ००१.**
vi.	**प्रमुख शेअर बाजारांच्या सूचींमध्ये कंपनीचे समभाग अंतर्भूत आहेत का?**	**नाही**
vii.	स्थानांतरण नोंदणीदार/दलालाचे नाव, पत्ता, फोन नं	**लागू नाही**

२. महामंडळाचा प्रमुख उद्योग :

महामंडळाच्या एकूण आर्थिक उलाढालींमध्ये १०% हून अधिक योगदान असणारे उद्योग येथे दर्शविले जातील :–

अ. क्र.	प्रमुख उत्पादने/सेवा	एनआयसी कोड	एकूण उलाढालीमधील अंशदानाची टक्केवारी
१	किरकोळ व्यापार	जी	१००%

धारक, दुय्यम आणि सहयोगी कंपनीचा तपशील :

अ. क्र.	कंपनीचे नाव आणि पत्ता	सीआयएन/जीएलएन	धारक/ दुय्यम/ सहयोगी	घेतलेल्या समभागांची टक्केवारी	लागू असलेले कलम
१.	कृपानिधी लिमिटेड	यू७०१०१एमएच१९६४एसजीसी०१३०७८	दुय्यम	६२%	२(८७)

३. भाग धारण नमुना (एकूण साधारण समभागांचे विभाजन केले असता समभाग भांडवलाची टक्केवारी) :

i. श्रेणीनुसार भागधारण

भागधारकांची श्रेणी	वर्षारंभी घेतलेल्या शेअर्सची संख्या				वर्षाअखेर घेतलेल्या शेअर्सची संख्या				वर्षादरम्यान टक्केवारीतील बदल
	डीमॅट	वास्तविक	एकूण	% चा एकूण भाग	डीमॅट	वास्तविक	एकूण	% चा एकूण भाग	
अ. प्रवर्तक									
१) भारतीय									
अ) वैयक्तिक/हिंदू अविभक्त कुटुंब	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	०.०००१ ४ प्रतिनिधी बदलले गेले
ब) केंद्र शासन	निरंक	१०,०००	१०,०००	०.६८९	निरंक	१०,०००	१०,०००	०.६८९	
क) राज्य शासन	निरंक	१४,४०,०९३	१४,४०,०९३	९९.३१०	निरंक	१४,४०,०९३	१४,४०,०९३	९९.९९९	
ड) मंडळे व महामंडळे	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	
इ) बँक/वित्तीय संस्था	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	
एफ) इतर कोणतेही जी) (महाराष्ट्र शासनाचे नॉमिनी)	निरंक	६	६	०.००१	निरंक	६	६	०.०००१	
दुय्यम बेरीज (अ)(१)	निरंक	१४,५०,०९९	१४,५०,०९९	१००	निरंक	१४,५०,०९९	१४,५०,०९९	१००	
२) **परकीय**	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	
अ) एनआरआय – वैयक्तिक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	
ब) इतर वैयक्तिक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	
क) मंडळ व महामंडळ	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	
ड) बँक/वित्तीय संस्था	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	
इ) इतर सर्व	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	
दुय्यम बेरीज (अ)(२)	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	
ब. सार्वजनिक भागधारण									

भागधारकांची श्रेणी	वर्षारंभी घेतलेल्या शेअर्सची संख्या				वर्षाअखेर घेतलेल्या शेअर्सची संख्या				वर्षादरम्यान टक्केवारीतील बदल
	डीमॅट	वास्तविक	एकूण	% चा एकूण भाग	डीमॅट	वास्तविक	एकूण	% चा एकूण भाग	
१) संस्था									
ए) म्युच्युअल फंड	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	
बी) बँक/वित्तीय संस्था	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	
सी) केंद्र शासन	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	
डी) राज्य शासन	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	
इ) उपक्रम भांडवल निधी	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	
एफ) विमा मंडळ	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	
जी) वित्तीय संस्था	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	
एच) विदेशी उपक्रम भांडवल निधी	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	
आय) इतर (विनिर्दिष्ट)	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	
दुय्यम बेरीज (ब) (१)	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	
२) संस्थेतर									
अ) मंडळ व महामंडळ i) भारतीय ii) विदेशी	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	
ब) वैयक्तिक									बदल नाही
i) वैयक्तिक भागधारकांनी धारण केलेले रु. १ लाखापर्यंतचे नाममात्र भागभांडवल	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	
ii) वैयक्तिक भागधारकांनी धारण केलेले रु. १ लाखाहून अधिक नाममात्र भागभांडवल	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	
क) इतर (विनिर्दिष्ट)	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	
दुय्यम बेरीज (ब) (२)	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	
एकूण सार्वजनिक भागधारण (ब)=(ब)(१)+(ब)(२)	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	
क. ताबाधारकांकडील भागभांडवल जीडीआरएस आणि एडीआरएस अंतर्गत	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक	
एकूण (अ+ब+क)	निरंक	१४,५०,०९९	१४,५०,०९९	१००	निरंक	१४,५०,०९९	१४,५०,०९९	१००	बदल नाही

(ii) प्रवर्तकांची भागधारणा

अ. क्र.	भागधारकाचे नाव	वर्षारंभी असलेली भागधारणा			वर्षाअखेरीस असलेली भागधारणा			वर्षादरम्यान टक्केवारीतील बदल
		समभागांची संख्या	कंपनीच्या एकूण समभागांपैकी %	एकूण समभागांपैकी तारण दिलेल्या समभागांचे %	समभागांची संख्या	कंपनीच्या एकूण समभागांपैकी %	एकूण समभागांपैकी तारण दिलेल्या समभागांचे %	
१.	महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने डॉ. नामदेव भोसले	१४,४०,०९३	९९.३०	०	१४,४०,०९३	९९.३०	०	०
२.	राज्य व्यापारी महामंडळ	१०,०००	०.६८	०	१०,०००	०.६८	०	०
३.	श्री.किरण जाधव	०१	०.०००००६	०	०१	०.०००००६	०	०
४.	श्री. विनोद मेंढे	०१	०.०००००६	०	०१	०.०००००६	०	०
५..	श्रीमती कविता पवार	०१	०.०००००६	०	०१	०.०००००६	०	०
६.	श्री. अनिल कुमार	०१	०.०००००६	०	०१	०.०००००६	०	०
७.	सौ.दिपाली पाटीले	०१	०.०००००६	०	०१	०.०००००६	०	०
८.	श्रीम. एस.एस. रसम	०१	०.०००००६	०	०१	०.०००००६	०	०
एकूण		**१४,५०,०९९**	**१००**	**०**	**१४,५०,०९९**	**१००**	**०**	**०**

* भागधारक ३ ते ८ हे महाराष्ट्र शासनाचे प्रतिनिधी आहेत व सरकारच्या वीज, कामगार, उद्योग विभागात मंत्रालय, मुंबई ४०००३२ येथे नोकरी करत आहेत.

iii. प्रवर्तकांच्या भागधारणेतील बदल (बदल नसल्यास कृपया स्पष्ट करा)

२०२१-२२ या आर्थिक वर्षात प्रवर्तकांच्या भागधारणेत कुठलाही बदल नाही.

iv. ऋणग्रस्तता

उपार्जित वा थकबाकीच्या रकमेवरील व्याज असे कुठलेही देणे थकलेले नाही.

	अनामत रकमेव्यतिरिक्त सुरक्षित कर्ज	असुरक्षित कर्ज	अनामत रक्कम	एकूण ऋणग्रस्तता
आर्थिक वर्षारंभी असलेली ऋणग्रस्तता				
i) मुद्दलाची रक्कम	निरंक	निरंक	निरंक	निरंक
ii) देय असलेले पण न दिलेले व्याज	निरंक	निरंक	निरंक	निरंक

	अनामत रकमेव्यतिरिक्त सुरक्षित कर्ज	असुरक्षित कर्ज	अनामत रक्कम	एकूण ऋणग्रस्तता
iii) उपार्जित असलेले पण देय नसलेले व्याज	निरंक	निरंक	निरंक	निरंक
एकूण (i+ii+iii)	**निरंक**	**निरंक**	**निरंक**	**निरंक**
आर्थिक वर्षातील ऋणग्रस्ततेतील बदल				
i) वाढ	निरंक	निरंक	निरंक	निरंक
ii) घट	निरंक	निरंक	निरंक	निरंक
निव्वळ बदल	**निरंक**	**निरंक**	**निरंक**	**निरंक**
आर्थिक वर्षाअखेरीस झालेला बदल १. मुद्दलाची रक्कम २. देय असलेले पण न दिलेले व्याज ३. उपार्जित असलेले पण देय नसलेले व्याज	निरंक	निरंक	निरंक	निरंक
एकूण (i+ii+iii)	निरंक	निरंक	निरंक	निरंक

V. संचालक तसेच प्रमुख व्यवस्थापकीय अधिकाऱ्यांचे पारिश्रमिक

अ) व्यवस्थापकीय संचालक, पूर्ण वेळ संचालक, आणि/किंवा अव्यवस्थापकीय अधिकाऱ्यांचे मानधन

अ. क्र.	परिश्रमिकाचा तपशील	व्यवस्थापकीय संचालकांचे नाव	एकूण रक्कम
		श्री. प्रवीण दराडे, भाप्रसे	
१.	ढोबळ वेतन		
	अ. आयकर अधिनियम, १९६१ कलम १७(१) नुसार वेतनासाठी तरतूद	३३,१५,८९१/-	३३,१५,८९१/-
	ब. आयकर अधिनियम, १९६१ कलम १७(२) नुसार इतर भत्त्यांचे मूल्य	निरंक	निरंक
	क. आयकर अधिनियम, १९६१ कलम १७(३) नुसार वेतनाऐवजी नफा	निरंक	निरंक
२.	भागरूपी विकल्प (स्टॉक ऑप्शन)	निरंक	निरंक
३.	भागधारकांचा परिश्रम हिस्सा (स्वेट इक्विटी)	निरंक	निरंक
४.	अडत - नफ्यामधील टक्केवारी - इतर, विनिर्दिष्ट...	निरंक	निरंक
५.	इतर, कृपया विनिर्दिष्ट करावे	निरंक	निरंक
६.	एकूण (अ)	३३,१५,८९१/-	३३,१५,८९१/-
	कायद्यानुसार कमाल मर्यादा		

ब) इतर संचालकांचे मानधन :

अ.क्र.	मानधनाचा तपशील	व्यवस्थापकीय संचालक/संचालक/डब्ल्यू-टीडी				एकूण
	स्वतंत्र संचालक					
	• मंडळाच्या समिती बैठकांची फी	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक
	• अडत	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक
	• इतर (कृपया स्पष्ट करा)	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक
	एकूण (१)	**निरंक**	**निरंक**	**निरंक**	**निरंक**	**निरंक**
	इतर अ-कार्यकारी संचालक					
	• मंडळाच्या समिती बैठकांची फी	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक
	• अडत	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक
	• इतर(कृपया स्पष्ट करा)	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक
	एकूण (२)	**निरंक**	**निरंक**	**निरंक**	**निरंक**	**निरंक**
	एकूण (ब)=(१+२)	**निरंक**	**निरंक**	**निरंक**	**निरंक**	**निरंक**
	व्यवस्थापकांचे एकूण मानधन	निरंक	निरंक	निरंक	निरंक	निरंक
	कायद्यानुसार कमाल मर्यादा					

क) व्यवस्थापकीय संचालक/संचालक/डब्ल्यूटीडी यांव्यतिरिक्त इतर प्रमुख व्यवस्थापकीय अधिकाऱ्यांचे मानधन:

क्र.	तपशील	प्रमुख व्यवस्थापकीय अधिकारी			
		मुख्य कार्यकारी अधिकारी	मुख्य वित्त अधिकारी श्रीम. संध्या पवार	कंपनी सचिव	एकूण
१.	ढोबळ वेतन				
	अ) आयकर अधिनियम, १९६१ कलम १७(१) नुसार वेतनासाठी तरतूद		१७,०५,४१०/-	७,९९,९०४/-	२५,०५,३१४/-
	ब) आयकर अधिनियम, १९६१ कलम १७ (२) नुसार इतर भत्त्यांचे मूल्य		लागू नाही	लागू नाही	
	क) आयकर अधिनियम, १९६१ कलम १७ (३) नुसार वेतनाऐवजी नफा		लागू नाही	लागू नाही	
२.	स्टॉक ऑप्शन		लागू नाही	लागू नाही	लागू नाही
३.	स्वेट इक्विटी		लागू नाही	लागू नाही	लागू नाही
४.	अडत				लागू नाही
	- नफ्यामधील टक्केवारी		लागू नाही	लागू नाही	
	- इतर, विनिर्दिष्ट		लागू नाही	लागू नाही	
५.	इतर, कृपया विनिर्दिष्ट करावे		लागू नाही	लागू नाही	
६.	**एकूण**		१७,०५,४१०/-	७,९९,९०४/-	२५,०५,३१४/-

VI. दंड, शिक्षा, सामोपचाराने अपराधाचा निकाल

प्रकार	कंपनी नियमातील भाग	संक्षिप्त वर्णन	दंड, शिक्षा, सामोपचाराने अपराधाच्या निकालाचा तपशील	आर. डी, न्यायालय, एन सी एल टी यांचा अधिकार	अपील (केले असल्यास)
अ. कंपनी					
दंड	लागू नाही	लागू नाही	लागू नाही	लागू नाही	लागू नाही
शिक्षा	लागू नाही	लागू नाही	लागू नाही	लागू नाही	लागू नाही
सामोपचाराने अपराधाचा निकाल	लागू नाही	लागू नाही	लागू नाही	लागू नाही	लागू नाही
ब. संचालक					
दंड	लागू नाही	लागू नाही	लागू नाही	लागू नाही	लागू नाही
शिक्षा	लागू नाही	लागू नाही	लागू नाही	लागू नाही	लागू नाही
सामोपचाराने अपराधाचा निकाल	लागू नाही	लागू नाही	लागू नाही	लागू नाही	लागू नाही
क. इतर कसूरदार अधिकारी					
दंड	लागू नाही	लागू नाही	लागू नाही	लागू नाही	लागू नाही
शिक्षा	लागू नाही	लागू नाही	लागू नाही	लागू नाही	लागू नाही
सामोपचाराने अपराधाचा निकाल	लागू नाही	लागू नाही	लागू नाही	लागू नाही	लागू नाही

नामनिर्देशित व्यक्तिंच्या नावामधील बदल :

११.०८.२०२१	ईएफ–२१	श्रीम. कविता पवार	३	इक्विटी	१	८८६२९	१००/–	ईएफ–२७	श्रीम. सुनिता हजारी	११.०८.२०२१
११.०८.२०२१	ईएफ–२०	श्री. अनिल कुमार उगले	२	इक्विटी	१	९९९९	१००/–	ईएफ–२३	श्री. शशिकांत साळुंके	११.०८.२०२१

संचालक मंडळाच्यावतीने व करिता

सही/–
व्यवस्थापकीय संचालक
DIN: 11317828

सही/–
संचालक
DIN: 10741883

स्थळ : मुंबई
दिनांक : २६.०९.२०२५

अंबावत जैन आणि असोसिएट्स
सनदी लेखापाल

Registered with Limited Liability under The Limited Liability Partnership Act, 2008 with Registration No. AAA - 7120
Regd. Office: Office No. 40, Morarji Velji Bldg, 1st floor, 9/15, Dr. M.B. Velkar Street, Marine Lines (East), Mumbai – 400002.
Tel: +91 22 43153000 **Fax:** +91 22 43153015. **email:** aja@ajallp.com. Website: www.ajallp.com

स्वतंत्र लेखापालांचा संकलित आर्थिक विवरणाबाबतचा अहवाल

प्रति,
महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादितचे सभासद

एकत्रित वित्तीय विवरणाबाबतचा अहवाल :

प्रतिकूल मत

आम्ही, सोबत जोडलेल्या महाराष्ट्र लघुउद्योग महामंडळाच्या (यापुढे धारक कंपनी असे संबोधले असून) तसेच महामंडळाच्या दुय्यम उपक्रमांच्या (यापुढे धारक कंपनी आणि तिचे दुय्यम उपक्रम यांना एकत्रितपणे 'समूह' असे संबोधले असून) दिनांक ३१ मार्च २०२२ रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षाचा एकत्रित ताळेबंद तसेच त्याच आर्थिक वर्षाच्या नफा–तोटा व रोख ओघ विवरणपत्रांचे तसेच वैशिष्ट्यपूर्ण लेखा पद्धतीचा सारांश आणि स्पष्टीकरणात्मक माहितीचे लेखा परीक्षण केले आहे.

आमच्या मते, प्रतिकूल मताच्या परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या बाबींच्या महत्त्वानुरूप संकलित आर्थिक विवरणपत्रांवरून कंपनी अधिनियम, २०१३ नुसार योग्य ती माहिती प्राप्त होत नाही. त्यामुळे दिनांक ३१ मार्च २०२२ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षातील भारतात सर्वसाधारणपणे स्वीकारलेल्या लेखा तत्त्वानुसार कंपनीच्या महामंडळाच्या कामकाजाचे, नफा तोटा ताळेबंदाबाबतचे आणि रोख ओघ विवरणपत्राबाबत त्याच दिनांकास समाप्त होणाऱ्या वर्षातील रोख ओघाच्या पुष्टीबाबतचे सत्य व यथार्थ चित्रण देता येत नाही.

प्रतिकूल मताकरिता आधार

खालील **परिच्छेद १ ते १०** मध्ये दर्शविण्यात आलेल्या बाबींकडे आम्ही आपले लक्ष वेधू इच्छितो. या बाबी महत्त्वाच्या असून त्यांचा स्वतंत्र वित्तीय लेख्यांवरील परिणाम (निर्धारित मात्रेत किंवा त्याखेरीज) पृथक् अथवा एकत्रितरित्या, काही प्रकरणांमध्ये पुरेशा आणि योग्य लेखापरीक्षणात्मक पुरावे प्राप्त करण्याच्या अक्षमतेमुळे अनभिज्ञात राहिला आहे.

१. न जुळलेली शिल्लक आणि वर्गीकरण व त्याचे सादरीकरण

अ) विविध सामान्य खातेवह्या दीर्घकालीन/मेळ न घातलेल्या आहेत तसेच विविध खातेवह्यांची अदलाबदल झालेली असल्यामुळे शिल्लक रकमा चुकीच्या दर्शविल्या जात आहेत. मेळ घातलेला नसल्यामुळे आम्ही या शिल्लक रकमांच्या अचूकतेवर भाष्य करण्यास असमर्थ आहोत.
मेळ न घातला जाण्याचा तसेच जमाबंदी न केल्याचा वरील खात्यांमध्ये दिसत असलेल्या जुन्या शिल्लक रकमांवर जो परिणाम झालेला असेल किंवा जुन्या शिल्लक रकमा पूर्णतः किंवा अंशतः वसूली झाली नसल्याने किंवा पुरांकित केल्यामुळे उद्भवलेल्या संभाव्य लाभ/तोट्याची खात्री देता येत नाही.

ब) आवश्यक माहिती/तपशिलांच्या अभावामुळे आम्ही मालमत्ता आणि दायित्वांचे वर्गीकरण आणि त्यांची चालू आणि मागील काळातील दुभागणी लेखा मानकांशी सुसंगत आहे की नाही यावर टिप्पणी करण्यास असमर्थ आहोत.

क) स्वतंत्र वित्तीय विवरणपत्रांतील टीप क्र. J निदर्शनास आणू इच्छितो. यामध्ये रु. ३५.८६ कोटी

(वित्तीय वर्ष २०–२१ – ३६.१३ कोटी) 'इतरांना देय' म्हणून दर्शविलेले आहेत परंतु ती रक्कम चालू काळातील व्यापारी देण्यांतर्गत समाविष्ट करण्यात आली आहे. या रकमेचे पक्षनिहाय तपशील आणि शिल्लक पुष्टीकरण प्रमाणपत्र आम्हाला पडताळणीसाठी देण्यात आलेले नाही. परिणामी, आम्ही प्रस्तुत वर्षाच्या लेखापरीक्षणासाठी महामंडळाच्या स्वतंत्र वित्तीय विवरणपत्रातील दायित्वे आणि परिणामस्वरूप बोजावर, काही असल्यास, भाष्य करण्यास असमर्थ आहोत.

२. **बाह्य बाकी पुष्टीकरण/समायोजन**

स्वतंत्र वित्तीय विवरणपत्रातील टीप क्र. ७, १६ आणि १८ याकडे लक्ष वेधू इच्छितो. कर्ज आणि अग्रीमाची शिल्लक, इतर विविध नावे/जमा बाकी आणि सरकारकडून देय रक्कम यांचे पुष्टीकरण, सामंजस्य आणि त्यातील परिणामरूप समायोजनांच्या अधीन आहेत. महामंडळाद्वारे त्रयस्थ पक्ष शेष मिळवणी पुष्टीकरण प्रणालीचे पालन केले जात नाही. लेखापुस्तकांमध्ये बाकी रकमेसाठी लेखामानक ५०५ नुसार बाह्य पुष्टीकरण मिळविण्यासाठी आमच्यासाठी संवाद तपशील उपलब्ध नव्हते. योग्य नोंदी/संवाद तपशीलांच्या अनुपस्थितीत, आम्ही लेखापुस्तकांमध्ये बाकी रकमांच्या अचूकतेवर भाष्य करण्यास असमर्थ आहोत.

३. गोदाम आणि कार्यालयीन भाडे या शीर्षकाखालील मिळण्यायोग्य रकमेच्या विविध खात्यांचा ताळमेळ बसलेला नाही. त्यामुळे आम्ही गोदाम भाडे प्राप्त आणि प्राप्त करण्यायोग्य आणि अदा केलेले आणि देय असलेले भाडे यासंबंधीच्या लेखापुस्तकांमध्ये असलेल्या रकमांच्या अचूकतेवर भाष्य करता येत नाही. वसुलीयोग्य भाड्याची एकूण रक्कम ९,४७,८९,५११ आहे, ज्यापैकी ५,८१,३५,०४१ ही रक्कम न्यायप्रविष्ट (कायदेशीर वादात) आहे.

४. महामंडळाने आयसीएआयद्वारे जारी केलेल्या काही लेखा मानकांचे पूर्णपणे पालन केले नाही. त्यांची तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे आहे:

(अ) महामंडळ मालाच्या खरेदी–विक्रीची नोंद ही विक्रेता खरेदीदाराला मोबदला म्हणून माल हस्तांतरित करतो त्यावेळी न करता पुरवठादाराच्या बिलाच्या आधारे करते. हा व्यवहार लेखा मानक–९ महसूली जमा यास सुसंगत नाही. त्यामुळे ह्या वर्षी कंपनीच्यावतीने करण्यात आलेल्या खरेदी विक्रीच्या व्यवहाराचे अयोग्य चित्र दिसून येते. वटावामुळे प्राप्त होणारे उत्पन्न हे विक्रीच्या लेखांकनाच्या वेळी नोंदण्यात येते. विक्रीची नोंद ही लेखा मानक–९ शी सुसंगत नसल्यामुळे वटावातील विक्रीचे समायोजन हे लेखा मानक–५ शी सुसंगत असायला हवे – त्या काळातील निव्वळ नफा वा तोटा, पूर्व कालावधीतील बाबी तसेच लेखे धोरणातील बदल. यामुळे वर्षभरातील नफा व तोटा दर्शवित असलेल्या आर्थिक ताळेबंदात त्याचे विवरण योग्य प्रकारे आलेले नाही. धारक कंपनीने लेखा मानक ९ व लेखा मानक ५ यांचे योग्यरित्या पालन केलेले आढळून आले नाही. त्यामुळे ह्या दोहोंच्या एकत्रित परिणामाचे मापन करता आलेले नाही.

५. इतर बाबी

(अ) एकत्रित वित्तीय विवरणपत्राच्या टीप क्र. ७ कडे आम्ही आपले लक्ष वेधू इच्छितो. यामध्ये धनकोंचे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) कायद्यांतर्गत वर्गीकरण न करणे आणि त्यांना आरबीआयद्वारे अधिसूचित केलेल्या दराच्या तिप्पट दराने ४५ दिवसांपेक्षा जास्त देय असलेल्या व्याजाची तरतूद करणे या बाबी येतात. या खात्यांमधील दायित्वांचे, काही असल्यास, महामंडळाने परिमाण केलेले नाही. त्यामुळे, आम्ही त्याअंतर्गत व्याजाची तरतूद (जर असेल तर) आणि लेखापरीक्षणाखालील वर्षाच्या नफ्यावर त्याचा योग्य परिणाम निश्चित करण्यात असमर्थ आहोत. एमएसएमईडी पक्षांचे निर्धारण झालेले नसल्यामुळे, संबंधित कायद्यानुसार आवश्यक असलेले खुलासे महामंडळाने केले नाहीत.

(ब) आमच्या लेखापरीक्षणादरम्यान आम्ही केलेल्या तपासण्यांच्या आधारे लेखा विकेंद्रित केलेल्या लेखाशी संबंधित काही प्रणाली/नियंत्रण समस्या आढळून आल्या ज्यामुळे लेखासंबंधी त्रुटी निर्माण झाल्या आहेत. उदा. ऋण सूची, अपुऱ्या वजावटीची नोंद, लेखाप्रणाली (टॅली ईआरपी) मध्ये मागील दिनांकित नोंदी.

६. खाली नमूद केलेल्या असुरक्षित किंवा बिनव्याजी कर्जावर, देय असलेल्या व्याजाची सन २००७-८ करिता लेखापुस्तकात तरतूद करण्यात आलेली नाही.

खात्याचे नाव	**थकबाकी रक्कम (रु.)**
उद्योग व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन सुशिक्षित बेरोजगार कर्ज योजना	०.१३ कोटी
उद्योग व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन बीज भांडवल योजना (३.५ टक्के)	०.६४ कोटी

(एकत्रित वित्तीय विवरणांच्या नोंद ५ नुसार)

७. महामंडळाची अंतर्गत नियंत्रण यंत्रणा कमकुवत आहे आणि ती महामंडळाच्या व्यवसायाच्या आकारमानाशी आणि व्याप्तीशी सुसंगत नाही. प्रणाली विविध स्तरांवर फसवणूक, फेरफार आणि गैरव्यवहारास देखील संवेदनक्षम आहे. शिवाय महामंडळाच्या कामकाजाची कोणतीही प्रमाणित कार्यपद्धती नाही.

८. तरतूद

कंपनीच्या व्यवस्थापनाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार महामंडळाच्या व्यापार प्राप्तीची असुरक्षित येणी रु. ४६.५० कोटी आहेत आणि देय व्यापार नावे बाकी रक्कम रु. ५.६१ कोटी आहे व ती तीन वर्षांहून अधिक कालावधीच्या समायोजनासाठी प्रलंबित आहे. त्याच्या तुलनेत अवघी रु. ४.९६ कोटी एवढीच रक्कम परत मिळणे अपेक्षित आहे. त्यामुळे रु. ४१.७२ कोटी एवढ्या रकमेची अल्पतरतूद करण्यात आली आहे. (लेखे टीप १६ पहा). न्यायप्रविष्ट (कायदेशीर वादात) व्यापारी प्राप्य (व्यापारी येणे) रुपये २१.१० कोटी एवढे आहे.

९. महामंडळाने आपल्या हिशोबाच्या पुस्तकांमध्ये उपदान दायित्व (ग्रॅच्युइटी) आणि रजा रोखीकरण (लीव्ह एनकॅशमेंट) यासाठी अनुक्रमे रु. ८,०३,३६,०७५ आणि रु. १,८९,७३,२०६ अशी नोंद केली आहे. विमा गणितीय मूल्यमापन अहवालानुसार (ॲक्च्युरिअल व्हॅल्यूएशन रिपोर्ट) उपदान दायित्व आणि रजा रोखीकरण अनुक्रमे रु. ५,०२,५०,०५५ आणि रु. १,७२,२७,३१५ इतके आहे. हिशोबाच्या पुस्तकातील आकडेवारी आणि मूल्यमापन अहवालातील आकडेवारी यामध्ये उपदान दायित्व तसेच एलआयसी ग्रॅच्युइटी फंड विवरणांबाबत ताळमेळ न बसणारे फरक आहेत.

१०. कंपनीने आपल्या वस्तुसूचीचे (इन्व्हेंटरीज) मूल्यमापन 'लेखा मानक २ – वस्तुसूचीचे मूल्यमापन' (एएस २) नुसार केलेले नाही. कंपनीने यासाठी निर्धारित तत्त्वांचा वापर केला नाही, तसेच ३१ मार्च २०२२ रोजीची मूळ किंमत किंवा निव्वळ वसुलीयोग्य मूल्य निश्चित करण्यासाठी कोणत्याही मूल्यमापकाची (व्हॅल्यूअर) नियुक्तीही केली नाही. या मूल्यमापनाच्या अभावामुळे, या नियमांचे पालन न केल्याचा मालमत्ता साठा, नफा किंवा तोटा आणि संबंधित खुलाशांवर नेमका काय परिणाम झाला आहे, हे ठरवण्यास आम्ही असमर्थ आहोत. ३१ मार्च २०२२ रोजीचा मालमत्ता साठा मूळ किमतीनुसार रु. ७१.९८ लाख नोंदवला गेला आहे.

इतर बाबी :

१. धारक कंपनीच्या दुय्यम उपक्रम/ कंपनीच्या एकत्रित वित्तीय विवरणपत्रांमध्ये दर्शविल्याप्रमाणे दुय्यम कंपनीची एकूण मत्ता ही दिनांक ३१ मार्च २०२२ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षानुसार रु. २,५५,०१,८६२ एवढी असून एकूण महसूल आणि खर्च रु. ४५,९५,६८८/- आणि रु. ४५,९५,६८८/- एवढा दर्शविण्यात आला आहे. परंतु हे लेखा परीक्षण आम्ही केले नाही. व्यवस्थापनाने या संदर्भात आम्हाला इतर लेखापरीक्षकांनी केलेल्या लेखा परीक्षणाचे अहवाल पुरविले असून या दुय्यम कंपनीच्या संकलित वित्तीय विवरणपत्रांबाबत; त्यामध्ये नमूद केलेल्या सर्व रकमा आणि त्यांचे प्रकटीकरण, त्याबाबतचे कंपनी अधिनियमाच्या कलम १४३ व पोटकलम (३) आणि (११) नुसार; आमचे मत हे संपूर्णपणे इतर लेखापरीक्षकांच्या अहवालावर अवलंबून आहे.

२. लेखे टिप्पण्या क्र ४, ५, ६, ७, ८, १२, १३, १५, १७, १८ आणि १९ कडे आम्ही आपले लक्ष वेधू इच्छितो.

३. महामंडळाची ठाणे येथे मालमत्ता आहे परंतु त्यावर भाडेकरूंनी ताबा घेतला आहे. त्याचा कायदेशीर वाद सुरू आहे. तसेच वैध भाडे करार नसल्यामुळे भाड्याने मिळणाऱ्या उत्पन्नाची माहिती महामंडळाच्या हिशोबाशी पडताळणी करता येत नाही.

४. प्रलंबित विक्री कर, सेवा कर तसेच कामकाज करार कर (वर्क कॉन्ट्रॅक्ट टॅक्स) यांचे मूल्यमापन, इतर कायदेविषयक प्रकरणे, आकस्मिक दायित्वे यांबाबतची खात्रीलायक माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे अनेक वर्षे अपीलीय प्राधिकरणांकडे प्रलंबित असलेल्या या प्रकरणांबाबतची विद्यमान स्थिती समजून येत नाही. त्यामुळे त्यांचे विशिष्ट परिणामही कळून येत नाहीत.

आमच्या अहवालात या इतर बाबींचे वर्णन करण्यात आलेले नाही.

इतर माहिती किंवा आर्थिक विवरणपत्रे आणि त्यावरील लेखापरीक्षकांच्या अहवालाव्यतिरिक्त माहिती

इतर माहितीसाठी महामंडळाचे संचालक मंडळ जबाबदार आहे. इतर माहितीमध्ये संचालक मंडळाच्या अहवालाचा समावेश आहे, परंतु त्यात आर्थिक विवरणे आणि आमच्या लेखापरीक्षकाचा अहवाल समाविष्ट नाही.

एकत्रित वित्तीय विवरण पत्रांबाबत व्यक्त करण्यात आलेल्या आमच्या मतामध्ये इतर माहितीचा अंतर्भाव नाही आणि आणि आम्ही त्यावर कोणत्याही प्रकारचे आश्वासन अथवा निष्कर्ष व्यक्त करत नाही.

एकत्रित वित्तीय विवरणपत्रांच्या आमच्या लेखापरीक्षणाच्या संदर्भात आमची जबाबदारी ही, इतर माहितीचे वाचन करणे आणि असे करताना इतर माहिती वित्तीय विवरणपत्रांशी महत्त्वपूर्णरित्या विसंगत आहे किंवा नाही हे पाहणे अथवा लेखापरीक्षणादरम्यान अथवा इतर माध्यमातून आम्हाला प्राप्त झालेली माहिती महत्त्वपूर्णरित्या विसंगतपणे नमूद केली जाणार नाही याची खात्री करणे, एवढी राहील.

जर, आमच्याद्वारे केलेल्या लेखापरीक्षणाच्या आधारावर या इतर माहितीमध्ये काही महत्त्वपूर्ण विसंगत अथवा चुकीचे विवरण आहे असा आम्ही निष्कर्ष काढला तर त्या माहितीचा अहवाल सादर करणे हे आमचे कर्तव्य राहील. आम्हाला या संदर्भात अहवाल सादर करण्यासारखे काहीही आढळले नाही.

व्यवस्थापनाच्या तसेच एकत्रित वित्तीय विवरणपत्रांच्या नियामकांच्या जबाबदाऱ्या :

धारक कपंनीची वित्तीय स्थिती, वित्तीय कार्य, आणि रोख प्रवाह याबाबतची रास्त आणि सत्य परिस्थिती दर्शविण्याच्या दृष्टीने कंपनी कायदा, २०१३ (कायदा) मधील कलम १३३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या व भारतामध्ये स्वीकारली गेलेली लेखांकन तत्वे व लेखांकन मानकांनुसार तयार करण्यात आलेल्या या एकत्रित वित्तीय विवरणपत्रामध्ये निर्देशित केलेल्या बाबींसाठी कलम १३४(५) कंपनी कायदा,२०१३ (कायदा) नुसार धारक कंपनीचे संचालक मंडळ जबाबदार आहे. त्याचप्रमाणे संचालक मंडळ हे धारक कंपनीच्या मत्तांचे रक्षण करण्याच्या अनुषंगाने तसेच लबाडी किंवा चुका यांच्यामुळे दाखविण्यात येणाऱ्या चुकीच्या विवरणांपासून मुक्त आणि कंपनीच्या सत्य आणि रास्त वित्तीय परिस्थितीचे चित्र उभे करणारे विवरणपत्र तयार करण्यासाठी लबाडी

आणि इतर अनियमितता यांवर नियंत्रण ठेवण्याच्या अनुषंगाने पुरेशा लेखांकन अभिलेखांचे परिरक्षण करणे, योग्य लेखांकन धोरणांची निवड करून ती राबविणे, वाजवी आणि व्यवहार्य अंदाज करणे तसेच निर्णय घेणे, लेखा अभिलेखांच्या परिपूर्णता आणि बिनचुकतेसाठी पुरेशा अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे संकल्पन आणि परिरक्षण करणे यांसाठीही जबाबदार आहे.

जोवर व्यवस्थापन हे धारक कपंनीचे परिसमापन (लिक्वडेट) करणे अथवा कंपनीचे व्यवहार बंद करणे अथवा याशिवाय इतर कुठला वास्तववादी पर्याय शिल्लक न राहण्याच्या निर्णयापर्यंत येत नाही तोवर वित्तीय विवरणपत्र तयार करण्याच्या प्रक्रियेमध्ये धारक कंपनीच्या सुरू राहण्याच्या क्षमतेच्या मूल्यनिर्धारणासाठी संबंधित बाबी प्रकट करण्यासाठी व्यवस्थापन जबाबदार आहे.

धारक कपंनीच्या वित्तीय अहवाल प्रक्रियेवर निगराणी ठेवण्यासाठीही हे संचालक मंडळ जबाबदार आहे.

वित्तीय विवरणपत्रांसदर्भात लेखापरीक्षकांची जबाबदारी

एकत्रित वित्तीय विवरणपत्रे ही लबाडी किंवा चुकांमुळे दाखविण्यात येणाऱ्या सदोष अहवालांपासून मुक्त असावीत याची वाजवी हमी मिळवण्यासाठी त्यांची तपासणी करणे तसेच त्यानंतर आमचा अभिप्राय असलेला लेखापरीक्षकांचा अहवाल निर्गमित करणे हे आमचे उद्दिष्ट आहे. सयुक्तिक हस्तांतरण उच्च पातळीच्या हस्तांतरणाची हमी देत असले तरी सांविधानिक लेखापरीक्षकांनी केलेले लेखापरीक्षण हे चुकीची विवरणे शोधून काढण्यात नेहमीच यशस्वी ठरेल याची खात्री देता येत नाही. चुकीची विवरणे ही फसवणुकीच्या उद्देशाने अथवा त्रुटींमुळे नमूद केलेली असू शकतात व अशी विवरणे व्यक्तिगत किंवा सामूहिक रित्या घेण्यात आलेल्या आर्थिक निर्णयांवर जेव्हा गंभीर परिणाम करतात तेव्हाच महत्त्वाची मानली जातात.

सांविधानिक लेखापरीक्षकांच्या लेखा परीक्षणाचा एक भाग म्हणून संपूर्ण लेखा परीक्षणादरम्यान आम्ही व्यावसायिक अभिप्राय तसेच व्यावसायिक संशयवादाचा अवलंब करतो. याशिवाय आमची जबाबदारी पुढीलप्रमाणे आहेः

- फसवणुकीमुळे अथवा त्रुटींमुळे नोंदविण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण चुकीच्या विवरणांमुळे एकत्रित आर्थिक विवरणांमध्ये हानी होऊ शकेल अशी विवरणे ओळखणे आणि त्यांच्यामुळे होणाऱ्या हानीचा अंदाज घेणे, अशी हानी होण्यापासून रोखण्यासाठी उपयुक्त लेखापरीक्षण प्रक्रियांचे संकल्पन आणि त्या पार पाडणे, तसेच आमच्या अभिप्रायाच्या समर्थनार्थ पुरेसे आणि योग्य लेखापरीक्षणात्मक पुरावे प्राप्त करणे. फसवणुकीच्या उद्देशाने असलेले चुकीचे विवरण हे त्रुटीमुळे नोंदवलेल्या चुकीच्या विवरणापेक्षा अधिक धोकादायक असते, कारण फसवणुकीच्या उद्देशाने नोंदवण्यात आलेल्या चुकीच्या विवरणामध्ये संगनमत, बनावट दस्तावेज, अंतर्गत वगळणूक, विपर्यास, किंवा अंतर्गत नियंत्रणावरील अधिभाव इत्यादी गोष्टींचा समावेश असतो.

- अंतर्गत नियंत्रणाचे आकलन करणे व लेखापरीक्षणाशी संबंधित परिस्थितीनुरूप लेखापरीक्षण प्रक्रियांचे संकल्पन करणे. कंपनी कायदा २०१३ मधील कलम १४३(३)(१) नुसार, मंडळाकडे सक्षम अंतर्गत आर्थिक नियंत्रण यंत्रणा आहे किंवा कसे तसेच या अंतर्गत नियंत्रण यंत्रणेच्या परिणामकारकेसंबंधी आमचा अभिप्राय व्यक्त करण्यासंबंधी आम्ही जबाबदार आहोत.

- व्यवस्थापनाकडून वापरात असलेल्या लेखांकन अंदाज व संबंधित माहितीचे प्रकटन पद्धतींचे तसेच लेखांकन धोरणांच्या योग्यतेचे मूल्यमापन करणे.

- मंडळ कार्यरत राहण्यासाठी व्यवस्थापनाकडून होत असलेल्या लेखा आधार वापराच्या योग्यतेसंबंधी आणि, मिळालेल्या लेखांकन पुराव्यांच्या आधारावर मंडळाच्या कार्यरत राहण्याच्या क्षमतेविषयी सार्थ शंका उपस्थित करणारी महत्त्वपूर्ण घटना अथवा पारिस्थितिक अनिश्चितता आढळल्यास तसा निष्कर्ष लेखापरीक्षकांच्या अहवालामध्ये नोंदवून, त्यासंबंधी सर्व माहिती उघड करून, व योग्य पुरावे गोळा करून त्यांकडे लक्ष वेधणे व गोळा केलेले पुरावे अपुरे असल्यास लेखापरीक्षकांच्या अहवालामध्ये बदल करणे. आमच्या अहवालातील निष्कर्ष हे आमचा अहवाल सादर झालेल्या तारखेपर्यंतच गृहित धरण्यात यावेत. तथापि, भविष्यातील घटना अथवा परिस्थिती यांमुळे मंडळाच्या कार्यरत राहण्याची क्षमता संपुष्टात येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

- एकत्रित आर्थिक विवरणपत्रांचे एकूण सादरीकरण, संरचना, आणि आशय यांचे मूल्यमापन करणे, यामध्ये माहितीचे प्रकटन, एकत्रित आर्थिक विवरणपत्रांमध्ये रास्त सादरीकरण करणारे तलस्थित व्यवहार आणि परिस्थिती दर्शविण्यात आले आहेत किंवा कसे याचाही समावेश आहे.

इतर गोष्टींसह लेखापरीक्षणाची सुनियोजित व्याप्ती आणि कालनियोजन, आणि महत्त्वपूर्ण लेखांकन निष्कर्ष, अंतर्गत नियंत्रणामध्ये लेखापरीक्षणादरम्यान आमच्या निदर्शनास आलेली कुठलीही महत्त्वपूर्ण न्यूनता आदी बाबींसंबंधी ज्यांना शासन व्यवहारांचे अधिकार आहेत अशांशी आमच्याकडून संपर्क ठेवला जाईल.

संबंधित नैतिक आवश्यकता पुऱ्या करणाऱ्या, आणि ज्यांना संबंधित सर्व बाबी आणि व्यवहारांविषयी माहिती दिल्यावर जे ती माहिती सयुक्तिकरित्या स्वतंत्रपणे आणि जिथे आवश्यकता असेल तिथे योग्य ती खबरदारी घेऊन हाताळू शकतील तसेच आवश्यक त्या व्यवहारांचे ज्यांना स्वतंत्र अधिकार आहेत अशा व्यक्ती आमच्याकडून संपर्कात राहतील. अशा प्रकारचे स्वतंत्र अधिकार असलेल्या व्यक्तिंना कळविण्यात आलेल्या माहितीवरून ज्या बाबी एकत्रित वित्तीय विवरणपत्रांच्या दृष्टीने प्रस्तुत काळात महत्त्वाच्या आहेत त्या प्रमुख लेखांकन बाबी मानल्या जातील. ज्या बाबींच्या सार्वजनिक प्रकटनास कायदा अथवा नियमन प्रतिबंध करीत असेल अथवा अपवादात्मक परिस्थितीमध्ये आम्ही जर असे निर्धारित केले की एखादी बाब आमच्या अहवालामधून प्रकट केल्यास त्याचा जनहितावर प्रतिकूल परिणाम होईल अशा बाबींचे आमच्याकडून सादर होणाऱ्या लेखापरीक्षकांच्या अहवालामध्ये वर्णन केले जणार नाही.

इतर कायदेशीर आणि नियामक आवश्यकतांबाबतचा अहवाल :

१. कंपनी कायद्याच्या कलम १४३(११) च्या अटींनुसार केंद्र सरकारने जारी केलेल्या कंपनी (लेखापरीक्षकाचा अहवाल) आदेश, २०१६ (''आदेश'') च्या आवश्यकतेनुसार, आम्ही 'परिशिष्ट अ' मध्ये आदेशाच्या परिच्छेद ३ आणि ४ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बाबींवर त्या लागू होण्याच्या मर्यादेपर्यंत निवेदन देत आहोत.

२. कायद्याच्या कलम १४३ (३) नुसार आम्ही नमूद करतो की :

अ) आम्ही मागणी केल्यानुसार, उपरोल्लेखित प्रतिकूल मतांबाबतच्या परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या बाबींव्यतिरिक्त, आमच्या माहिती व समजुतीनुसार उर्वरित सर्व बाबींच्या लेखापरीक्षणासाठी आवश्यक असलेली सर्व माहिती व स्पष्टीकरणे आम्हास प्राप्त झाली आहेत.

ब) उपरोल्लेखित प्रतिकूल मतांबाबतच्या परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या बाबींचे संभवनीय परिणाम सोडल्यास, समूहातर्फे ठेवण्यात आलेल्या लेखे नोंदवह्या व विवरण हे आमच्या परीक्षणानुसार नियमास अनुसरून असून आम्ही भेट न दिलेल्या शाखांमधून प्राप्त झालेली माहिती लेखा परीक्षणास पुरेशी आहे.

क) उपरोल्लेखित प्रतिकूल मताबाबतच्या परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या बाबी सोडल्यास एकत्रित ताळेबंद, एकत्रित नफा–तोटा विवरण व एकत्रित रोख ओघ विवरणपत्र हे लेखापुस्तिकांनुरूप जुळलेले आहेत.

ड) उपरोल्लेखित प्रतिकूल मतांबाबतच्या परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या बाबी वगळता सदर एकत्रित ताळेबंद नफा तोटा विवरणपत्र व रोख ओघ विवरणपत्र हे कंपनी अधिनियम २०१४ च्या कलम १३३ (नियम ७ सह) नुसार आहेत.

इ) उपरोल्लेखित प्रतिकूल मतांबाबतच्या परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या बाबींमुळे, आमच्या मतानुसार, महामंडळाच्या कार्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो.

फ) एमसीएने ३१.०३.२०२२ रोजीच्या अधिसूचनेनुसार ३१.०३.२०२२ पर्यंत कोणत्याही संचालकाला अपात्र घोषित केलेले नाही व त्यांची अधिनियम कलम १६४ (२) नुसार रोख लावलेली नाही

ग) महामंडळाच्या वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणांची पर्याप्तता आणि अशा नियंत्रणांच्या

कायदेशीर परिणामकारकतेच्या संदर्भात, 'परिशिष्ट ब' मधील आमच्या स्वतंत्र अहवालाचा संदर्भ घ्यावा. आमचा अहवाल कंपनीच्या वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणांची पर्याप्तता आणि त्यांची कार्यप्रणाली किती प्रभावी आहे, यावर 'मत देण्यास असमर्थता' (डिस्क्लेमर ऑफ ओपिनियन) व्यक्त करतो.

ह) लेखे व इतर बाबींच्या नोंदींबाबत व्यक्त केलेली प्रतिकूल मते ही उपरोल्लेखित प्रतिकूल मतांबाबतच्या परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या बाबींशी संबंधित आहेत.

ई) हे महामंडळ पूर्णपणे शासकीय मालकीची कंपनी (Wholly Owned Government Company) असल्याने, व्यवस्थापकीय मानधनाच्या (मॅनेजरियल रेम्युनेरेशन) मर्यादेबाबत असणारे या कायद्याचे कलम १९७ आणि त्यासोबतचे परिशिष्ट ५ हे, ५ जून २०१५ रोजीच्या परिपत्रक क्र. 'जीएसआर ४६३ (ई)' नुसार या महामंडळाला लागू होत नाही.

(जे) कंपन्यांचे (लेखापरीक्षा आणि लेखापरीक्षक) नियम, २०१४ मधील नियम ११ नुसार लेखापरीक्षकाच्या अहवालात समाविष्ट करावयाच्या इतर बाबींच्या संदर्भात, आमच्या मते, आम्हाला मिळालेल्या सर्वोत्तम माहितीच्या आधारे आणि दिलेल्या स्पष्टीकरणानुसार:

(i) महामंडळाने आपल्या प्रलंबित कायदेशीर दाव्यांचा (खटल्यांचा) वित्तीय स्थितीवर होणारा परिणाम वित्तीय विवरणांमध्ये स्पष्ट केला आहे – यासाठी वित्तीय विवरणांमधील नोंद क्रमांक ३४ पहावी;

(ii) वरील 'प्रतिकूल मताचा आधार' (बेसिस फॉर ॲडव्हर्स ओपिनियन) या परिच्छेदात वर्णन केलेल्या बाबींचे संभाव्य परिणाम वगळता, महामंडळाने लागू कायदा किंवा लेखा मानकांनुसार आवश्यकतेप्रमाणे, व्युत्पन्न करारांसह (derivative contracts) दीर्घकालीन करारांवरील संभाव्य लक्षणीय नुकसानीसाठी (foreseeable losses) पुरेशी आर्थिक तरतूद केली आहे;

(iii) चालू अहवाल वर्षादरम्यान महामंडळाकडे 'गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी'कडे (इन्व्हेस्टर एज्युकेशन अँड प्रोटेक्शन फंड) कोणतीही रक्कम हस्तांतरित करण्याची वेळ आलेली नाही. त्यामुळे अशी रक्कम हस्तांतरित करण्यास उशीर झाल्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(iv) (अ) व्यवस्थापनाने असे प्रतिपादन (स्पष्टीकरण) केले आहे की, त्यांच्या सर्वोत्तम माहिती आणि समजुतीनुसार, आधीच जाहीर केलेल्या माहितीव्यतिरिक्त, कंपनीने इतर कोणत्याही व्यक्तीमध्ये किंवा संस्थेमध्ये कोणताही निधी (जो वैयक्तिकरित्या किंवा एकत्रितपणे महत्त्वपूर्ण आहे आणि जो कर्ज घेतलेल्या निधीतून, शेअर प्रीमियममधून किंवा इतर कोणत्याही निधीच्या स्रोतातून उभारला आहे) या अटीवर गुंतवलेला नाही की, ती मध्यस्थ संस्था प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कंपनीच्या वतीने निश्चित केलेल्या इतर व्यक्ती किंवा संस्थांमध्ये (अंतिम लाभार्थी) कर्ज किंवा गुंतवणूक करेल, अथवा या अंतिम लाभार्थ्यांच्या वतीने कोणतीही हमी (गॅरंटी), सुरक्षा किंवा तत्सम कोणतीही सुविधा पुरवेल; मग तसा करार लेखी स्वरूपात नोंदवलेला असो वा नसो.

(ब) व्यवस्थापनाने असे प्रतिपादन (स्पष्टीकरण) केले आहे की, त्यांच्या सर्वोत्तम माहिती आणि समजुतीनुसार, आधीच जाहीर केलेल्या माहितीव्यतिरिक्त, कंपनीला परदेशी संस्थांसह (निधी पुरवणारे पक्ष) इतर कोणत्याही व्यक्तीकडून किंवा संस्थेकडून कोणताही निधी (जो वैयक्तिकरित्या किंवा एकत्रितपणे महत्त्वपूर्ण आहे) या अटीवर प्राप्त झालेला नाही की, कंपनी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे त्या निधी पुरवणाऱ्या पक्षाच्या वतीने निश्चित केलेल्या इतर व्यक्ती किंवा संस्थांमध्ये (अंतिम लाभार्थी) कर्ज किंवा गुंतवणूक करेल, अथवा या अंतिम लाभार्थ्यांच्या वतीने कोणतीही हमी (गॅरंटी), सुरक्षा किंवा तत्सम कोणतीही सुविधा पुरवेल; मग तसा करार लेखी स्वरूपात नोंदवलेला असो वा नसो.

(क) सद्य परिस्थितीनुसार वाजवी आणि योग्य वाटणाऱ्या लेखापरीक्षा प्रक्रियेच्या (ऑडिट प्रोसिजर्स) आधारे, आम्हाला वरील (अ) आणि (ब) अंतर्गत दिलेल्या 'नियम ११(इ)' च्या उपकलम (i) आणि (ii) मधील प्रतिपादनात (स्पष्टीकरणात) कोणतीही महत्त्वपूर्ण चुकीची माहिती (मटेरिअल मिसस्टेटमेंट) असल्याचे मानण्यास वाव मिळेल, अशी कोणतीही गोष्ट आमच्या निदर्शनास आलेली नाही.

(v) कंपनीने या वर्षादरम्यान कोणताही लाभांश (डिव्हिडंड) जाहीर केलेला नाही किंवा दिलेला नाही.

अंबावत जैन आणि असोसिएट्स
सनदी लेखापाल यांच्याकरिता
(संस्थेचा नोंदणी क्र. १०९६८१डब्ल्यू)

(कमल शर्मा)
भागीदार
सभासदत्व क्रमांक : ११२८४३

स्थळ : मुंबई
दिनांक : २६.०९.२०२५
UDIN: 25112843BMOCQY7758

लेखापरीक्षकांच्या अहवालाचे 'परिशिष्ट – अ' (Annexure A)

आमच्या त्याच तारखेच्या अहवालात संदर्भित केलेले परिशिष्ट. आम्ही असे प्रमाणित करतो की:

xxi) कायदा (ॲक्ट) च्या कलम १४३(११) अंतर्गत केंद्र सरकारने जारी केलेल्या कंपन्यांच्या (लेखापरीक्षकाचा अहवाल) आदेश, २०२० (''आदेश'' / ''कारो'' – CARO) मधील परिच्छेद ३(xxi) आणि ४ मध्ये नमूद केलेल्या व लेखापरीक्षकाच्या अहवालात समाविष्ट करावयाच्या बाबींच्या संदर्भात आम्हाला मिळालेल्या माहिती आणि स्पष्टीकरणांनुसार, तसेच एकत्रित वित्तीय विवरणांमध्ये (कन्सॉलिडेटेड फायनान्शियल स्टेटमेंट्स) समाविष्ट असलेल्या व 'कारो' अंतर्गत अहवाल देणे लागू असलेल्या होल्डिंग कंपनीच्या स्वतंत्र वित्तीय विवरणांसाठी (स्टँडअलोन फायनान्शियल्स) आम्ही जारी केलेल्या 'कारो' अहवालांच्या आधारे, त्यातील प्रतिकूल/सशर्त अभिप्राय (ॲडव्हर्स/क्वालिफाइड रिमार्क्स) खालीलप्रमाणे आहेत:

अनु. क्र.	**नाव**	**कंपनी ओळख क्रमांक** (CIN)	**होल्डिंग / दुय्यम/ अनुषंगी (सबसिडीअरी) / संलग्न (असोसिएट)**	**'कारो'** (CARO) **अहवालातील सशर्त किंवा प्रतिकूल कलमाचा क्रमांक**
१	महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादित (एमएसएसआयडीसी)	U74999MH1962SGC012501	होल्डिंग	i (a) (b) (c) (e), ii (a) (b) (c), vii (a)
२	कृपानिधी लिमिटेड	U70101MH1964SGC013078	दुय्यम/ अनुषंगी (सबसिडीअरी)	vii (a)

अंबावत जैन आणि असोसिएट्स
सनदी लेखापाल यांच्याकरिता
(संस्थेचा नोंदणी क्र. १०९६८१डब्ल्यू)

(कमल शर्मा)
भागीदार
सभासदत्व क्रमांक : ११२८४३

स्थळ : मुंबई
दिनांक : २६.०९.२०२५
UDIN: 25112843BMOCQY7758

लेखापरीक्षकांच्या अहवालाचे 'परिशिष्ट – ब' (Annexure B)

कंपनी कायदा, २०१३, कलम १ मधील विभाग १४३, उपविभाग ३ मध्ये असलेल्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचा अहवाल

आम्ही, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित ('महामंडळ') यांचे दिनांक ३१ मार्च २०२२ रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षाच्या वित्तीय अहवालावरील आंतरिक वित्तीय नियत्रणांचे लेखापरीक्षण केले आहे. त्याखेरीज त्या दिनांकाला संपणाऱ्या आर्थिक वर्षासाठी महामंडळच्या वित्तीय विवरणपत्रांसाठी आमचे लेखा परीक्षणही केले आहे.

मताची अस्वीकृती

आम्हाला मिळालेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार धारक कंपनीने अंतर्गत वित्तीय नियंत्रण निष्कर्षाधारीत वा अंतर्गत नियंत्रणातील सनदी लेखापालाच्या प्रशिक्षण संस्थेने निर्गमित केलेल्या अंतर्गत नियंत्रणाच्या मार्गदर्शक नोंदीनुसार आवश्यक अंतर्गत आर्थिक नियंत्रण प्रस्थापित केलेले नाही. या कारणास्तव धारक कंपनीचे अंतर्गत अर्थ नियंत्रण ३१ मार्च २०२२ पर्यंत परिणामकारकतेने चालत होते की नाही याबाबतीत आमच्या मताच्या पुष्ट्यर्थ पुरावा सादर करण्यास आम्ही असमर्थ आहोत.

महामंडळाच्या वित्तीय विवरणांच्या लेखापरीक्षणादरम्यान लागू केलेल्या चाचण्यांचे स्वरूप, वेळ आणि व्याप्ती निश्चित करताना आम्ही वर नमूद केलेल्या 'अभिप्राय देण्यास असमर्थतेचा' (Disclaimer) प्रामुख्याने विचार केला आहे. आमच्या या असमर्थतेचा महामंडळाच्या वित्तीय विवरणांवरील आमच्या मुख्य मतावर कोणताही विपरीत परिणाम होत नाही.

अंतर्गत वित्तीय यंत्रणा नियंत्रणासंबंधी व्यवस्थापनाची जबाबदारी

'द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया' (ICAI) द्वारे जारी केलेल्या 'वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणांच्या लेखापरीक्षेबाबतचे मार्गदर्शन पत्रक' (Guidance Note) यामध्ये नमूद केलेल्या अंतर्गत नियंत्रणांच्या आवश्यक घटकांचा विचार करून, महामंडळाच्या वित्तीय अहवालावरील अंतर्गत नियंत्रण निकषांच्या आधारे आपली अंतर्गत वित्तीय नियंत्रणे प्रस्थापित करणे आणि ती टिकवून ठेवणे ही महामंडळाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. या जबाबदाऱ्यांमध्ये, व्यवसायाचे कामकाज सुव्यवस्थित आणि कार्यक्षमतेने चालण्यासाठी पुरेशी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे तयार करणे, त्यांची अंमलबजावणी करणे आणि ती प्रभावीपणे कार्यरत ठेवणे समाविष्ट आहे. यामध्ये महामंडळाच्या धोरणांचे पालन करणे, स्वतःच्या मालमत्तेचे रक्षण करणे, आर्थिक गैरव्यवहार (घोटाळे) आणि चुका रोखणे व त्यांचा शोध घेणे, हिशोबाच्या नोंदींची अचूकता आणि पूर्णता राखणे, तसेच कायद्यानुसार विश्वसनीय वित्तीय माहिती वेळेवर तयार करणे या बाबींचा समावेश होतो.

लेखापरीक्षकांची जबाबदारी

महामंडळाच्या वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणांविषयी आमच्या लेखापरीक्षणावर आधारित आमचे मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे. आम्ही आमचे लेखापरीक्षण 'द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया' (ICAI) द्वारे जारी केलेल्या आणि कंपनी कायद्याच्या कलम १४३(१०) अंतर्गत विहित केलेल्या व अंतर्गत वित्तीय नियंत्रणांच्या लेखापरीक्षणासाठी लागू असलेल्या 'वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणांच्या लेखापरीक्षेबाबतचे मार्गदर्शन पत्रक' (Guidance Note) आणि 'लेखापरीक्षणाचे मानक' (Standards on Auditing) यांच्यानुसार पार पाडले आहे. या मानकांचे आणि मार्गदर्शन पत्रकाचे पालन करताना आम्ही नैतिक नियमांचे पालन करणे, तसेच वित्तीय अहवालावरील पर्याप्त अंतर्गत वित्तीय नियंत्रणे प्रस्थापित व राखली गेली आहेत की नाही आणि अशी नियंत्रणे सर्व महत्त्वाच्या बाबींमध्ये प्रभावीपणे कार्यरत होती की नाही, याबद्दल वाजवी खात्री (रिझनेबल अश्युरन्स) मिळवण्यासाठी लेखापरीक्षणाचे योग्य नियोजन आणि अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

आमच्या लेखापरीक्षणांतर्गत वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रण प्रणालीची पर्याप्तता आणि त्यांच्या कार्यप्रणालीच्या प्रभावीपणाबद्दल लेखापरीक्षा पुरावे (ऑडिट एव्हिडन्स) मिळवण्यासाठी आवश्यक प्रक्रिया पार पाडल्या जातात. वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणांच्या आमच्या लेखापरीक्षणात, या नियंत्रण प्रणालीची समज मिळवणे, त्यामध्ये एखादी मोठी त्रुटी किंवा कमतरता असण्याच्या जोखमीचे मूल्यमापन करणे आणि या मूल्यमापन केलेल्या जोखमीच्या आधारे अंतर्गत नियंत्रणाची रचना व कार्यक्षमतेची चाचणी आणि मूल्यमापन करणे समाविष्ट आहे. निवडलेल्या प्रक्रिया या लेखापरीक्षकाच्या निर्णयावर (जजमेंट) अवलंबून असतात. यामध्ये आर्थिक

गैरव्यवहार (घोटाळा) किंवा चुकीमुळे वित्तीय विवरणांमध्ये कोणतीही मोठी चुकीची माहिती असण्याच्या जोखमीच्या मूल्यमापनाचा समावेश होतो.

आम्हाला विश्वास आहे की, आम्हाला मिळालेले लेखापरीक्षा पुरावे हे महामंडळाच्या वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रण प्रणालीवर आमचे लेखापरीक्षा मत मांडण्यासाठी पुरेसे आणि योग्य आहेत.

वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचा अर्थ

वित्तीय अहवालाची विश्वसनीयता सुनिश्चित करण्यासाठी आणि सामान्यतः स्वीकारल्या गेलेल्या लेखा तत्त्वांच्या अधीन राहून बाह्य उद्देशांसाठी वित्तीय विवरणे तयार करण्याबाबत वाजवी खात्री देण्याच्या उद्देशाने महामंडळाच्या वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रण प्रक्रिया निश्चित केली जाते. महामंडळाच्या या अंतर्गत वित्तीय नियंत्रणामध्ये खालील धोरणे आणि प्रक्रियांचा प्रामुख्याने समावेश होतो:

(१) महामंडळाचे सर्व आर्थिक व्यवहार आणि मालमत्तेची विल्हेवाट (dispositions) वाजवी व सविस्तर तपशीलासहित, अचूक आणि न्याय्य पद्धतीने हिशोबाच्या नोंदींमध्ये दिसून येईल, याची काळजी घेणे;

(२) सामान्यतः स्वीकारल्या गेलेल्या लेखा तत्त्वांनुसार वित्तीय विवरणे तयार करता यावीत म्हणून सर्व व्यवहार आवश्यकतेनुसार व्यवस्थित नोंदवले गेले आहेत, तसेच महामंडळाची सर्व प्राप्ती (उत्पन्न) आणि खर्च केवळ व्यवस्थापन व संचालकांच्या पूर्वपरवानगीनेच (अधिकारान्वये) केले जात आहेत, याबद्दल वाजवी खात्री देणे; आणि

(३) वित्तीय विवरणांवर मोठा आणि विपरीत परिणाम करू शकणाऱ्या महामंडळाच्या मालमत्तेची अनधिकृत खरेदी, वापर किंवा विल्हेवाट रोखणे, अथवा अशा बाबींचा वेळेत शोध घेणे याबद्दल वाजवी खात्री देणे.

वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणांच्या अंगभूत मर्यादा

वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणांच्या काही अंगभूत (नैसर्गिक) मर्यादा असतात. यामध्ये कर्मचाऱ्यांची आपसातील संगनमते किंवा व्यवस्थापनाद्वारे (मॅनेजमेंट) नियमांचे अनधिकृतपणे उल्लंघन करण्याची शक्यता समाविष्ट असते. असे घडल्यास एखादी चूक किंवा आर्थिक गैरव्यवहार (घोटाळा) होऊनही मोठी चुकीची माहिती समोर न येता तशीच राहून जाण्याचा धोका असतो. याशिवाय, सध्याच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणांच्या मूल्यमापनाच्या आधारे भविष्यातील कालावधीचा अंदाज लावणे हे देखील जोखमीचे ठरू शकते; कारण बदलत्या परिस्थितीमुळे भविष्यात ही वित्तीय नियंत्रणे अपुरी पडू शकतात किंवा निश्चित केलेली धोरणे आणि प्रक्रियांच्या पालनाचा दर्जा खालावू शकतो.

अंबावत जैन आणि असोसिएट्स
सनदी लेखापाल यांच्याकरिता
(संस्थेचा नोंदणी क्र. १०९६८१डब्ल्यू)

(कमल शर्मा)
भागीदार
सभासदत्व क्रमांक : ११२८४३

स्थळ : मुंबई
दिनांक : २६.०९.२०२५
UDIN: 25112843BMOCQY7758

महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ लिमिटेड (संयुक्त) च्या ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षातील खात्यांबाबत कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १४३(५) अंतर्गत निर्देश

अ.क्र.	निर्देश	लेखापरीक्षकांची टिप्पणी
१	कंपनीकडे सर्व लेखा व्यवहार आयटी प्रणालीद्वारे प्रक्रिया करण्यासाठी यंत्रणा अस्तित्वात आहे का? असल्यास, आयटी प्रणालीबाहेर लेखा व्यवहार प्रक्रिया केल्यामुळे खात्यांच्या अखंडतेवर होणारा परिणाम आणि त्याचे कोणतेही वित्तीय परिणाम असल्यास, ते नमूद करावेत.	महामंडळाने सर्व वित्तीय व्यवहार प्रक्रिया करण्यासाठी टॅली ईआरपी ही लेखा प्रणाली कार्यान्वित केली आहे. आमच्या लेखापरीक्षण प्रक्रियेनुसार व नोंदींच्या तपासणीत, आम्हाला कोणताही असा व्यवहार आढळलेला नाही जो आयटी प्रणालीबाहेर नोंदवलेला आहे. त्यामुळे प्रणालीबाहेर व्यवहार प्रक्रिया केल्यामुळे खात्यांच्या अखंडतेवर कोणताही प्रतिकूल परिणाम किंवा वित्तीय प्रभाव झालेला नाही.
२	कंपनीकडून कर्जाची परतफेड करण्यात अपयश आल्यामुळे कर्जदाराने विद्यमान कर्जाची पुनर्रचना केली आहे का किंवा कर्ज/देयके/व्याज माफ केले आहे किंवा रद्द केले आहे का? असल्यास, त्याचा वित्तीय परिणाम नमूद करावा. अशा प्रकरणांची योग्य प्रकारे लेखा नोंद करण्यात आली आहे का? (कर्जदार ही शासकीय कंपनी असल्यास, हा निर्देश कर्जदार कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकांनाही लागू होतो.)	महामंडळाने कर्जफेडीतील अपयशामुळे कोणतेही विद्यमान कर्ज पुनर्रचित केलेले नाही किंवा कर्ज/देयके/व्याज माफ अथवा रद्द केलेले नाही
३	केंद्र/राज्य सरकार किंवा त्यांच्या संस्थांकडून विशिष्ट योजनांसाठी प्राप्त/प्राप्त करावयाचे निधी (अनुदान/सबसिडी इत्यादी) योग्य प्रकारे त्याच्या अटी व शर्तींनुसार लेखा नोंदवले गेले आहेत का/वापरले गेले आहेत का? अटी व शर्तींच्या पालनात झालेल्या विचलनाची यादी द्यावी.	आमच्या नमुना चाचणी/पावती तपासणीदरम्यान, अनुदान/सबसिडी स्वरूपात प्राप्त/प्राप्त करावयाच्या निधीच्या अटी व शर्तींचे पालन न करता लेखा नोंदवले गेले आहेत किंवा वापरले गेले आहेत, अशी कोणतीही बाब आमच्या निदर्शनास आलेली नाही.

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १४३(५) अंतर्गत निर्देशः

अ.क्र.	निर्देश	लेखापरीक्षकांची टिप्पणी
१.	कर्ज/देयके/व्याज माफ करण्याचे किंवा रद्द करण्याचे कोणतेही प्रकरण आहे का याबाबत अहवाल द्यावा; असल्यास, त्यामागील कारणे आणि संबंधित रकमेची माहिती नमूद करावी	आर्थिक वर्षात कर्ज/देयके/व्याज माफ किंवा रद्द करण्याची कोणतीही प्रकरणे नाहीत.
२.	तृतीय पक्षांकडे असलेल्या साठ्यांसाठी आणि सरकार व इतर प्राधिकरणांकडून भेट स्वरूपात प्राप्त झालेल्या मालमत्तांसाठी योग्य नोंदी ठेवण्यात आल्या आहेत का?	आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, महामंडळाचा साठा तृतीय पक्षांकडे नाही आणि लेखापरीक्षण वर्षात महामंडळाला सरकार किंवा इतर प्राधिकरणांकडून भेट स्वरूपात कोणतीही मालमत्ता प्राप्त झालेली नाही.
३.	प्रलंबित कायदेशीर/मध्यस्थी प्रकरणांची कालपरत्वे विश्लेषणासह, प्रकरणे प्रलंबित राहण्याची कारणे आणि सर्व कायदेशीर प्रकरणांवरील (देशांतर्गत व परदेशी) खर्चासाठी देखरेखीच्या यंत्रणेचे अस्तित्व/कार्यक्षमता याबाबत अहवाल सादर करावा	प्रलंबित कायदेशीर/मध्यस्थी प्रकरणांचे कालपरत्वे विश्लेषण, प्रकरणे प्रलंबित राहण्याची कारणे आणि यंत्रणेच्या अस्तित्वाबाबतचा अहवाल स्वतंत्ररित्या संलग्न केलेल्या विवरणानुसार आहे. (एकूण प्रलंबित प्रकरणांची संख्या ३८ असून एकूण संबंधित रक्कम अंदाजे रु. २१.१० कोटी आहे.) सर्व कायदेशीर प्रकरणांवरील (देशांतर्गत व विदेशी) खर्चाच्या देखरेखीच्या यंत्रणेच्या कार्यक्षमतेबाबत, आम्हाला स्पष्टीकरण देण्यात आले की महामंडळाने नियुक्त केलेल्या वकिलांचा डेटा राखलेला आहे. त्यांना महामंडळाने निश्चित केलेल्या शुल्क संरचनेनुसार मानधन दिले जाते. जर संबंधित रक्कम मोठी असेल, तर संचालक मंडळाने व्यवस्थापकीय संचालकाला प्रकरणानुसार वकील/ सॉलिसिटरची नियुक्ती व मानधन ठरवण्याचे विशेष अधिकार दिले आहेत
४.	जर कंपनीची विनिवेशासाठी निवड झाली असेल, तर मालमत्ता (मालमत्ता व जमीन यासह) आणि दायित्वे (प्रतिबद्ध व सामान्य राखीव निधी यासह) यांच्या मूल्यांकनाच्या दृष्टीने संपूर्ण स्थिती अहवाल तपासावा, ज्यामध्ये विनिवेश प्रक्रियेची पद्धत व सद्यस्थितीचा समावेश असावा	महामंडळाची विनिवेशासाठी निवड करण्यात आलेली नाही.

क्षेत्र–विशिष्ट उप–निर्देश

अनु. क्र.	निर्देश	लेखापरीक्षकाचा अभिप्राय
१.	भारतीय रिझर्व्ह बँकेने खालील बाबींसाठी जारी केलेल्या निर्देशांचे कंपनीने पालन केले आहे का?: • 'गैर–बैंकिंग वित्तीय कंपन्या (NBFCs) • थकीत मालमत्तेचे (NPA) वर्गीकरण; आणि • NBFCs साठी भांडवल पर्याप्तता निकष (Capital adequacy norms)	आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, हे महामंडळ गैर–बैंकिंग वित्तीय कंपनी नाही आणि ते NBFC च्या कोणत्याही व्यवहारांमध्ये गुंतलेले नाही; त्यामुळे हा खंड महामंडळाला लागू होत नाही.
२.	कर्जे ही बोजाविरहित (free from encumbrances) व पुरेशा जामिनाद्वारे सुरक्षित आहेत आणि गहाण ठेवलेल्या मालमत्तेवर कंपनीचा पहिला हक्क (first charge) आहे, हे सुनिश्चित करणारी प्रणाली कंपनीकडे अस्तित्वात आहे का? तसेच जप्त केलेल्या घटकांची (seized units) विल्हेवाट लावण्यास विनाकारण उशीर झाल्याची काही उदाहरणे असल्यास त्यावर अहवाल द्यावा.	आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, हे महामंडळ गैर–बैंकिंग वित्तीय कंपनी (NBFC) नाही आणि ते NBFC च्या कोणत्याही व्यवहारांमध्ये गुंतलेले नाही; त्यामुळे हा खंड महामंडळाला लागू होत नाही.
३.	थकबाकीची तडजोड (settlement of dues) आणि त्याला मुदतवाढ देण्यासाठी कोणतीही नवीन योजना सुरू करताना कंपनी / सरकारच्या धोरणांचे/मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केले गेले आहे का?	आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, हे महामंडळ गैर–बैंकिंग वित्तीय कंपनी (NBFC) नाही आणि ते NBFC च्या कोणत्याही व्यवहारांमध्ये गुंतलेले नाही; त्यामुळे हा खंड महामंडळाला लागू होत नाही.
४.	व्यापारी प्राप्य रक्कम, व्यापारी देय रक्कम, मुदत ठेवी आणि रोख व बँक शिलकीच्या पडताळणीची माहिती मिळवली आहे का, यावर टिप्पणी करा.	१. रोख, मुदत ठेव आणि बँक शिलकीची पडताळणी माहिती मिळवली आहे. २. व्यापारी प्राप्य रक्कम आणि व्यापारी देय रकमेची पडताळणी माहिती मिळवलेली नाही.
५.	लेखापरीक्षण अहवालात नमूद केलेला नफा/तोटा हा कंपनीच्या नफा–तोटा पत्रकानुसार आहे का?	होय, लेखापरीक्षा अहवालात नमूद केलेला नफा/ तोटा हा कंपनीच्या नफा–तोटा पत्रकानुसार आहे.
६.	महाराष्ट्र शासनाला मूळ रकमेचा (Principal Amount) भरणा केला नसताना, कंपनी व्याजासाठी तरतूद करत आहे का?	व्याजासाठी कोणतीही आर्थिक तरतूद केलेली नाही, कारण चालू आर्थिक वर्षात महाराष्ट्र शासनाकडून कोणतेही कर्ज घेण्यात आलेले नाही.
७.	कंपनी कायदा, २०१३ च्या अनुसूची ३ (Schedule III) नुसार, 'वाटप प्रलंबित असलेले शेअर अर्ज शुल्क' हे शेअर भांडवलांतर्गत स्पष्टपणे/ स्वतंत्रपणे दर्शवले पाहिजे.	३१ मार्च २०२२ च्या ताळेबंद तारखेनुसार, कोणतेही शेअर अर्ज शुल्क किंवा वाटप प्रलंबित नाही.
८.	प्रवर्तक / महाराष्ट्र शासनाकडून मिळालेले भांडवल किती वर्षांपासून 'शेअर अर्ज शुल्क' अंतर्गत दर्शवले जात आहे? त्याची कारणे आणि या मुद्द्यावर वैधानिक लेखापरीक्षकांचे अभिप्राय अहवालात समाविष्ट केले जावेत.	३१ मार्च २०२२ च्या ताळेबंद तारखेनुसार, प्रवर्तक/ महाराष्ट्र शासनाकडून नवीन भांडवल मिळालेले नाही आणि शेअर अर्ज शुल्काअंतर्गत काहीही प्रलंबित नाही.

वित्तीय वर्ष २०२१-२२ च्या लेखापरीक्षकांच्या अहवालास उत्तर (एकत्रित)

	लेखापरीक्षकांचे भाष्य	व्यवस्थापनाचे भाष्य
	प्रतिकूल मतासाठी आधार	
१.	(अ) विविध सामान्य खातेवह्या दीर्घकालीन/मेळ न घातलेल्या आहेत तसेच विविध खातेवह्यांची अदलाबदल झालेली असल्यामुळे शिल्लक रकमा चुकीच्या दर्शविल्या जात आहेत. मेळ घातलेला नसल्यामुळे आम्ही या शिल्लक रकमांच्या अचूकतेवर भाष्य करण्यास असमर्थ आहोत. मेळ न घातला जाण्याचा तसेच जमाबंदी न केल्याचा वरील खात्यांमध्ये दिसत असलेल्या जुन्या शिल्लक रकमांवर जो परिणाम झालेला असेल किंवा जुन्या शिल्लक रकमा पूर्णतः किंवा अंशतः वसूली झाली नसल्याने किंवा पुरांकित केल्यामुळे उद्‌भवलेल्या संभाव्य लाभ/तोट्याची खात्री देता येत नाही.	विभिन्न सामान्य खाता वह्या शेष तपासणी, मेळ आणि परिणामी समायोजनाच्या अधीन आहेत.
	(ब) आवश्यक माहिती/तपशिलांच्या अभावामुळे आम्ही मालमत्ता आणि दायित्वांचे वर्गीकरण आणि त्यांची चालू आणि मागील काळातील दुभागणी लेखा मानकांशी सुसंगत आहे की नाही यावर टिप्पणी करण्यास असमर्थ आहोत.	नोंद घेण्यात आली असून संबंधित कार्यवाहीस सुरुवात करण्यात आली आहे.
	(क) एकत्रित वित्तीय विवरणांमधील नोंद क्र. ७ कडे विशेष लक्ष वेधू इच्छितो. यामध्ये चालू व्यापारी देय रकमेअंतर्गत रु. ३५.८६ कोटी (आर्थिक वर्ष २०२०-२१ - रु. ३६.१३ कोटी) 'इतरांना देय' म्हणून दर्शवलेले आहेत. या रकमेचा पक्षनिहाय तपशील आणि शिल्लक रकमेचे पडताळणी प्रमाणपत्र आम्हाला उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. परिणामी, या दायित्वाच्या अस्तित्वावर आणि त्या अनुषंगाने चालू लेखापरीक्षा वर्षातील महामंडळाच्या एकत्रित वित्तीय विवरणांवर होणाऱ्या संभाव्य परिणामांवर आम्ही कोणतेही मत व्यक्त करण्यास असमर्थ आहोत.	मुद्द्याची नोंद घेण्यात आली आहे. व्यापार देय रु.३५.८६ कोटी मागील वर्षी (आर्थिक वर्ष २०२०-२१; ३६.१३कोटी) चिकित्सा, मेळ आणि परिणामी समायोजनाच्या अधीन आहे.

वित्तीय वर्ष २०२१-२२ च्या लेखापरीक्षकांच्या अहवालास उत्तर (एकत्रित)

	लेखापरीक्षकांचे भाष्य	व्यवस्थापनाचे भाष्य
	प्रतिकूल मतासाठी आधार	
२.	**बाह्य बाकी पुष्टीकरण/समायोजन** एकत्रित वित्तीय विवरणपत्रातील टीप क्र. ७, १६ आणि १८ याकडे लक्ष वेधू इच्छितो. कर्ज आणि अग्रीमाची शिल्लक, इतर विविध नावे/जमा बाकी आणि सरकारकडून देय रक्कम यांचे पुष्टीकरण, सामंजस्य आणि त्यातील परिणामरूप समायोजनांच्या अधीन आहेत. महामंडळाद्वारे त्रयस्थ पक्ष शेष मिळवणी पुष्टीकरण प्रणालीचे पालन केले जात नाही. लेखापुस्तकांमध्ये बाकी रकमेसाठी लेखामानक ५०५ नुसार बाह्य पुष्टीकरण मिळविण्यासाठी आमच्यासाठी संवाद तपशील उपलब्ध नव्हते. योग्य नोंदी/संवाद तपशीलांच्या अनुपस्थितीत, आम्ही लेखापुस्तकांमध्ये बाकी रकमांच्या अचूकतेवर भाष्य करण्यास असमर्थ आहोत.	हे लेखे चिकित्सा, मेळ आणि परिणामी समायोजनाच्या अधीन असल्यामुळे शेष पुष्टीकरण प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही.
३.	गोदाम आणि कार्यालयीन भाडे या शीर्षकाखालील मिळण्यायोग्य रकमेच्या विविध खात्यांचा ताळमेळ बसलेला नाही. त्यामुळे आम्ही गोदाम भाडे प्राप्त आणि प्राप्त करण्यायोग्य आणि अदा केलेले आणि देय असलेले भाडे यासंबंधीच्या लेखापुस्तकांमध्ये असलेल्या रकमांच्या अचूकतेवर भाष्य करता येत नाही. एकूण वसूलपात्र भाड्याची रक्कम रु. ९,४७,८९,५११/- असून, त्यापैकी रु. ५,८१,३५,०४१/- इतकी रक्कम कायदेशीर वादात (न्यायालयीन प्रकरणांतर्गत) अडकलेली आहे.	नोंदींच्या आधारावर आम्ही सर्व गोदामांच्या भाड्याची रक्कम निश्चित केलेली आहे व त्यांच्या वसुलीसाठी कार्यवाही सुरू केली आहे.
४.	महामंडळाने आयसीएआयद्वारे जारी केलेल्या काही लेखा मानकांचे पूर्णपणे पालन केले नाही. त्यांची तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे आहे: (अ) महामंडळ मालाच्या खरेदी-विक्रीची नोंद ही विक्रेता खरेदीदाराला मोबदला म्हणून माल हस्तांतरित करतो त्यावेळी न करता पुरवठादाराच्या बिलाच्या आधारे करते. हा व्यवहार लेखा मानक-९ महसूली जमा यास सुसंगत नाही. त्यामुळे ह्या वर्षी कंपनीच्यावतीने करण्यात आलेल्या खरेदी विक्रीच्या व्यवहाराचे अयोग्य चित्र दिसून येते. वटावामुळे प्राप्त होणारे उत्पन्न हे विक्रीच्या लेखांकनाच्या वेळी नोंदण्यात येते. विक्रीची नोंद ही लेखा मानक-९ शी सुसंगत नसल्यामुळे वटावातील विक्रीचे समायोजन हे लेखा मानक-५ शी सुसंगत असायला हवे - त्या काळातील निव्वळ नफा वा तोटा, पूर्व कालावधीतील बाबी तसेच लेखे धोरणातील बदल. यामुळे वर्षभरातील नफा व तोटा दर्शवित असलेल्या आर्थिक ताळेबंदात त्याचे विवरण योग्य प्रकारे आलेले नाही. धारक कंपनीने लेखा मानक ९ व लेखा मानक ५ यांचे योग्यरित्या पालन केलेले आढळून आले नाही. त्यामुळे ह्या दोहोंच्या एकत्रित परिणामाचे मापन करता आलेले नाही.	शासकीय विभागांशी असलेल्या आमच्या विपणन उलाढालीची विक्री बीजके संबंधित विभागावर चढविली जातात. परंतु जानेवारी, फेब्रुवारी व मार्च महिन्यात चढविलेल्या बीजकांचा परिणाम पुढील वित्तीय वर्षात दिसून येतो (बटवडा चलानावरील तारीख पुढील वित्तीय वर्षामध्ये असल्यामुळे). तसेच शासकीय विभागांमधून लेख्यांसाठी रोखीच्या पद्धतीचा अवलंब करण्यात येतो तर महामंडळाकडून लेख्यांसाठी वाणिज्या पद्धतीचा अवलंब करण्यात येतो. या दोहोंमध्ये फरक असल्यामुळे प्रस्तुत समस्या उद्भवते. लेखा मानकांमधील फरकामुळे या वास्तविक परिस्थितीवर उपाय करणे आम्हाला शक्य होत नाही.

वित्तीय वर्ष २०२१-२२ च्या लेखापरीक्षकांच्या अहवालास उत्तर (एकत्रित)

	लेखापरीक्षकांचे भाष्य	व्यवस्थापनाचे भाष्य
	प्रतिकूल मतासाठी आधार	
५.	(अ) एकत्रित वित्तीय विवरणपत्राच्या टीप क्र. ७ कडे आम्ही आपले लक्ष वेधू इच्छितो. यामध्ये धनकोंचे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) कायद्यांतर्गत वर्गीकरण न करणे आणि त्यांना आरबीआयद्वारे अधिसूचित केलेल्या दराच्या तिप्पट दराने १८० दिवसांपेक्षा जास्त देय असलेल्या व्याजाची तरतूद करणे या बाबी येतात. या खात्यांमधील दायित्वांचे, काही असल्यास, महामंडळाने परिमाण केलेले नाही. त्यामुळे, आम्ही त्याअंतर्गत व्याजाची तरतूद (जर असेल तर) आणि लेखापरीक्षणाखालील वर्षाच्या नफ्यावर त्याचा योग्य परिणाम निश्चित करण्यात असमर्थ आहोत. एमएसएमईडी पक्षांचे निर्धारण झालेले नसल्यामुळे, संबंधित कायद्यानुसार आवश्यक असलेले खुलासे महामंडळाने केले नाहीत.	लघुउद्योग गटाला देय असलेल्या विलंबित रकमेवरील व्याजाची प्रकरणे आढळली नाहीत. शासकीय विभागाकडून महामंडळाला रक्कम प्राप्त झाल्यानंतर, महामंडळाने ती रक्कम देण्यास ४५ दिवसांपेक्षा जास्त उशीर केल्याचे एकही उदाहरण नाही. त्यामुळे व्याजासाठी कोणतीही आर्थिक तरतूद करण्यात आलेली नाही.
५.	(ब) आमच्या लेखापरीक्षणादरम्यान आम्ही केलेल्या तपासण्यांच्या आधारे लेखा विकेंद्रित केलेल्या लेखाशी संबंधित काही प्रणाली/नियंत्रण समस्या आढळून आल्या ज्यामुळे लेखासंबंधी त्रुटी निर्माण झाल्या आहेत. उदा. ऋण सूची, अपुऱ्या वजावटीची नोंद, लेखाप्रणाली (टॅली ईआरपी) मध्ये मागील दिनांकित नोंदी.	नोंद घेण्यात आली असून संबंधित कार्यवाहीस सुरुवात करण्यात आली आहे.
६.	खाली नमूद केलेल्या असुरक्षित किंवा बिनव्याजी कर्जावर, देय असलेल्या व्याजाची सन २००७-८ करिता लेखापुस्तकात तरतूद करण्यात आलेली नाही. **खात्याचे नाव** — **थकबाकी रक्कम (रु.)** उद्योग व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन सुशिक्षित बेरोजगार कर्ज योजना — ०.१३ कोटी उद्योग व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन बीज भांडवल योजना (३.५ टक्के) — ०.६४ कोटी (एकत्रित वित्तीय विवरणांमधील नोंद क्र. ५ नुसार.)	महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडातर्फे लाभार्थ्यांना साह्य देऊ केले आहे. त्यानुसार, १९८०-८२ मध्ये महामंडळाने लाभार्थ्यांना कर्जे दिली होती. हे व्यवहार होऊन बराच काळ उलटून गेलेला असल्याने व शासनाकडून लाभार्थ्यांना कर्जवसुलीबाबत विचारणा न झाल्याने ती मुद्दलाची रक्कम खातेवह्यांमध्ये पडून आहे. तसेच महामंडळाने २००७-०८ पर्यंत व्याजाची तरतूद केली होती. ही व्याजाची रक्कम देखील शासनाला देय नसल्याने पुढील तरतूद केलेली नाही.
७.	महामंडळाची अंतर्गत नियंत्रण यंत्रणा कमकुवत आहे आणि ती महामंडळाच्या व्यवसायाच्या आकारमानाशी आणि व्याप्तीशी सुसंगत नाही. प्रणाली विविध स्तरांवर फसवणूक, फेरफार आणि गैरव्यवहारास देखील संवेदनक्षम आहे. शिवाय महामंडळाच्या कामकाजाची कोणतीही प्रमाणित कार्यपद्धती नाही.	आम्ही अंतर्गत नियंत्रण सुव्यवस्थित करीत आहोत. त्यासाठी लेखे आणि अंतर्गत लेखापरीक्षण निर्देशपुस्तिका तयार करण्यात आल्या असून त्या पुस्तिका संबंधित ठिकाणी अंतर्गत नियंत्रणासंदर्भात योग्य पावले उचलण्यासाठी अथवा कृती करण्यासाठी पाठविण्यात आल्या आहेत.

वित्तीय वर्ष २०२१-२२ च्या लेखापरीक्षकांच्या अहवालास उत्तर (एकत्रित)

	लेखापरीक्षकांचे भाष्य	व्यवस्थापनाचे भाष्य
	प्रतिकूल मतासाठी आधार	
८.	तरतूद (अ) व्यवस्थापनाने प्रमाणित केल्यानुसार, कॉर्पोरेशनकडे ४६.५० कोटी रुपयांची असुरक्षित व्यापार प्राप्य रक्कम (ट्रेड रिसीव्हेबल्स) आणि व्यापारी देय रकमांमध्ये (ट्रेड पेएबल्स) ५.६१ कोटी रुपयांची नावे शिल्लक (डेबिट बॅलन्स) गेल्या तीन वर्षांहून अधिक काळापासून समायोजनासाठी (ॲडजस्टमेंट) प्रलंबित आहे. महामंडळाने या प्राप्य आणि नावे शिलकीच्या विरुद्ध केवळ ४.९६ कोटी रुपयांची तरतूद (प्रॉव्हिजन) केली आहे. परिणामी, यामध्ये ४१.७२ कोटी रुपयांची कमी तरतूद (शॉर्ट प्रॉव्हिजन) झाली आहे. (लेखांच्या नोंदींमधील नोंद क्रमांक १५ पहा). याशिवाय, सध्या न्यायालयीन वादात (लिटिगेशन) अडकलेली रु. २१.१० कोटी रुपयांची व्यापार प्राप्य रक्कम देखील आहे.	एकूण व्यापारी येणी रु. ४६.५० कोटी आहेत. त्यापैकी लेखेपुस्तकामध्ये रु. ४.९६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ३ वर्षांहून अधिक कालावधीसाठी व्यापारी येणी रु. ४५.०७ कोटी आहेत. त्यांचे विश्लेषण पुढीलप्रमाणे : **कृती** — **रक्कम** विपणन — १०,६०,६४,०८०.१७ कोळसा — २,३२,०१,६०७.३९ कच्चा माल व इतर — २१,०४,६९,३५३.५८ भाडे — ११,०९,४६,१८६.८९ कच्च्या मालाच्या व्यवहारात गुंतलेली कायदेशीर रक्कम रु. २१,०९,८५,५२८ एवढी आहे. विपणन व्यवहारामध्ये आम्ही विपणनाची छानबीन हाती घेतली आहे आणि छाननीनंतर लेखा परीक्षेचा परिणाम वित्तीय वर्ष २०१५-१६ ते २०१७-१८ मध्ये देण्यात आला. उर्वरित विपणन कर्जदार अजूनही थकबाकीदार आहेत आणि जुन्या नोंदी उपलब्ध नसल्यामुळे पुढील तपासणी केली गेली नाही. विपणन देणेदार/ विविध धनको यांच्या ३ वर्षांपेक्षा जास्त कालावधीच्या नावे शिलकांचा मेळ घालणे आवश्यक आहे. ऋणको आणि धनको यांची रक्कम अत्यंत मोठी असल्याने आणि त्याचा नफा-तोटा पत्रकावर होणारा परिणाम मोठा असणार असल्याने, आम्ही हिशोब पुस्तकांमध्ये कोणतीही आर्थिक तरतूद केलेली नाही.

वित्तीय वर्ष २०२१-२२ च्या लेखापरीक्षकांच्या अहवालास उत्तर (एकत्रित)

	लेखापरीक्षकांचे भाष्य	व्यवस्थापनाचे भाष्य
	प्रतिकूल मतासाठी आधार	
९.	उपदान दायित्व आणि रजा रोखीकरण महामंडळाने आपल्या हिशोब पुस्तकात उपदान दायित्व आणि रजा रोखीकरणाची रक्कम अनुक्रमे रु. ८,०३,३६,०७५/- आणि रु. १,८९,७३,२०६/- अशी नोंदवली आहे. विमा गणितीय मूल्यमापन अहवालानुसार उपदान दायित्व आणि रजा रोखीकरणाची रक्कम अनुक्रमे रु. ५,०२,५०,०५५/- आणि रु. १,७२,२७,३१५/- इतकी आहे. भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या (एलआयसी) उपदान निधी पत्रकातील रु. १,५३,९०,६३६/- या रकमेच्या तुलनेत, महामंडळाच्या ताळेबंदात मालमत्तेच्या बाजूला दिसणारी उपदान निधीची एकूण रक्कम रु. १६,४६,९३,९१२/- इतकी आहे. हिशोब पुस्तकातील आकडे आणि उपदान दायित्वाचा मूल्यमापन अहवाल तसेच एलआयसी उपदान निधी पत्रक यांच्यातील आकड्यांमध्ये न जुळणारे फरक (तफावत) आहेत.	सनदी लेखापाल संस्थेची नियुक्ती करून उपदानाच्या खात्यांची सखोल छाननी केली जाईल आणि त्यांच्या सल्ल्यानुसार हिशोब पुस्तकात आवश्यक त्या नोंदी केल्या जातील.
१०.	वस्तुसूचीचे मूल्यमापन महामंडळाने आपल्या वस्तुसूचीचे मूल्यमापन लेखा मानक २ नुसार केलेले नाही. महामंडळाने ३१ मार्च २०२२ रोजीची मूळ किंमत किंवा निव्वळ वसुलीयोग्य मूल्य निश्चित करण्यासाठी विहित तत्त्वांचा वापर केलेला नाही आणि कोणत्याही अधिकृत मूल्यमापकाची (व्हॅल्यूअरची) नियुक्तीही केलेली नाही. अशा मूल्यमापनाच्या अभावामुळे, या अ-पालनाचा वस्तुसूची, नफा किंवा तोटा आणि संबंधित खुलाशांवर नेमका काय परिणाम झाला आहे, हे ठरवण्यास आम्ही असमर्थ आहोत. ३१ मार्च २०२२ अखेरचा साठा हिशोब पुस्तकात मूळ किमतीवर म्हणजेच ७१.९८ लाख असा नोंदवला गेला आहे.	महामंडळातर्फे नोंदणीकृत मूल्यमापकाची नियुक्ती करून साठ्याचे योग्य मूल्यमापन करून घेण्यात येईल.

वित्तीय वर्ष २०२१-२२ च्या लेखापरीक्षकांच्या अहवालास उत्तर (एकत्रित)

	लेखापरीक्षकांचे भाष्य	व्यवस्थापनाचे भाष्य
	प्रतिकूल मतासाठी आधार	
१	आम्ही दुय्यम (पोषक) कंपनीच्या वित्तीय विवरणांचे लेखापरीक्षण केलेले नाही. त्यांच्या नोंदींनुसार ३१ मार्च २०२२ रोजी संपलेल्या वर्षासाठी एकत्रित वित्तीय विवरणांमध्ये एकूण मालमत्ता रु. २,५५,०१,८६२/-, तर एकूण महसूल (उत्पन्न) रु. ४५,९५,६८८/- आणि एकूण खर्च रु. ४५,९५,६८८/- असा दर्शवण्यात आला आहे. या वित्तीय विवरणांचे लेखापरीक्षण इतर लेखापरीक्षकांद्वारे करण्यात आले असून त्यांचे अहवाल व्यवस्थापनाने आम्हाला उपलब्ध करून दिले आहेत. त्यामुळे या दुय्यम कंपनीच्या समाविष्ट रकमा आणि खुलाशांच्या मर्यादेत एकत्रित वित्तीय विवरणांवरील आमचे मत, तसेच कायद्याच्या कलम १४३ च्या उप-कलम (३) आणि (११) नुसार आमचा अहवाल, संपूर्णपणे केवळ त्या इतर लेखापरीक्षकांच्या अहवालांवर आधारित आहे.	
२	आम्ही आपले लक्ष खात्यांच्या नोंदींमधील नोंद क्रमांक ४, ५, ६, ७, ८, १२, १३, १५, १७, १८ कडे वेधू इच्छितो.	सदर नोंदींमधील टंकलेखनाच्या (टायपिंगच्या) चुका सुधारण्यात आल्या आहेत.
३	ठाणे येथे महामंडळाच्या मालकीच्या काही मालमत्ता भाडेकरूंच्या ताब्यात आहेत, परंतु कायदेशीर वादामुळे आणि वैध भाडे कराराच्या अभावामुळे भाड्याचे उत्पन्न निश्चित करता येत नाही, परिणामी हिशोब पुस्तकात त्याची नोंद केलेली नाही.	
४	विक्री कर, सेवा कर, आयकर, कर वजावट (टीडीएस), व्यवसाय कर आणि कंत्राटी काम कर (वर्क कॉंट्रॅक्ट टॅक्स) यांच्या कर आकारणीच्या स्थितीचा तसेच इतर कायदेशीर प्रकरणांचा तपशील उपलब्ध नसल्यामुळे, त्या संदर्भातील संभाव्य दायित्व (कर्ज) निश्चित करता येत नाही; विविध वर्षांची प्रकरणे संबंधित अपिलीय प्राधिकरणांकडे प्रक्रियेत असल्याने त्यांची अचूक रक्कम निश्चित करणे शक्य नाही.	विक्री कर, आयकर, कर वजावट आणि इतर लागू करांशी संबंधित प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी महामंडळाने 'मेसर्स टॅक्सपर्ट प्रोफेशनल प्रायव्हेट लिमिटेड, सनदी लेखापाल, मुंबई' यांची नियुक्ती केली होती. प्रलंबित सेवा कराचे प्रकरण बंद करण्यात आले असून कर आकारणी आदेशानुसार देय रक्कम भरण्यात आली आहे. याव्यतिरिक्त, महामंडळाने प्रलंबित महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (व्हॅट) प्रकरणांसाठी अभय योजनेचा (ॲम्नेस्टी स्कीम) लाभ घेतला आहे. या योजनेच्या अनुषंगाने अशी सर्व प्रकरणे निकाली काढण्यात आली असून वित्तीय वर्ष २०२२-२३ आणि वित्तीय वर्ष २०२३-२४ दरम्यान संबंधित थकबाकी पूर्णपणे भरण्यात आली आहे.

अंबावत जैन आणि असोसिएट्स
सनदी लेखापाल

Registered with Limited Liability under The Limited Liability Partnership Act, 2008 with Registration No. AAA - 7120
Regd. Office: Office No. 40, Morarji Velji Bldg, 1st floor, 9/15, Dr. M.B. Velkar Street, Marine Lines (East), Mumbai – 400002.
Tel: +91 22 43153000 **Fax:** +91 22 43153015. **email:** aja@ajallp.com. Website: www.ajallp.com

स्वतंत्र सनदी लेखापालांचा स्वतंत्र आर्थिक विवरणाबाबतचा अहवाल

प्रति,
सदस्य, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित

स्वतंत्र वित्तीय विवरणाबाबतचा अहवाल

आम्ही, सोबत जोडलेल्या महाराष्ट्र लघुउद्योग महामंडळाच्या दिनांक ३१ मार्च २०२२ रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षाचा ताळेबंद तसेच त्याच आर्थिक वर्षाच्या नफा–तोटा व रोख ओघ विवरणपत्रांचे तसेच वैशिष्ट्यपूर्ण लेखा पद्धतीचा सारांश आणि स्पष्टीकरणात्मक माहितीचे लेखा परीक्षण केले आहे.

आमच्या मते, प्रतिकूल मताच्या परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या बाबींच्या महत्त्वानुरूप संकलित आर्थिक विवरणपत्रांवरून कंपनी अधिनियम, २०१३ नुसार योग्य ती माहिती प्राप्त होत नाही. त्यामुळे दिनांक ३१ मार्च २०२२ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षातील भारतात सर्वसाधारणपणे स्वीकारलेल्या लेखा तत्त्वानुसार कंपनीच्या महामंडळाच्या कामकाजाचे, नफा तोटा ताळेबंदाबाबतचे आणि रोख ओघ विवरणपत्राबाबत त्याच दिनांकास समाप्त होणाऱ्या वर्षातील रोख ओघाच्या पुष्टीबाबतचे सत्य व यथार्थ चित्रण देता येत नाही.

प्रतिकूल मताकरिता आधार

खालील परिच्छेद १ ते १० मध्ये वर्णन केलेल्या बाबीकडे आम्ही लक्ष वेधू इच्छितो. स्वतंत्र वित्तीय विवरणपत्रांवर या बाबींचा (मूल्यांकन केलेल्या किंवा अन्यथा) स्वतंत्रपणे किंवा एकत्रितपणे होणारा परिणाम, काही प्रकरणांमध्ये पुरेशा व योग्य लेखापरीक्षण पुराव्याच्या अभावामुळे ओळखता न आल्यामुळे, महत्त्वाचा आहे

१. समायोजन न झालेली शिल्लक रक्कम आणि तिचे वर्गीकरण व सादरीकरण:

(अ) विविध सामान्य खात्यांमध्ये दीर्घकाळापासून प्रलंबित/समायोजन न झालेली शिल्लक रक्कम आहे, तसेच विविध सामान्य खाती परस्परविनिमयाने वापरण्यात येत आहेत, त्यामुळे चुकीची शिल्लक निर्माण झाली आहे. समायोजनाच्या अभावामुळे या शिलकीची अचूकता यावर आम्ही टिप्पणी करू शकत नाही.

वरील खात्यांमध्ये प्रलंबित असलेल्या जुन्या शिलकींची समायोजन व निकालीकरणामुळे होणाऱ्या समायोजनांचा परिणाम आणि वसुली न होणे किंवा अंशतः वसुली होणे किंवा रक्कम परत घेणे यामुळे होणारा संभाव्य नफा/तोटा याचे मूल्यांकन करण्यात आलेले नाही.

(ब) आवश्यक माहिती/तपशीलांच्या अभावामुळे मालमत्ता व दायित्वांचे वर्गीकरण आणि त्यांचे चालू व न चालू अशा स्वरूपात विभाजन हे लेखा मानकांच्या आवश्यकतेनुसार आहे की नाही यावर आम्ही टिप्पणी करू शकत नाही.

(क) स्वतंत्र वित्तीय विवरणपत्रातील नोंद क्र. ६ कडे आम्ही लक्ष वेधू इच्छितो. यामध्ये रु. ३५.८६ कोटी (वित्तीय वर्ष २०–२१ ३६.१३ कोटी) 'इतरांकडे देय' म्हणून दाखवले गेले आहे, जे व्यापार देयके – चालू अंतर्गत समाविष्ट आहेत. सदर रकमेचे पक्षानुसार तपशील व शिल्लक पुष्टी प्रमाणपत्र आम्हाला पडताळणीसाठी उपलब्ध करून

देण्यात आलेले नाही. परिणामी, सदर दायित्वाचे अस्तित्व व त्याचा स्वतंत्र वित्तीय विवरणपत्रावर होणारा संभाव्य परिणाम यावर आम्ही टिप्पणी करू शकत नाही.

२. बाह्य शिल्लक पुष्टीकरण/समायोजन:

स्वतंत्र वित्तीय विवरणपत्रातील नोंद क्र. ६, १५ आणि १७ कडे आम्ही लक्ष वेधू इच्छितो. कर्ज व आगाऊ रक्कम, विविध इतर डेबिट/क्रेडिट शिल्लक आणि शासनाकडून प्राप्त देणी या पुष्टीकरण, समायोजन आणि त्यानंतरच्या सुधारणा यांच्या अधीन आहेत. तृतीय पक्ष शिल्लक पुष्टीकरणाची प्रणाली महामंडळामध्ये अवलंबली जात नाही. पुस्तकी शिल्लकांसाठी लेखा मानके ५०५ नुसार बाह्य पुष्टीकरण मिळवण्यासाठी आवश्यक संपर्क तपशील उपलब्ध नव्हते. योग्य नोंदी/संपर्क तपशीलांच्या अभावामुळे पुस्तकी शिल्लकांची अचूकता यावर आम्ही टिप्पणी करू शकत नाही.

३. गोदाम आणि कार्यालय भाडे प्राप्त करणे या शीर्षकाखालील विविध खाती समायोजित केलेली नाहीत. त्यामुळे गोदाम भाडे प्राप्त झालेले व प्राप्त करायचे तसेच भाडे दिलेले व देय असलेले यांची अचूकता लेखा पुस्तकांमध्ये नमूद केलेली आहे की नाही यावर आम्ही टिप्पणी करू शकत नाही. एकूण वसूलपात्र भाड्याची रक्कम रु. ९,४७,८९,५११/- असून, त्यापैकी रु. ५,८१,३५,०४१/- इतकी रक्कम कायदेशीर वादात अडकलेली आहे.

४. महामंडळाने भारतीय सनदी लेखापालांच्या संस्थेद्वारे जारी केलेल्या काही लेखा मानकांचे पूर्णपणे पालन केलेले नाही, याचे तपशील पुढीलप्रमाणे: महामंडळ खरेदी व विक्रीची नोंद विक्रेत्याने खरेदीदाराला माल हस्तांतरित केल्यानंतर आणि त्यासंबंधित जोखीम व लाभ हस्तांतरित झाल्यानंतर न करता केवळ पुरवठादारांकडून बिल प्राप्त झाल्यानंतर करीत आहे. महसूल ओळखण्याची ही पद्धत लेखा मानक ९ – महसूल ओळख नुसार सुसंगत नाही. यामुळे लेखापरीक्षण वर्षातील महामंडळाच्या खरेदी व विक्रीचे चित्र चुकीचे व असंगत सादर होते. सवलत उत्पन्नाची नोंद विक्रीच्या नोंदीच्या वेळी केली जात आहे. कारण विक्रीची नोंद लेखा मानक ९ नुसार सुसंगत नाही, त्यामुळे सवलत उत्पन्नाची समायोजन लेखा मानक ५ – संबंधित कालावधीतील निव्वळ नफा किंवा तोटा, मागील कालावधीतील बाबी व लेखा धोरणांतील बदल यानुसार करणे आवश्यक होते. हे समायोजन करण्यात आलेले नाही. त्यामुळे नफा-तोटा विवरणपत्राद्वारे वर्षातील तोट्याचे चुकीचे व असंगत चित्र सादर होते. महामंडळाने लेखा मानक ९ आणि लेखा मानक ५ चे पूर्ण पालन केलेले नाही आणि त्याचा परिणाम मोजता आलेला नाही.

५. इतर बाबी

(अ) स्वतंत्र वित्तीय विवरणपत्रातील नोंद क्र. ६ कडे लक्ष वेधू इच्छितो. यामध्ये सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (MSME) कायद्यानुसार देयकांचे वर्गीकरण करण्यात आलेले नाही. अशा पक्षांना ४५ दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी देय असलेल्या रकमेवर आरबीआयद्वारे अधिसूचित दराच्या तीनपट दराने व्याज देण्याची तरतूद करण्यात आलेली नाही. या बाबतीत कोणतेही दायित्व असल्यास, त्याचे मूल्यांकन महांडळाने केलेले नाही. त्यामुळे आवश्यक व्याज तरतूद (असल्यास) व त्याचा लेखापरीक्षण वर्षातील नफ्यावर होणारा परिणाम निश्चित करता आलेला नाही. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग पक्षांची ओळख न झाल्यामुळे संबंधित कायद्यानुसार आवश्यक प्रकटीकरण महामंडळाने केलेले नाही.

(ब) लेखापरीक्षणादरम्यान केलेल्या तपासणीनुसार, लेखा प्रणाली/नियंत्रणाशी संबंधित पुढील त्रुटी आढळून आल्या- गोदामातील वस्तुसूचीची संख्या उणे (ऋण) असणे, तसेच लेखा सॉफ्टवेअर (Tally ERP) यामध्ये मागील तारीखेच्या नोंदी करण्यावर निर्बंध लागू न करणे.

६. खालील असुरक्षित कर्जांवर देय व्याजासाठी कोणतीही तरतूद २००७-०८ पासून कंपनीच्या नोंदींमध्ये करण्यात आलेली नाही:

विभागाचे नाव	थकबाकी रक्कम (रु.)
उद्योग व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन सुशिक्षित बेरोजगार कर्ज योजना	०.१३ कोटी
उद्योग व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन बीज भांडवल योजना (३.५ टक्के)	०.६४ कोटी

(स्वतंत्र वित्तीय विवरणांमधील नोंद क्र. ४ नुसार)

७. महामंडळाची अंतर्गत नियंत्रण यंत्रणा कमकुवत आहे आणि ती महामंडळाच्या व्यवसायाच्या आकारमानाशी आणि व्याप्तीशी सुसंगत नाही. प्रणाली विविध स्तरांवर फसवणूक, फेरफार आणि गैरव्यवहारास देखील संवेदनक्षम आहे. शिवाय महामंडळाच्या कामकाजाची कोणतीही प्रमाणित कार्यपद्धती नाही.

८. तरतूद

कंपनीच्या व्यवस्थापनाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार महामंडळाच्या व्यापार प्राप्तीची असुरक्षित येणी रु. ४६.५० कोटी आहेत आणि देय व्यापार नावे बाकी रक्कम रु. ५.६१ कोटी आहे व ती तीन वर्षांहून अधिक कालावधीच्या समायोजनासाठी प्रलंबित आहे. त्याच्या तुलनेत अवघी रु. ४.९६ कोटी एवढी रक्कम परत मिळणे अपेक्षित आहे. त्यामुळे रु. ४७.१५ कोटी एवढ्या रकमेची अल्पतरतूद करण्यात आली आहे. (लेखे टीप १५ आणि १७ पाहा). याव्यतिरिक्त, अशी काही व्यापारी प्राप्य रक्कम देखील आहे जी कायदेशीर वादात अडकलेली असून तिची एकूण रक्कम रु. २१.१० कोटी इतकी आहे.

९. महामंडळाने आपल्या हिशोब पुस्तकात उपदान दायित्व आणि रजा रोखीकरणाची रक्कम अनुक्रमे रु. ८,०३,३६,०७५/- आणि रु. १,८९,७३,२०६/- अशी नोंदवली आहे. विमा गणितीय मूल्यमापन अहवालानुसार उपदान दायित्व आणि रजा रोखीकरणाची रक्कम अनुक्रमे रु. ५,०२,५०,०५५/- आणि रु. १,७२,२७,३१५/- इतकी आहे. भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या उपदान निधी पत्रकातील रु. १,५३,९०,६३६/- या रकमेच्या तुलनेत, महामंडळाच्या ताळेबंदात मालमत्तेच्या बाजूला दिसणारी उपदान निधीची एकूण रक्कम रु. १६,४६,९३,९१२/- इतकी आहे. हिशोब पुस्तकातील संख्या, उपदान दायित्वाचा मूल्यमापन अहवाल तसेच भारतीय आयुर्विमा महामंडळ उपदान निधी पत्रक यांच्यातील संख्या जुळत नाहीत.

१०. कंपनीने आपल्या साठ्याचे मूल्यमापन 'लेखा मानक २ – साठ्याचे मूल्यमापन' नुसार केलेले नाही. कंपनीने ३१ मार्च २०२२ रोजीची मूळ किंमत किंवा निव्वळ वसुलीयोग्य मूल्य निश्चित करण्यासाठी विहित तत्त्वांचा वापर केलेला नाही आणि कोणत्याही अधिकृत मूल्यमापकाची नियुक्तीही केलेली नाही. अशा मूल्यमापनाच्या अभावामुळे, या अ-पालनाचा वस्तुसूची, नफा किंवा तोटा आणि संबंधित खुलाशांवर नेमका काय परिणाम झाला आहे, हे ठरवण्यास आम्ही असमर्थ आहोत. ३१ मार्च २०२२ अखेरचा साठा हिशोब पुस्तकात मूळ किमतीवर म्हणजेच रु. ७१.९८ लाख असा नोंदवला गेला आहे.

इतर बाबी :

१. लेखे टिप्पण्या क्र ४, ५, ६, ७, ८, १२, १३, १५, १७, १८ कडे आम्ही आपले लक्ष वेधू इच्छितो.

२. महामंडळाची ठाणे येथे मालमत्ता आहे परंतु त्यावर भाडेकरूंनी ताबा घेतला आहे. त्याचा कायदेशीर वाद सुरू आहे. तसेच वैध भाडे करार नसल्यामुळे भाड्याने मिळणाऱ्या उत्पन्नाची माहिती महामंडळाच्या हिशोबाशी पडताळणी करता येत नाही.

३. प्रलंबित विक्री कर, सेवा कर, आयकर, कर वजावट तसेच कंत्राटी करार कर (वर्क कॉन्ट्रॅक्ट टॅक्स) यांचे मूल्यमापन, इतर कायदेविषयक प्रकरणे, आकस्मिक दायित्वे यांबाबतची खात्रीलायक माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे अनेक वर्षे अपीलीय प्राधिकरणांकडे प्रलंबित असलेल्या या प्रकरणांबाबतची विद्यमान स्थिती समजून येत नाही. त्यामुळे त्यांचे विशिष्ट परिणामही कळून येत नाहीत.

आमच्या अहवालातून या बाबींवरील भाष्य अपेक्षित नाही.

इतर माहिती किंवा वित्तीय विवरणे आणि त्यावरील लेखापरीक्षकांच्या अहवालाव्यतिरिक्त माहिती

धारक कंपनीचे संचालक मंडळ इतर माहितीसाठी जबाबदार राहील. या माहितीमध्ये वित्तीय विवरणपत्र आणि

लेखापरीक्षकांचा अहवाल वगळून संचालक मंडळाच्या अहवालाचा समावेश असेल.

एकत्रित वित्तीय विवरणपत्रावरील आमच्या अभिप्रायामध्ये इतर माहितीचा समावेश नाही. त्याचप्रमाणे आम्ही त्यावर कोणताही ठोस निष्कर्ष काढलेला नाही.

एकत्रित वित्तीय विवरणपत्रावरील आमच्या लेखा परीक्षण अहवालासंबंधी आमची जबाबदारी केवळ इतर माहितीचे वाचन करणे आणि ते करताना ती माहिती वित्तीय विवरणपत्रांशी विसंगत असल्यास, किंवा लेखापरीक्षणामध्ये आम्हाला समजलेली माहिती सदोष दाखविली गेली असल्यास किंवा अनियमित असल्यास ती तपासणे एवढीच राहील.

आमच्या निरीक्षणानुसार जर इतर माहिती सदोष दाखविली गेली आहे असे आमच्या लक्षात आले तर त्या गोष्टी आमच्याकडून लक्षात आणून दिल्या जातील. परंतु, या संदर्भात अशा स्वरूपाचे काही लक्षात आणून देण्यासारखे नाही, असे आम्ही कळवित आहोत.

यवस्थापनाच्या तसेच एकत्रित वित्तीय विवरणपत्रांच्या नियामकांच्या जबाबदाऱ्या :

धारक कपंनीची वित्तीय स्थिती, वित्तीय कार्य, आणि रोख प्रवाह याबाबतची रास्त आणि सत्य परिस्थिती दर्शविण्याच्या दृष्टीने कंपनी कायदा, २०१३ (कायदा) मधील कलम १३३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या व भारतामध्ये स्वीकारली गेलेली लेखांकन तत्वे व लेखांकन मानकांनुसार तयार करण्यात आलेल्या या एकत्रित वित्तीय विवरणपत्रामध्ये निर्देशित केलेल्या बाबींसाठी कलम १३४(५) कंपनी कायदा,२०१३ (कायदा) नुसार धारक कंपनीचे संचालक मंडळ जबाबदार आहे.

त्याचप्रमाणे संचालक मंडळ हे धारक कंपनीच्या मत्तांचे रक्षण करण्याच्या अनुषंगाने तसेच लबाडी किंवा चुका यांच्यामुळे दाखविण्यात येणाऱ्या चुकीच्या विवरणांपासून मुक्त आणि कंपनीच्या सत्य आणि रास्त वित्तीय परिस्थितीचे चित्र उभे करणारे विवरणपत्र तयार करण्यासाठी लबाडी आणि इतर अनियमितता यांवर नियंत्रण ठेवण्याच्या अनुषंगाने पुरेशा लेखांकन अभिलेखांचे परिरक्षण करणे, योग्य लेखांकन धोरणांची निवड करून ती राबविणे, वाजवी आणि व्यवहार्य अंदाज करणे तसेच निर्णय घेणे, लेखा अभिलेखांच्या परिपूर्णता आणि बिनचुकतेसाठी पुरेशा अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे संकल्पन आणि परिरक्षण करणे यांसाठीही जबाबदार आहे.

जोवर व्यवस्थापन हे धारक कपंनीचे परिसमापन (लिक्वडेट) करणे अथवा कंपनीचे व्यवहार बंद करणे अथवा याशिवाय इतर कुठला वास्तववादी पर्याय शिल्लक न राहण्याच्या निर्णयापर्यंत येत नाही तोवर वित्तीय विवरणपत्र तयार करण्याच्या प्रक्रियेमध्ये धारक कंपनीच्या सुरू राहण्याच्या क्षमतेच्या मूल्यनिर्धारणासाठी संबंधित बाबी प्रकट करण्यासाठी व्यवस्थापन जबाबदार आहे.

धारक कपंनीच्या वित्तीय अहवाल प्रक्रियेवर निगराणी ठेवण्यासाठीही हे संचालक मंडळ जबाबदार आहे.

वित्तीय विवरणपत्रांसदर्भात लेखापरीक्षकांची जबाबदारी

एकत्रित वित्तीय विवरणपत्रे ही लबाडी किंवा चुकांमुळे दाखविण्यात येणाऱ्या सदोष अहवालांपासून मुक्त असावीत याची वाजवी हमी मिळवण्यासाठी त्यांची तपासणी करणे तसेच त्यानंतर आमचा अभिप्राय असलेला लेखापरीक्षकांचा अहवाल निर्गमित करणे हे आमचे उद्दिष्ट आहे. सयुक्तिक हस्तांतरण उच्च पातळीच्या हस्तांतरणाची हमी देत असले तरी सांविधानिक लेखापरीक्षकांनी केलेले लेखापरीक्षण हे चुकीची विवरणे शोधून काढण्यात नेहमीच यशस्वी ठरेल याची खात्री देता येत नाही. चुकीची विवरणे ही फसवणुकीच्या उद्देशाने अथवा त्रुटींमुळे नमूद केलेली असू शकतात व अशी विवरणे व्यक्तिगत किंवा सामूहिक रित्या घेण्यात आलेल्या आर्थिक निर्णयांवर जेव्हा गंभीर परिणाम करतात तेव्हाच महत्त्वाची मानली जातात.

सांविधानिक लेखापरीक्षकांच्या लेखा परीक्षणाचा एक भाग म्हणून संपूर्ण लेखा परीक्षणादरम्यान आम्ही व्यावसायिक अभिप्राय तसेच व्यावसायिक संशयवादाचा अवलंब करतो. याशिवाय आमची जबाबदारी पुढीलप्रमाणे आहेः

- फसवणुकीमुळे अथवा त्रुटींमुळे नोंदविण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण चुकीच्या विवरणांमुळे एकत्रित आर्थिक विवरणांमध्ये हानी होऊ शकेल अशी विवरणे ओळखणे आणि त्यांच्यामुळे होणाऱ्या हानीचा अंदाज घेणे, अशी हानी होण्यापासून रोखण्यासाठी उपयुक्त लेखापरीक्षण प्रक्रियांचे संकल्पन आणि त्या पार पाडणे, तसेच आमच्या अभिप्रायाच्या समर्थनार्थ पुरेसे आणि योग्य लेखापरीक्षणात्मक पुरावे प्राप्त करणे. फसवणुकीच्या उद्देशाने असलेले चुकीचे विवरण हे त्रुटीमुळे नोंदवलेल्या चुकीच्या विवरणापेक्षा अधिक धोकादायक असते, कारण फसवणुकीच्या उद्देशाने नोंदवण्यात आलेल्या चुकीच्या विवरणामध्ये संगनमत, बनावट दस्तावेज, अंतर्गत वगळणूक, विपर्यास, किंवा अंतर्गत नियंत्रणावरील अधिभाव इत्यादी गोष्टींचा समावेश असतो.

- अंतर्गत नियंत्रणाचे आकलन करणे व लेखापरीक्षणाशी संबंधित परिस्थितीनुरूप लेखापरीक्षण प्रक्रियांचे संकल्पन करणे. कंपनी कायदा २०१३ मधील कलम १४३(३)(१) नुसार, मंडळाकडे सक्षम अंतर्गत आर्थिक नियंत्रण यंत्रणा आहे किंवा कसे तसेच या अंतर्गत नियंत्रण यंत्रणेच्या परिणामकारकेसंबंधी आमचा अभिप्राय व्यक्त करण्यासंबंधी आम्ही जबाबदार आहोत.

- व्यवस्थापनाकडून वापरात असलेल्या लेखांकन अंदाज व संबंधित माहितीचे प्रकटन पद्धतींचे तसेच लेखांकन धोरणांच्या योग्यतेचे मूल्यमापन करणे. व्यवस्थापनाने व्यावसायिक निरंतरतेच्या (गोइंग कन्सर्न) तत्त्वावर आधारित केलेली लेखांकनाची अंमलबजावणी कितपत योग्य आहे, याचा निष्कर्ष काढणे; आणि प्राप्त झालेल्या लेखापरीक्षण पुराव्यांच्या आधारे, कॉर्पोरेशनच्या व्यवसाय निरंतर सुरू ठेवण्याच्या क्षमतेवर मोठी शंका निर्माण करू शकतील अशा काही घटना किंवा अनिश्चितता अस्तित्वात आहेत का, हे निश्चित करणे.

- अशा घटना अथवा पारिस्थितिक अनिश्चितता आढळल्यास तसा निष्कर्ष लेखापरीक्षकांच्या अहवालामध्ये नोंदवून, त्यासंबंधी सर्व माहिती उघड करून, व योग्य पुरावे गोळा करून त्यांकडे लक्ष वेधणे व गोळा केलेले पुरावे अपुरे असल्यास लेखापरीक्षकांच्या अहवालामध्ये बदल करणे. आमच्या अहवालातील निष्कर्ष हे आमचा अहवाल सादर झालेल्या तारखेपर्यंतच गृहित धरण्यात यावेत. तथापि, भविष्यातील घटना अथवा परिस्थिती यांमुळे मंडळाच्या कार्यरत राहण्याची क्षमता संपुष्टात येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

एकत्रित आर्थिक विवरणपत्रांचे एकूण सादरीकरण, संरचना, आणि आशय यांचे मूल्यमापन करणे, यामध्ये माहितीचे प्रकटन, एकत्रित आर्थिक विवरणपत्रांमध्ये रास्त सादरीकरण करणारे तलस्थित व्यवहार आणि परिस्थिती दर्शविण्यात आले आहेत किंवा कसे याचाही समावेश आहे.

इतर गोष्टींसह लेखापरीक्षणाची सुनियोजित व्याप्ती आणि कालनियोजन, आणि महत्त्वपूर्ण लेखांकन निष्कर्ष, अंतर्गत नियंत्रणामध्ये लेखापरीक्षणादरम्यान आमच्या निदर्शनास आलेली कुठलीही महत्त्वपूर्ण न्यूनता आदी बाबींसंबंधी ज्यांना शासन व्यवहारांचे अधिकार आहेत अशांशी आमच्याकडून संपर्क ठेवला जाईल.

संबंधित नैतिक आवश्यकता पुऱ्या करणाऱ्या, आणि ज्यांना संबंधित सर्व बाबी आणि व्यवहारांविषयी माहिती दिल्यावर जे ती माहिती सयुक्तिकरित्या स्वतंत्रपणे आणि जिथे आवश्यकता असेल तिथे योग्य ती खबरदारी घेऊन हाताळू शकतील तसेच आवश्यक त्या व्यवहारांचे ज्यांना स्वतंत्र अधिकार आहेत अशा व्यक्ती आमच्याकडून संपर्कात राहतील. अशा प्रकारचे स्वतंत्र अधिकार असलेल्या व्यक्तिंना कळविण्यात आलेल्या माहितीवरून ज्या बाबी एकत्रित वित्तीय विवरणपत्रांच्या दृष्टीने प्रस्तुत काळात महत्त्वाच्या आहेत त्या प्रमुख लेखांकन बाबी मानल्या जातील. ज्या बाबींच्या सार्वजनिक प्रकटनास कायदा अथवा नियमन प्रतिबंध करीत असेल अथवा अपवादात्मक परिस्थितीमध्ये आम्ही जर असे निर्धारित केले की एखादी बाब आमच्या अहवालामधून प्रकट केल्यास त्याचा जनहितावर प्रतिकूल परिणाम होईल अशा बाबींचे आमच्याकडून सादर होणाऱ्या लेखापरीक्षकांच्या अहवालामध्ये वर्णन केले जणार नाही.

इतर कायदेशीर आणि नियामक आवश्यकतांबाबतचा अहवाल :

१. केंद्र शासनाच्या कंपनी (लेखापरीक्षक अहवाल) अधिनियम, २०१६ (यापुढे 'आदेश' म्हणून संबोधिले जाईल) मधील कलम १४३ च्या उपकलम ११ अन्वये, आम्ही आदेशामधील परिच्छेद ३ व ४ नुसार याबाबतचे 'जोडपत्र अ' सोबत दिले आहे.

२. कायद्याच्या कलम १४३ (३) नुसार आम्ही नमूद करतो की :

अ) आम्ही मागणी केल्यानुसार, उपरोल्लेखित प्रतिकूल मतांबाबतच्या परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या बाबींव्यतिरिक्त, आमच्या माहिती व समजुतीनुसार उर्वरित सर्व बाबींच्या लेखापरीक्षणासाठी आवश्यक असलेली सर्व माहिती व स्पष्टीकरणे आम्हास प्राप्त झाली आहेत.

ब) उपरोल्लेखित प्रतिकूल मतांबाबतच्या परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या बाबींचे संभवनीय परिणाम सोडल्यास, समूहातर्फे ठेवण्यात आलेल्या लेखे नोंदवह्या व विवरण हे आमच्या परीक्षणानुसार नियमास अनुसरून असून आम्ही भेट न दिलेल्या शाखांमधून प्राप्त झालेली माहिती लेखा परीक्षणास पुरेशी आहे.

क) उपरोल्लेखित प्रतिकूल मताबाबतच्या परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या बाबी सोडल्यास एकत्रित ताळेबंद, एकत्रित नफा-तोटा विवरण व एकत्रित रोख ओघ विवरणपत्र, आम्ही भेट न दिलेल्या शाखांमधून प्राप्त झालेली विवरणे हे लेखापुस्तिकांनुरूप जुळलेले आहेत.

ड) उपरोल्लेखित प्रतिकूल मतांबाबतच्या परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या बाबी वगळता सदर एकत्रित ताळेबंद नफा तोटा विवरणपत्र व रोख ओघ विवरणपत्र हे कंपनी अधिनियम २०१४ च्या कलम १३३ (नियम ७ सह) नुसार आहेत.

इ) उपरोल्लेखित प्रतिकूल मतांबाबतच्या परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या बाबींमुळे, आमच्या मतानुसार, महामंडळाच्या कार्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो.

फ) दिनांक ३१ मार्च २०२२ रोजी संचालक मंडळाच्या अभिलेखावरील संचालकांकडून मिळालेल्या लेखी निवेदनांच्या आधारे, कायद्याच्या कलम १६४(२) नुसार ३१ मार्च २०२२ पर्यंत कोणत्याही संचालकास संचालक म्हणून नियुक्ती होण्यास अपात्र ठरविण्यात आलेले नाही.

ग) समूहाच्या अंतर्गत आर्थिक नियंत्रण उपलब्धता व या नियंत्रणाची परिणामकारकता यासाठी 'परिशिष्ट ब' मधील स्वतंत्र अहवाल पहा.

ह) लेखे व इतर बाबींच्या नोंदींबाबत व्यक्त केलेली प्रतिकूल मते ही उपरोल्लेखित प्रतिकूल मतांबाबतच्या परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या बाबींशी संबंधित आहेत.

ई) सदर महामंडळ हे संपूर्णपणे शासकीय मालकीची कंपनी असल्याने, ५ जून २०१५ रोजीच्या सामान्य वैधानिक नियम ४६३(ई) परिपत्रकानुसार, व्यवस्थापकीय मोबदल्याच्या (मानधनाच्या) मर्यादेबाबत असणारे कायद्याचे कलम १९७ आणि त्यासोबत वाचली जाणारी अनुसूची ५ ही तरतूद या महामंडळाला लागू होत नाही.

ज) कंपनी अधिनियमावली (लेखा परीक्षण व लेखा परीक्षक), २०१४ च्या नियम ११ नुसार, आमच्या मत व समजुतीनुसार तसेच आम्हास प्राप्त झालेल्या माहितीनुसार सदर लेखापरीक्षण अहवाल तयार करण्यात आला आहेः

(१) प्रलंबित दाव्यांचा समूहाच्या आर्थिक परिस्थितीवरील परिणाम हा समूहाने वित्तीय विवरणात उघड केला आहे. (वित्तीय विवरणामधील टिप्पणी क्र. ३३ पहावी.)

(२) उपरोल्लेखित प्रतिकूल मतांबाबतच्या परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या बाबींचे संभवनीय परिणाम सोडल्यास, समूहातर्फे संबधित लेखा मानके व कायद्यास अनुसरून वस्तूंच्या संभाव्य (असल्यास) नुकसानापोटी व्युत्पन्न करारांसह दीर्घमुदतीच्या करारांसाठी तरतूद केलेली आहे.

(३) चालू वर्षामध्ये समूहाच्या अहवालानुसार गुंतवणूकदारांचे प्रशिक्षण व संरक्षण निधी (आयईपीएफ) अंतर्गत भरणा करणे लागू होत नाही. त्यामुळे सदर भरण्यावरील प्रलंबित शुल्क भरण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) (अ) व्यवस्थापनाने असे प्रतिपादन केले आहे की, त्यांच्या संपूर्ण माहिती आणि विश्वासाच्या आधारे, खुल्या केलेल्या माहितीव्यतिरिक्त, कंपनीद्वारे इतर कोणत्याही व्यक्तीमध्ये किंवा संस्थेमध्ये कोणताही निधी (जो वैयक्तिकरित्या किंवा एकूण स्वरूपात महत्त्वपूर्ण आहे) गुंतवला गेलेला नाही (मग तो कर्जाऊ निधी, समभाग अधिमूल्य किंवा इतर कोणत्याही मार्गाने किंवा प्रकारचा निधी असो). तसेच ही गुंतवणूक मध्यस्थ पक्षाने, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, कंपनीच्या वतीने किंवा कंपनीद्वारे कोणत्याही प्रकारे निश्चित केलेल्या इतर व्यक्ती किंवा संस्थांमध्ये ('अंतिम लाभार्थी') कर्ज म्हणून किंवा गुंतवणूक म्हणून द्यावी, अथवा अंतिम लाभार्थ्यांच्या वतीने कोणतीही हमी, तारण किंवा त्यासारखी इतर सुरक्षा उपलब्ध करून द्यावी, अशा लेखी किंवा इतर कोणत्याही स्वरूपातील सामंजस्याच्या आधारे केलेली नाही.

(ब) व्यवस्थापनाने असे प्रतिपादन केले आहे की, त्यांच्या संपूर्ण माहिती आणि विश्वासाच्या आधारे, खुल्या केलेल्या माहितीव्यतिरिक्त, कंपनीला विदेशी संस्थांसह इतर कोणत्याही व्यक्तीकडून किंवा संस्थेकडून ('निधी पुरवणारे पक्ष') कोणताही निधी (जो वैयक्तिकरित्या किंवा एकूण स्वरूपात महत्त्वपूर्ण आहे) प्राप्त झालेला नाही. तसेच हा निधी कंपनीने, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, निधी पुरवणाऱ्या पक्षाच्या वतीने किंवा त्यांनी कोणत्याही प्रकारे निश्चित केलेल्या इतर व्यक्ती किंवा संस्थांमध्ये ('अंतिम लाभार्थी') कर्ज म्हणून किंवा गुंतवणूक म्हणून द्यावा, अथवा अंतिम लाभार्थ्यांच्या वतीने कोणतीही हमी, तारण किंवा त्यासारखी इतर सुरक्षा उपलब्ध करून द्यावी, अशा लेखी या इतर कोणत्याही स्वरूपातील सामंजस्याच्या आधारे प्राप्त झालेला नाही.

(क) सद्य परिस्थितीमध्ये वाजवी आणि योग्य ठरतील अशा मानलेल्या लेखापरीक्षा कार्यपद्धतींच्या आधारे, आमच्या निदर्शनास अशी कोणतीही बाब आलेली नाही, ज्यामुळे वरील (अ) आणि (ब) अंतर्गत दिलेल्या नियम ११(ई) च्या उप–कलम (१) आणि (२) मधील प्रतिपादनांमध्ये कोणतेही लक्षणीय चुकीचे विधान किंवा असत्य माहिती आहे, यावर विश्वास ठेवण्यास वाव मिळेल.

(५) कंपनीने चालू वर्षात कोणताही लाभांश घोषित केलेला नाही किंवा दिलेला नाही.

अंबावत जैन आणि असोसिएट्स
सनदी लेखापाल यांच्याकरिता
(संस्थेचा नोंदणी क्र. १०९६८१डब्ल्यू)

(कमल शर्मा)
भागीदार
सभासदत्व क्रमांक : ११२८४३

स्थळ : मुंबई
दिनांक : २६.०९.२०२५
UDIN: 25112843BMOCQX1296

लेखा परीक्षकांच्या अहवालाचे जोड पत्र – अ

आमच्या अहवालात सम तारखांचा संदर्भ आहे. आम्ही नमूद करतो की :

(i) **स्थिर मत्तेच्या संदर्भात** :

(अ) कंपनीतर्फे स्थिर मत्तेबाबत सर्वसाधारण परिणामात्मक तपशील व मत्तेची स्थिती यासह संपूर्ण तपशील दर्शविणारा योग्य तो अभिलेख ठेवलेला नाही.

(ब) कंपनीच्या स्वरूपाची व्यापकता व तिच्या मत्तेचा प्रकार पाहता मत्तेची नियमित कालावधीनंतर प्रत्यक्ष पडताळणी व्हावयास हवी परंतु ती करण्यासाठी आवश्यक असलेला कार्यक्रम कंपनीकडे नाही.

(क) आम्हास प्राप्त झालेल्या माहिती, स्पष्टीकरण व अभिवेदनाच्या आधारे कंपनीने चालू वर्षात कुठलीही स्थिर मत्ता ही पूर्णतः किंवा अंशतः निकाली काढलेली नाही.

(ड) आमच्या मते आणि आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणांनुसार तसेच कंपनीच्या नोंदींच्या (अभिलेखांच्या) आमच्या तपासणीच्या आधारे, सर्व स्थावर मालमत्तांची मालकी हक्क दस्तऐवज (खरेदीखत) कंपनीच्या नावावर आहेत.

(इ) वित्तीय वर्षात, कंपनीने नोंदणीकृत मूल्यमापकाकडून प्राप्त झालेल्या मूल्यमापनाच्या आधारे आपल्या मालमत्ता, संयंत्र आणि उपकरणे (वापर अधिकाराच्या मालमत्तेसह) आणि अमूर्त मालमत्तांचे पुनर्मूल्यमपन केलेले नाही. त्यामुळे, ३१ मार्च २०२२ रोजी संपलेल्या कालावधीत सदर मालमत्तांच्या (मालमत्तेच्या वर्गाच्या) निव्वळ वहन मूल्याच्या (कॅरींग व्हॅल्यूच्या) एकूण रकमेत झालेला कोणताही सकारात्मक किंवा नकारात्मक बदल आम्ही निश्चित करू शकत नाही.

(फ) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणांनुसार आणि कंपनीच्या नोंदींच्या आमच्या तपासणीच्या आधारे, ''बेनामी व्यवहार (प्रतिबंध) कायदा, १९८८'' आणि त्यांतर्गत तयार केलेल्या नियमांनुसार बेनामी मालमत्ता बाळगल्याबद्दल कंपनीविरुद्ध कोणतीही कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आलेली नाही.

(ii) **स्थिर मत्तेच्या वस्तुसूचीसंदर्भात** :

(अ) चालू वर्षात महामंडळाकडून वस्तूंच्या साठ्याची प्रत्यक्ष पडताळणी झालेली नाही.

(ब) महामंडळाचा व्याप व त्याच्या व्यवसायाचे स्वरूप पाहता साठ्याच्या प्रत्यक्ष पडताळणी पद्धतीची अंमलबजावणी महामंडळाकडून नियमित कालावधीनंतर होणे आवश्यक आहे.

(क) चालू वर्षात महामंडळाने तयार मालाची प्रत्यक्ष पडताळणी केलेली नाही. त्यामुळे साठ्यामध्ये प्रत्यक्ष पडताळणीनंतर येणाऱ्या तफावतीबाबत भाष्य करणे शक्य नाही.

iii) आम्हाला प्राप्त झालेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १८९ अन्वये ठेवलेल्या नोंदवहीतील यादीमध्ये असलेल्या संस्थांना महामंडळाने कोणतीही कर्जे दिलेली नाहीत तसेच कंपनी अधिनियम, २०१३ कलम १८९ अन्वये ठेवलेल्या नोंदवहीतील यादीमध्ये नोंद करण्याजोग्या कोणत्याही संस्थेकडून कंपनीने कर्ज घेतलेले नाही.

iv) आम्हाला मिळालेल्या माहितीनुसार व आमच्या मते महामंडळाने अधिनियमाच्या कलम १८५ व १८६ मधील तरतूदींनुसार केलेली गुंतवणूक व कर्जे मान्य केली आहेत. महामंडळाने कोणतीही खात्री वा सुरक्षा दिलेली नाही.

v) कंपनीने जनतेकडून कोणत्याही ठेवी स्वीकारलेल्या नाहीत. त्यामुळे कंपनी कायदा २०१३ कलम ७३ ते ७६ अंतर्गत असलेले नियम लागू होणार नाहीत.

vi) केंद्र शासनाने कंपनीच्या कोणत्याही उत्पादनांसाठी कायद्याच्या कलम १४८ च्या उप–कलम (१) अंतर्गत

खर्चाच्या नोंदींची देखभाल करणे निर्दिष्ट केलेले नाही. त्यानुसार, आदेशाच्या परिच्छेद ३(६) ची तरतूद कंपनीला लागू होत नाही

vii) (अ) महामंडळाच्या नोंदींनुसार आणि आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणांनुसार, सेवा कर (रक्कम निश्चित न झालेली), कर वजावट (टीडीएस – रक्कम निश्चित न झालेली) आणि वस्तू व सेवा कर (जीएसटी) वगळता, महामंडळ भविष्य निर्वाह निधी, गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी, कर्मचारी राज्य विमा, आयकर, विक्री कर, संपत्ती कर, सीमा शुल्क, उत्पादन शुल्क, उपकर आणि इतर लागू असलेल्या निर्विवाद वैधानिक थकबाकीच्या रकमा संबंधित प्राधिकरणांकडे नियमितपणे जमा करत आहे. महामंडळाने कर वजावट (टीडीएस) भरण्यात कसूर केली असून त्यावर २९.४० लाख इतके दायित्व आहे, तथापि महामंडळाकडून यावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. महामंडळाच्या नोंदींनुसार आणि आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणांनुसार, आयकर, विक्री कर, संपत्ती कर, सीमा शुल्क, उत्पादन शुल्क आणि उपकर या संदर्भात ३१ मार्च २०२२ रोजी देय तारखेपासून सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी देय असलेली कोणतीही अविवाद्य रक्कम थकीत नाही.

ब) आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणांनुसार, खालील बाबी वगळता कोणत्याही कायदेशीर वादामुळे संबंधित प्राधिकरणांकडे जमा न केलेली अशी कोणतीही महत्त्वपूर्ण वैधानिक थकबाकी उर्वरित नाही:

तपशील	थकबाकी स्वरूप	संबंधित कालावधी	रक्कम (रु.)	ज्यांच्याकडे प्रलंबित आहे त्यांचा तपशील
आयकर	आयकर मागणी	२०११–१२	४६,६२,३९०	आयकर आयुक्त (अपील)

(viii) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणांनुसार आणि आम्ही तपासलेल्या कंपनीच्या नोंदींच्या आधारे, आयकर कायदा, १९६१ अंतर्गत चालू वर्षातील कर आकारणी दरम्यान अशी कोणतीही अघोषित उत्पन्न किंवा उत्पन्न म्हणून दाखवलेली रक्कम नाही, ज्याची हिशोब पुस्तकात नोंद केली गेलेली नाही. आम्हाला प्राप्त झालेल्या माहिती, स्पष्टीकरण व अभिवेदनानुसार कंपनीने वित्तीय संस्था, बँक किंवा रोखधारक यांच्याबाबतीतील दायित्वाची परतफेड करण्यास कसूर केलेली नाही. कंपनीने कुठल्याही ऋणपत्रांद्वारे कर्ज घेतलेले नाही.

(ix) (अ) आम्हाला दिलेल्या माहिती, स्पष्टीकरणे आणि प्रतिपादनांनुसार, महामंडळाने वित्तीय संस्था, बँक, सरकार किंवा ऋणपत्र (डिबेंचर) धारकांना त्यांच्या देय रकमांची परतफेड करण्यात कोणतीही कसूर केलेली नाही. महामंडळाकडे ऋणपत्रांच्या (डिबेंचर्सच्या) स्वरूपातील कोणतेही कर्ज घेतलेले नाही.

(ब) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणांनुसार आणि आमच्या लेखापरीक्षा कार्यपद्धतींच्या आधारे, आम्ही असे प्रमाणित करतो की, कंपनीला कोणत्याही बँकेने, वित्तीय संस्थेने, सरकारने किंवा कोणत्याही सरकारी प्राधिकरणाने 'हेतुपुरस्सर कसूरदार' (विलफुल डिफॉल्टर) म्हणून घोषित केलेले नाही.

(क) आमच्या मते आणि आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणांनुसार, मुदत कर्जाचा वापर ज्या हेतूंसाठी ती घेण्यात आली होती, त्याच हेतूंसाठी करण्यात आला आहे.

(ड) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणांनुसार, आम्ही राबवलेल्या कार्यपद्धतींच्या आधारे आणि कंपनीच्या वित्तीय विवरणांच्या सर्वसमावेशक तपासणीनुसार, आम्ही असे प्रमाणित करतो की, कंपनीने अल्पमुदतीसाठी उभारलेला कोणताही निधी दीर्घमुदतीच्या हेतूंसाठी वापरलेला नाही.

(इ) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणांनुसार आणि कंपनीच्या वित्तीय विवरणांच्या सर्वसमावेशक तपासणीच्या आधारे, आम्ही असे प्रमाणित करतो की, कंपनीने आपल्या दुय्यम कंपन्या, सहयोगी कंपन्या किंवा संयुक्त उपक्रमांच्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी किंवा त्या अनुषंगाने इतर कोणत्याही संस्थेकडून अथवा व्यक्तीकडून कोणताही निधी घेतलेला नाही.

(फ) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणांनुसार आणि आम्ही राबवलेल्या कार्यपद्धतींच्या आधारे, आम्ही असे प्रमाणित करतो की, कंपनीने आपल्या दुय्यम कंपन्या, संयुक्त उपक्रम किंवा सहयोगी कंपन्यांमध्ये धारण केलेल्या रोख्यांच्या (सिक्युरिटीजच्या) तारणावर चालू वर्षात कोणतेही कर्ज घेतलेले नाही.

(x) (अ) कंपनीने चालू वर्षात प्राथमिक समभाग विक्री (इनिशियल पब्लिक ऑफर) किंवा पुढील समभाग विक्री (फर्दर पब्लिक ऑफर) द्वारे (ऋण साधनांसह) कोणताही निधी उभारलेला नाही. त्यानुसार, या आदेशाच्या परिच्छेद ३(१०)(अ) अंतर्गत अहवाल देणे कंपनीला लागू होत नाही.

(ब) कंपनीने चालू वर्षात खासगी रितीने समभाग वाटप (प्रायव्हेट प्लेसमेंट) केलेले नाही आणि कायद्याच्या कलम ४२ व कलम ६२ च्या आवश्यकतांचे पालन करून ऋणपत्रांचे (डिबेंचर्सचे) साधारण समभागांमध्ये (इक्विटी शेअर्समध्ये) रूपांतर केलेले नाही. त्यानुसार, या आदेशाच्या परिच्छेद ३(१०)(ब) अंतर्गत अहवाल देणे कंपनीला लागू होत नाही.

(xi) (अ) भारतातील सर्वमान्य लेखापरीक्षा पद्धतींनुसार केलेल्या कंपनीच्या हिशोबपुस्तकांच्या आणि नोंदींच्या तपासणीदरम्यान, तसेच आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणांनुसार, चालू वर्षात कंपनीद्वारे किंवा कंपनीवर झालेला कोणताही लक्षणीय फसवणुकीचा (अपरातफरीचा) प्रकार आमच्या निदर्शनास आलेला नाही किंवा त्याबाबत कुठेही नोंद झालेली नाही, तसेच व्यवस्थापनाद्वारेही आम्हाला अशा कोणत्याही प्रकरणाची माहिती दिलेली नाही.

(ब) भारतातील सर्वमान्य लेखापरीक्षा पद्धतींनुसार केलेल्या कंपनीच्या हिशोबपुस्तकांच्या आणि नोंदींच्या तपासणीदरम्यान, तसेच आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणांनुसार, कायद्याच्या कलम १४३(१२) अंतर्गत 'नमुना एडीटी-४' मध्ये कोणताही अहवाल दाखल करण्याची आवश्यकता नव्हती. त्यानुसार, या आदेशाच्या परिच्छेद ३(११)(ब) अंतर्गत अहवाल देणे कंपनीला लागू होत नाही.

(क) भारतातील सर्वमान्य लेखापरीक्षा पद्धतींनुसार केलेल्या कंपनीच्या हिशोबपुस्तकांच्या आणि नोंदींच्या तपासणीदरम्यान, तसेच आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणांनुसार आणि व्यवस्थापनाने आमच्याकडे केलेल्या प्रतिपादनानुसार, चालू वर्षात कंपनीला कोणतीही गुप्तवार्ताहर किंवा गैरव्यवहार उघड करणाऱ्याची (व्हिसल-ब्लोअरची) तक्रार प्राप्त झालेली नाही. त्यानुसार, या आदेशाच्या परिच्छेद ३(११)(क) अंतर्गत अहवाल देणे कंपनीला लागू होत नाही.

(xii) कंपनी ही 'निधी कंपनी' नसल्यामुळे आणि निधी नियम, २०१४ तिला लागू होत नसल्यामुळे, या आदेशाच्या परिच्छेद ३(१२) अंतर्गत अहवाल देणे कंपनीला लागू होत नाही.

(xiii) कंपनीने संबंधित पक्षांसोबत केलेले व्यवहार कायद्याच्या कलम १७७ आणि १८८ च्या तरतुदींचे पालन करून केले आहेत. अशा संबंधित पक्षांमधील व्यवहारांचा तपशील कायद्याच्या कलम १३३ अंतर्गत निर्दिष्ट केलेल्या लेखांकन प्रमाण १८ 'संबंधित पक्ष प्रकटीकरण'च्या आवश्यकतेनुसार वित्तीय विवरणांमधील नोंद क्रमांक ३४(ब) अंतर्गत खुला केला आहे.

(ixv) (अ) आमच्या मते आणि आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणांनुसार, कंपनीकडे कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३८ अन्वये अंतर्गत लेखापरीक्षा प्रणाली अस्तित्वात आहे.

(ब) आम्ही लेखापरीक्षणाधीन कालावधीसाठीच्या अंतर्गत लेखापरीक्षकांच्या अहवालांचा विचार केला आहे.

(xv) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणांनुसार आणि महामंडळाच्या नोंदींच्या आमच्या तपासणीच्या आधारे, महामंडळाने संचालक किंवा त्यांच्याशी संबंधित व्यक्तींशी कोणताही रोकडरहित (अ-रोख) व्यवहार केलेला नाही. त्यानुसार, या आदेशाचा परिच्छेद ३(१५) लागू होत नाही.

(xvi) (अ) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणांनुसार आणि महामंडळाच्या नोंदींच्या आमच्या तपासणीच्या आधारे, महामंडळाला भारतीय रिझर्व्ह बँक कायदा, १९३४ च्या कलम ४५-आयए अंतर्गत नोंदणी करण्याची आवश्यकता नाही.

(ब) कंपनीने चालू वर्षात बिगर-बँकिंग वित्तीय व्यवहार केलेले नाहीत. त्यानुसार, या आदेशाच्या परिच्छेद ३(१६)(ब) अंतर्गत अहवाल देणे कंपनीला लागू होत नाही.

(क) भारतीय रिझर्व्ह बँकेने तयार केलेल्या नियमांमधील व्याख्येनुसार कंपनी ही 'मुख्य गुंतवणूक कंपनी' (कोअर इन्व्हेस्टमेंट कंपनी) नाही. त्यानुसार, या आदेशाच्या परिच्छेद ३(१६)(क) अंतर्गत अहवाल देणे कंपनीला लागू होत नाही.

(ड) कंपनीच्या व्यवस्थापनाने दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणांच्या आधारे, या समूहाचा भाग असलेल्या समूहामध्ये कोणत्याही 'मुख्य गुंतवणूक कंपन्या' नाहीत. तथापि, व्यवस्थापनाने दिलेली माहिती अचूक आणि पूर्ण आहे की नाही, याचे आम्ही स्वतंत्रपणे मूल्यमापन केलेले नाही. त्यानुसार, या आदेशाच्या परिच्छेद ३(१६)(ड) अंतर्गत अहवाल देणे कंपनीला लागू होत नाही.

(xvii) कंपनीला एकूण रु. १.४७ कोटींचा तोटा झाला असून, त्यापैकी घसारा (मूल्यऱ्हास) रक्कम रु. २४.३९ लाख इतकी आहे आणि उर्वरित रु. १.२३ कोटी हा वित्तीय वर्षातील निव्वळ रोख तोटा आहे.

(xviii) चालू वर्षात वैधानिक लेखापरीक्षकांनी कोणताही राजीनामा दिलेला नाही आणि त्यानुसार परिच्छेद (xviii) अंतर्गत अहवाल देणे लागू होत नाही.

(xix) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणांनुसार आणि वित्तीय विवरणांमधील नोंद ३५ मधील वित्तीय गुणोत्तरांच्या आधारे, तसेच वित्तीय मालमत्तेच्या वसुलीचा आणि वित्तीय दायित्वांच्या (देण्यांच्या) परतफेडीचा कालावधी व अपेक्षित तारखा, वित्तीय विवरणांसोबत जोडलेली इतर माहिती, संचालक मंडळाची आमची माहिती आणि व्यवस्थापनाच्या योजना, तसेच गृहीतकांना पुष्टी देणाऱ्या पुराव्यांच्या आमच्या तपासणीच्या आधारे, आमच्या निदर्शनास अशी कोणतीही बाब आलेली नाही, ज्यामुळे ताळेबंदाच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीत देय होणारी ताळेबंदाच्या तारखेअखेरची देणी फेडण्यास कंपनी सक्षम नाही, अशी कोणतीही लक्षणीय अनिश्चितता लेखापरीक्षा अहवालाच्या तारखेला अस्तित्वात आहे यावर विश्वास ठेवण्यास वाव मिळेल.

तथापि, आम्ही असे स्पष्ट करू इच्छितो की, हे आश्वासन कंपनीच्या भविष्यातील व्यवहार्यतेबाबत (सक्षमतेबाबत) नाही. आम्ही पुढे असेही नमूद करतो की, आमचा हा अहवाल लेखापरीक्षा अहवालाच्या तारखेपर्यंतच्या तथ्यांवर आधारित आहे आणि ताळेबंदाच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीत देय होणारी सर्व देणी ती देय होतील त्या वेळी कंपनीकडून पूर्णपणे फेडली जातील, याची आम्ही कोणतीही हमी किंवा आश्वासन देत नाही.

(xx) आमच्या मते आणि आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणांनुसार, कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३५(५) अन्वये कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (कंपनीची सामाजिक जबाबदारी) लेखापरीक्षणाधीन वर्षात कंपनीला लागू होत नाही.

(xxi) स्वतंत्र वित्तीय विवरणांच्या (स्टँडअलोन फायनान्शियल स्टेटमेंट्सच्या) लेखापरीक्षणाच्या संदर्भात या आदेशाच्या परिच्छेद ३(२१) अंतर्गत अहवाल देणे लागू होत नाही. त्यानुसार, सदर परिच्छेदाच्या संदर्भात या अहवालात कोणतेही मत किंवा भाष्य समाविष्ट केलेले नाही.

अंबावत जैन आणि असोसिएट्स
सनदी लेखापाल यांच्याकरिता
(संस्थेचा नोंदणी क्र. १०९६८१डब्ल्यू)

(कमल शर्मा)
भागीदार
सभासदत्व क्रमांक : ११२८४३

स्थळ : मुंबई
दिनांक : २६.०९.२०२५
UDIN: 25112843BMOCQX1296

कंपनी अधिनियम १४३, कलम १ उपविभाग ३ मध्ये असणाऱ्या अंतर्गत आर्थिक नियंत्रण अहवाल ('कायदा')

आम्ही, सोबत जोडलेल्या महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाच्या (यापुढे महामंडळ असे संबोधले असून) दिनांक ३१ मार्च २०२२ रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षाचा ताळेबंद तसेच त्याच आर्थिक वर्षाच्या नफा–तोटा व रोख ओघ विवरणपत्रांचे तसेच वैशिष्ट्यपूर्ण लेखा पद्धतीचा सारांश आणि स्पष्टीकरणात्मक माहितीचे लेखा परीक्षण केले आहे.

अभिप्राय अस्वीकृती

आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणांनुसार, 'द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया'ने जारी केलेल्या 'वित्तीय अहवालविषयक अंतर्गत वित्तीय नियंत्रणांच्या लेखापरीक्षणावरील मार्गदर्शक सूचना' (गाईडन्स नोट) मध्ये नमूद केलेल्या अंतर्गत नियंत्रणांच्या आवश्यक घटकांचा विचार करून किंवा त्यावर आधारित निकषांनुसार महामंडळाने आपली वित्तीय अहवालविषयक अंतर्गत वित्तीय नियंत्रण प्रणाली स्थापित केलेली नाही. या कारणामुळे, महामंडळाकडे वित्तीय अहवालविषयक पुरेशी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे अस्तित्वात होती की नाही आणि ३१ मार्च २०२२ रोजी अशी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे प्रभावीपणे कार्यरत होती की नाही, याविषयी आमच्या अभिप्रायाला आधार देणारा पर्याप्त व योग्य लेखापरीक्षा पुरावा मिळवण्यात आम्ही असमर्थ आहोत.

महामंडळाच्या वित्तीय विवरणांच्या आमच्या लेखापरीक्षणात लागू केलेल्या लेखापरीक्षा चाचण्यांचे स्वरूप, वेळ आणि व्याप्ती निश्चित करताना आम्ही वर नमूद केलेल्या अभिप्राय अस्वीकृतीचा विचार केला आहे आणि आमच्या या अभिप्राय अस्वीकृतीचा महामंडळाच्या वित्तीय विवरणांवरील आमच्या अभिप्रायावर कोणताही परिणाम होत नाही.

अंतर्गत वित्तीय नियंत्रणांसाठी व्यवस्थापनाची जबाबदारी

'द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया'ने जारी केलेल्या 'वित्तीय अहवालविषयक अंतर्गत वित्तीय नियंत्रणांच्या लेखापरीक्षणावरील मार्गदर्शक सूचना'मध्ये नमूद केलेल्या अंतर्गत नियंत्रणांच्या आवश्यक घटकांचा विचार करून महामंडळाने प्रस्थापित केलेल्या वित्तीय अहवालविषयक अंतर्गत नियंत्रण निकषांच्या आधारे अंतर्गत वित्तीय नियंत्रणे स्थापित करणे आणि ती टिकवून ठेवणे, ही महामंडळाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. कायद्यांतर्गत आवश्यकतेनुसार महामंडळाच्या धोरणांचे पालन करणे, मालमत्तेचे रक्षण करणे, फसवणूक व चुका रोखणे आणि त्या शोधणे, हिशोब नोंदींची अचूकता व पूर्णता सुनिश्चित करणे आणि विश्वसनीय वित्तीय माहिती वेळेवर तयार करणे यासह व्यवसायाचे कामकाज सुरळीत आणि कार्यक्षमतेने चालणे सुनिश्चित करण्यासाठी प्रभावीपणे कार्यरत असलेल्या पर्याप्त अंतर्गत वित्तीय नियंत्रणांची रचना, अंमलबजावणी आणि देखभाल करणे या जबाबदाऱ्यांचा यात समावेश होतो.

लेखापरीक्षकांची जबाबदारी

आमच्या लेखापरीक्षणाच्या आधारे महामंडळाच्या वित्तीय अहवालविषयक अंतर्गत वित्तीय नियंत्रणांवर अभिप्राय व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे. आम्ही आमचे लेखापरीक्षण 'द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया'ने जारी केलेल्या 'वित्तीय अहवालविषयक अंतर्गत वित्तीय नियंत्रणांच्या लेखापरीक्षणावरील मार्गदर्शक सूचना' (मार्गदर्शक सूचना) आणि लेखापरीक्षा मानकांनुसार (स्टँडर्ड्स ऑन ऑडिटिंग) केले आहे. ही मानके कायद्याच्या कलम १४३(१०) अन्वये विहित केलेली मानली जातात आणि अंतर्गत वित्तीय नियंत्रणांच्या लेखापरीक्षणास लागू होतील तिथपर्यंत ती लागू पडतात. ही दोन्ही (मार्गदर्शक सूचना आणि मानके) 'द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया'द्वारे जारी केलेली आहेत. या प्रमाणांचे आणि मार्गदर्शक सूचनेचे पालन करण्यासाठी आम्ही नैतिक आवश्यकतांचे पालन करणे आणि वित्तीय अहवालविषयक पर्याप्त अंतर्गत वित्तीय नियंत्रणे स्थापित व राखली गेली आहेत की नाही आणि अशी नियंत्रणे सर्व लक्षणीय बाबींमध्ये प्रभावीपणे कार्यरत होती की नाही, याबद्दल वाजवी खात्री मिळवण्यासाठी लेखापरीक्षणाचे नियोजन व अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

आमच्या लेखापरीक्षणात वित्तीय अहवालविषयक अंतर्गत वित्तीय नियंत्रण प्रणालीची पर्याप्तता आणि त्यांच्या कार्यक्षमतेबद्दल लेखापरीक्षा पुरावे मिळवण्यासाठी विविध कार्यपद्धती राबवण्याचा समावेश होतो. वित्तीय अहवालविषयक अंतर्गत वित्तीय नियंत्रणांच्या आमच्या लेखापरीक्षणात वित्तीय अहवालविषयक अंतर्गत वित्तीय नियंत्रणांची समज मिळवणे, एखादी लक्षणीय त्रुटी किंवा उणीव असण्याच्या जोखमीचे मूल्यमापन करणे आणि मूल्यमापन केलेल्या जोखमीच्या आधारे अंतर्गत नियंत्रणांची रचना व कार्यक्षमतेची चाचणी व मूल्यमापन करणे समाविष्ट आहे. निवडलेल्या कार्यपद्धती या लेखापरीक्षकांच्या व्यावसायिक निर्णयावर अवलंबून असतात, ज्यामध्ये फसवणूक किंवा चुकीमुळे वित्तीय विवरणांमध्ये होणाऱ्या लक्षणीय चुकीच्या विधानाच्या (चुकीच्या नोंदींच्या) जोखमीच्या मूल्यमापनाचाही समावेश होतो.

आम्हाला असा विश्वास आहे की, आम्ही मिळवलेले लेखापरीक्षण पुरावे हे महामंडळाच्या वित्तीय अहवालविषयक अंतर्गत वित्तीय नियंत्रण प्रणालीवरील आमच्या लेखापरीक्षण अभिप्रायासाठी पर्याप्त आणि योग्य आधार प्रदान करतात.

वित्तीय अहवालविषयक अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचा अर्थ

महामंडळाची वित्तीय अहवालविषयक अंतर्गत वित्तीय नियंत्रण प्रणाली ही एक अशी प्रक्रिया आहे, जी वित्तीय अहवालाची विश्वसनीयता आणि सर्वमान्य लेखांकन तत्त्वांच्या अनुषंगाने बाह्य उद्देशांसाठी वित्तीय विवरणे तयार करण्याबाबत वाजवी खात्री प्रदान करण्यासाठी तयार केलेली असते. महामंडळाच्या वित्तीय अहवालविषयक अंतर्गत वित्तीय नियंत्रणामध्ये अशा धोरणांचा आणि कार्यपद्धतींचा समावेश होतो ज्या, (१) महामंडळाच्या मालमत्तेची विल्हेवाट आणि व्यवहारांचे वाजवी तपशिलानुसार, अचूक व वाजवी चित्रण करणाऱ्या नोंदी ठेवण्याशी संबंधित असतात; (२) सर्वमान्य लेखांकन तत्त्वांच्या अनुषंगाने वित्तीय विवरणे तयार करण्यास परवानगी देण्यासाठी आवश्यकतेनुसार व्यवहार नोंदवले जातात आणि महामंडळाची प्राप्ती व खर्च केवळ महामंडळाचे व्यवस्थापन आणि संचालकांच्या अधिकृततेनुसारच केले जात आहेत, याची वाजवी खात्री देतात; आणि (३) महामंडळाच्या मालमत्तेचे अनधिकृत संपादन, वापर किंवा विल्हेवाट ज्याचा वित्तीय विवरणांवर लक्षणीय परिणाम होऊ शकतो, ती रोखण्याबाबत किंवा वेळेवर शोधण्याबाबत वाजवी खात्री देतात.

वित्तीय अहवालविषयक अंतर्गत वित्तीय नियंत्रणाच्या अंतर्भूत मर्यादा

वित्तीय अहवालविषयक अंतर्गत वित्तीय नियंत्रणांच्या अंगभूत किंवा उपजत मर्यादांमुळे, ज्यामध्ये आपसातील संगनमत किंवा व्यवस्थापनाद्वारे नियंत्रणांचे अयोग्य उल्लंघन करण्याच्या शक्यतेचा समावेश होतो, चुकांमुळे किंवा फसवणुकीमुळे उद्भवणारी लक्षणीय चुकीची विधाने घडू शकतात आणि ती निदर्शनास न येण्याची शक्यता असते. तसेच, वित्तीय अहवालविषयक अंतर्गत वित्तीय नियंत्रणांच्या कोणत्याही मूल्यमापनाचे भविष्यातील कालावधीसाठी केलेले अंदाज हे अशा जोखमीच्या अधीन असतात की, बदलत्या परिस्थितीमुळे वित्तीय अहवालविषयक अंतर्गत वित्तीय नियंत्रणे अपुरी पडू शकतात किंवा धोरणे व कार्यपद्धतींच्या पालनाचा दर्जा खालावू शकतो.

अंबावत जैन आणि असोसिएट्स
सनदी लेखापाल यांच्याकरिता
(संस्थेचा नोंदणी क्र. १०९६८१डब्ल्यू)

(कमल शर्मा)
भागीदार
सभासदत्व क्रमांक : ११२८४३
स्थळ : मुंबई
दिनांक : २६.०९.२०२५
UDIN: 25112843BMOCQX1296

३१ मार्च २०२२ रोजी संपलेल्या वर्षासाठी महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादित (स्वतंत्र) च्या खात्यांवर कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १४३ (५) अंतर्गत निर्देश

अनु. क्र.	निर्देश	लेखापरीक्षकांचे भाष्य
१	सर्व लेखांकन व्यवहार माहिती तंत्रज्ञान प्रणालीद्वारे हाताळण्यासाठी कंपनीकडे योग्य व्यवस्था अस्तित्वात आहे का? असल्यास, माहिती तंत्रज्ञान प्रणालीच्या बाहेर लेखांकन व्यवहार हाताळल्यामुळे खात्यांच्या अखंडतेवर होणारा परिणाम आणि त्यासोबतच त्याचे काही वित्तीय परिणाम झाले असल्यास, ते नमूद करावेत.	होय, लेखांकन व्यवहारांवर प्रक्रिया करण्यासाठी महामंडळाकडे 'टॅली ईआरपी' हे आज्ञावली (सॉफ्टवेअर) उपलब्ध आहे. प्रणालीच्या बाहेर नोंदवला गेलेला कोणताही व्यवहार आमच्या निदर्शनास आलेला नाही.
२	कर्ज परतफेड करण्यास कंपनी असमर्थ ठरल्यामुळे कर्जदात्याकडून विद्यमान कर्जाची कोणतीही पुनर्रचना करण्यात आली आहे का, किंवा थकबाकी/कर्ज/व्याज इत्यादी माफ/ अपलिखित (राईट ऑफ) केल्याची काही प्रकरणे आहेत का? असल्यास, त्याचा वित्तीय परिणाम नमूद करावा. अशी प्रकरणे हिशोबात योग्य रीतीने नोंदवली गेली आहेत का? (कर्जदाता ही सरकारी कंपनी असल्यास, हा निर्देश कर्जदात्या कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकालाही लागू होतो)	कर्ज परतफेड करण्यास असमर्थ ठरल्यामुळे महामंडळाने कोणत्याही विद्यमान कर्जाची पुनर्रचना केलेली नाही किंवा थकबाकी/ कर्ज/व्याज इत्यादी माफ/अपलिखित केलेले नाही.
३	केंद्र/राज्य सरकार किंवा त्यांच्या संस्थांकडून विशिष्ट योजनांसाठी प्राप्त झालेल्या/ प्राप्त होण्यायोग्य निधीचा (अनुदान/आर्थिक साहाय्य इत्यादी) योग्य हिशोब ठेवला गेला आहे का आणि त्याच्या अटी व शर्तींनुसार वापर केला गेला आहे का? अटींचे उल्लंघन किंवा विचलनाची प्रकरणे सूचीबद्ध करा.	आमच्या नमुना चाचणी/प्रमाणकांद्वारे (व्हाउचिंगद्वारे) आम्हाला; अनुदान/आर्थिक सहाय्य स्वरूपात प्राप्त झालेला किंवा प्राप्त होण्यायोग्य निधी योग्य रीतीने नोंदवला गेला नाही किंवा अटी व शर्तींनुसार वापरला गेला नाही असे कोणतेही प्रसंग आढळलेले नाहीत,

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १४३ च्या उपकलम (५) अंतर्गत निर्देश.

अनु. क्र.	निर्देश	लेखापरीक्षकांचे भाष्य
१	थकबाकी, कर्जे किंवा व्याज इत्यादी माफ केल्याची किंवा अपलिखित केल्याची कोणतीही प्रकरणे आहेत का, याबद्दल अहवाल देणे; असल्यास, त्याची कारणे आणि त्यात समाविष्ट असलेली रक्कम नमूद करावी.	वित्तीय वर्षात थकबाकी, कर्जे अथवा व्याज माफ केल्याचे किंवा अपलिखित केल्याचे एकही प्रकरण नाही.
२	तृतीय पक्षांकडे असलेला वस्तुसूची आणि सरकार व इतर प्राधिकरणांकडून भेट म्हणून मिळालेल्या मालमत्तेसाठी योग्य नोंदी ठेवल्या जातात का?	आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, महामंडळाचा वस्तुसूची कोणत्याही तृतीय पक्षाकडे उपलब्ध नाही आणि वित्तीय वर्षात महामंडळाला सरकार किंवा इतर प्राधिकरणांकडून भेटस्वरूपात कोणतीही मालमत्ता प्राप्त झालेली नाही.
३	प्रलंबित कायदेशीर किंवा लवाद प्रकरणांच्या कालावधीनिहाय विश्लेषणाचा अहवाल, प्रलंबिततेची कारणे आणि सर्व (परदेशी व स्थानिक) कायदेशीर प्रकरणांवरील खर्चाच्या संनियंत्रण व्यवस्थेचे अस्तित्व व परिणामकारकता याबद्दल अहवाल देण्यात यावा.	प्रलंबित कायदेशीर किंवा लवाद प्रकरणांचे कालावधीनुसार विश्लेषण आणि प्रलंबिततेच्या कारणांचा तपशील स्वतंत्रपणे जोडलेल्या विवरणांमध्ये दिलेला आहे. (एकूण प्रलंबित प्रकरणे ३८ असून त्यात समाविष्ट असलेली एकूण रक्कम अंदाजे २१.१० कोटी आहे.) सर्व कायदेशीर प्रकरणांवरील खर्चाच्या संनियंत्रण व्यवस्थेच्या परिणामकारकतेबाबत आम्हाला असे स्पष्ट करण्यात आले आहे की, महामंडळाने नामांकित वकिलांची सूची राखली आहे. महामंडळाने निश्चित केलेल्या शुल्क पत्रकानुसार त्यांना शुल्क दिले जाते. प्रकरणातील वित्तीय व्याप्ती अधिक असल्यास, संचालक मंडळाने व्यवस्थापकीय संचालकांना प्रत्येक प्रकरणानुसार वकील किंवा सल्लागार यांची नियुक्ती करण्याचे आणि त्यांचे शुल्क ठरवण्याचे विशेष अधिकार दिले आहेत.
४	जर कंपनीची निर्गुंतवणुकीसाठी निवड झाली असेल, तर मालमत्ता (जमीन व इतर मालमत्तेसह) आणि दायित्वे (वचनबद्ध व सामान्य राखीव निधीसह) यांच्या मूल्यांकनाच्या संदर्भातील पूर्ण स्थिती अहवालाची तपासणी केली जावी. त्यामध्ये निर्गुंतवणूक प्रक्रियेची पद्धत आणि सद्यस्थितीचा समावेश केला जावा.	कंपनीची निर्गुंतवणुकीसाठी निवड झालेली नाही.

क्षेत्रनिहाय उपनिर्देश

अनु. क्र.	निर्देश	लेखापरीक्षकांचे भाष्य
१	कंपनीने खालील बाबींसाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने जारी केलेल्या निर्देशांचे पालन केले आहे का: • 'बिगर–बँकिंग वित्तीय कंपन्या' • अनुत्पादक मालमत्तेचे (एनपीएचे) वर्गीकरण; आणि • बिगर–बँकिंग वित्तीय कंपन्यांसाठी भांडवल पर्याप्ततेचे निकष.	आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, महामंडळ ही बिगर–बँकिंग वित्तीय कंपनी नाही आणि ती बिगर–बँकिंग वित्तीय व्यवहारांमध्ये गुंतलेली नाही, त्यामुळे हा परिच्छेद महामंडळाला लागू होत नाही.
२	वितरित केलेली कर्जे ही बोजाविरहित पर्याप्त तारणारेखांद्वारे सुरक्षित आहेत आणि गहाण ठेवलेल्या मालमत्तेवर पहिला हक्क (प्रथम प्रभार) प्रस्थापित केला आहे, हे सुनिश्चित करणारी व्यवस्था कंपनीकडे अस्तित्वात आहे का? याशिवाय, जप्त केलेल्या घटकांची (उद्योगांची) विल्हेवाट लावण्यास झालेल्या अवाजवी विलंबाची प्रकरणे नोंदवावीत.	आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, महामंडळ ही बिगर–बँकिंग वित्तीय कंपनी नाही आणि ती बिगर–बँकिंग वित्तीय व्यवहारांमध्ये गुंतलेली नाही, त्यामुळे हा परिच्छेद महामंडळाला लागू होत नाही.
३	थकबाकीची तडजोड आणि मुदतवाढीसाठी सुरू केलेली कोणतीही योजना कंपनी किंवा सरकारच्या धोरण आणि मार्गदर्शक तत्त्वांशी सुसंगत आहे का?	आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, महामंडळ ही बिगर–बँकिंग वित्तीय कंपनी नाही आणि ती बिगर–बँकिंग वित्तीय व्यवहारांमध्ये गुंतलेली नाही, त्यामुळे हा परिच्छेद महामंडळाला लागू होत नाही.
४	व्यापारी प्राप्ती (येणे बाकी), व्यापारी देयके, मुदत ठेवी आणि रोख व बँक शिल्लक यांच्या बाकी रकमेच्या पुष्टीकरणाबाबत भाष्य करावे.	१. रोख, मुदत ठेव आणि बँक शिलकेचे पुष्टीकरण प्राप्त झाले आहे. २. व्यापारी प्राप्ती आणि व्यापारी देयकांचे पुष्टीकरण प्राप्त झालेले नाही.
५	लेखापरीक्षण अहवालात नमूद केलेला नफा किंवा तोटा हा कंपनीच्या नफा–तोटा पत्रकानुसारच आहे का?	होय, लेखापरीक्षण अहवालात नमूद केलेला नफा किंवा तोटा हा कंपनीच्या नफा–तोटा पत्रकानुसारच आहे.
६	महाराष्ट्र शासनाला मुद्दल रकमेची परतफेड न केल्यास कंपनी व्याजासाठी कोणतीही तरतूद करत आहे का?	व्याजाची कोणतीही तरतूद केलेली नाही, कारण वित्तीय वर्षात महाराष्ट्र शासनाकडून कोणतेही कर्ज घेण्यात आलेले नाही.
७	कंपनी कायदा, २०१३ च्या अनुसूची ३ नुसार, वाटप प्रलंबित असलेली भाग अर्ज रक्कम भाग भांडवलांतर्गत स्पष्टपणे किंवा स्वतंत्रपणे दर्शविली पाहिजे.	ताळेबंदाची तारीख ३१ मार्च २०२२ अखेर कोणतीही भाग अर्ज रक्कम किंवा वाटप प्रलंबित नाही.
८	प्रवर्तक किंवा महाराष्ट्र शासनाकडून मिळालेले भाग भांडवल किती वर्षांपासून भाग अर्ज रकमेच्या अंतर्गत दर्शविले जात आहे, त्याची कारणे काय आहेत आणि या मुद्द्यावर वैधानिक लेखापरीक्षकांचे भाष्य अहवालात समाविष्ट केले जावे.	ताळेबंदाची तारीख ३१ मार्च २०२२ अखेर प्रवर्तक किंवा महाराष्ट्र शासनाकडून कोणतेही भाग भांडवल मिळालेले नाही आणि भाग अर्ज रकमेअंतर्गत काहीही प्रलंबित नाही.

वित्तीय वर्ष २०२१-२२ च्या लेखापरीक्षकांच्या अहवालास उत्तर (स्वतंत्र)

	लेखापरीक्षकांचे भाष्य	व्यवस्थापनाचे भाष्य
	प्रतिकूल मतासाठी आधार	
१.	न जुळलेली शिल्लक (मेळ न घातलेली शिल्लक) आणि त्याचे वर्गीकरण व सादरीकरण:	विविध सर्वसाधारण खातेवहीतील (लेजरमधील) शिल्लक रकमांची छाननी, मेळ घालणे (तपशील जुळवणे) आणि तद्अनुषंगिक समायोजन करणे बाकी आहे.
	(अ) विविध सर्वसाधारण खातेवह्यांमधील रकमा प्रदीर्घ काळापासून प्रलंबित किंवा न जुळलेल्या आहेत, तसेच अनेक सर्वसाधारण खातेवह्या अदलाबदल करून वापरल्या जात आहेत; यामुळे अंतिम शिल्लक रकमा चुकीच्या निघत आहेत. या खात्यांचा मेळ उपलब्ध नसल्यामुळे, आम्ही या शिल्लक रकमांच्या अचूकतेवर कोणतेही भाष्य करण्यास असमर्थ आहोत. वरील खात्यांमध्ये शिल्लक राहिलेल्या जुन्या प्रलंबित रकमांचा मेळ घालण्यातून आणि त्यांच्या तडजोडीतून होणाऱ्या संभाव्य समायोजनांचा परिणाम, तसेच वसुली न झाल्यामुळे किंवा अंशतः वसुली झाल्यामुळे अथवा रकमा परत घेतल्यामुळे (अपलिखित रकमा पुन्हा जमा केल्यामुळे) उद्भवू शकणारा संभाव्य नफा किंवा तोटा अद्याप निश्चित करण्यात आलेला नाही.	नोंद घेतली आहे आणि आवश्यक ती कार्यवाही केली जाईल.
	(ब) याशिवाय, आवश्यक माहिती किंवा तपशिलांच्या अभावी, मालमत्ता आणि दायित्वांचे (देण्यांचे) वर्गीकरण तसेच त्यांचे चालू आणि बिगर-चालू (अल्पकालीन आणि दीर्घकालीन) घटकांमध्ये केलेले विभाजन लेखांकन मानकांच्या आवश्यकतांनुसार आहे की नाही, यावर आम्ही भाष्य करण्यास असमर्थ आहोत.	
	(क) स्वतंत्र वित्तीय विवरणांमधील नोंद ६ कडे लक्ष वेधण्यात येत आहे. ही नोंद व्यापारी देयके - चालू (अल्पकालीन) अंतर्गत 'इतरांना देणे' म्हणून दर्शविलेल्या रु. ३५.८६ कोटी (वित्तीय वर्ष २०२०-२१ - रु. ३६.१३ कोटी) या रकमेशी संबंधित आहे. सदर रकमेचे पक्षनिहाय तपशील आणि शिल्लक रकमेचे पुष्टीकरण प्रमाणपत्र पडताळणीसाठी आम्हाला उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. परिणामी, या दायित्वाच्या अस्तित्वावर आणि लेखापरीक्षणाधीन वर्षातील महामंडळाच्या स्वतंत्र वित्तीय विवरणांवर होणाऱ्या तद्अनुषंगिक परिणामांवर आम्ही कोणतेही भाष्य करण्यास असमर्थ आहोत.	मुद्दा नोंदवला आहे. रु. ३५.८६ कोटी (वित्तीय वर्ष २०२०-२१ - रु. ३६.१३ कोटी) ची व्यापारी देयके छाननी, मेळ घालणे आणि तद्अनुषंगिक समायोजनांच्या अधीन आहेत.

वित्तीय वर्ष २०२१-२२ च्या लेखापरीक्षकांच्या अहवालास उत्तर (स्वतंत्र)

	लेखापरीक्षकांचे भाष्य	व्यवस्थापनाचे भाष्य
	प्रतिकूल मतासाठी आधार	
२.	बाह्य शिल्लक रकमांचे पुष्टीकरण/ मेळ घालणे: स्वतंत्र वित्तीय विवरणांमधील नोंद ६, १५ आणि १७ कडे लक्ष वेधण्यात येत आहे. या नोंदींनुसार व्यापारी देयके, व्यापारी प्राप्ती (येणे बाकी), कर्जे व अगाऊ रकमा (ॲडव्हान्सेस) आणि इतर विविध नावे (डेबिट) व जमा (क्रेडिट) शिल्लक रकमा तसेच शासनाकडून येणाऱ्या रकमा या पुष्टीकरण, मेळ घालणे आणि तद्अनुषंगिक समायोजनांच्या अधीन आहेत. महामंडळाकडून तृतीय पक्ष शिल्लक रक्कम पुष्टीकरणाची पद्धत पाळली जात नाही. पुस्तकांमधील शिल्लक रकमांचे लेखापरीक्षा मानक ५०५ नुसार बाह्य पुष्टीकरण मिळवण्यासाठी संपर्काचा तपशील आमच्याकडे उपलब्ध नव्हता. योग्य नोंदी किंवा संपर्काच्या तपशिलाअभावी, पुस्तकांमध्ये दर्शविलेल्या शिल्लक रकमांच्या अचूकतेवर आम्ही भाष्य करण्यास असमर्थ आहोत.	ही खाती छाननी, मेळ घालणे आणि तद्अनुषंगिक समायोजनांच्या अधीन आहेत. त्यामुळे शिल्लक रक्कम पुष्टीकरण प्रमाणपत्र प्राप्त केलेले नाही.
३.	गोदाम आणि कार्यालय भाडे प्राप्ती (येणे बाकी) या शीर्षकांतर्गत असलेली विविध खाती मेळ घातलेली नाहीत. त्यामुळे हिशोबपुस्तकांमध्ये नोंदवलेले व प्राप्त झालेले गोदाम भाडे, येणे बाकी असलेले गोदाम भाडे आणि दिलेले व देणे असलेले भाडे यांच्या अचूकतेवर आम्ही भाष्य करण्यास असमर्थ आहोत. वसूल करण्यायोग्य एकूण भाड्याची रक्कम रु. ९,४७,८९,५११ असून, त्यापैकी रु. ५,८१,३५,०४१ इतकी रक्कम न्यायप्रविष्ट (कायदेशीर वादात) आहे.	नोंदींच्या आधारे, आम्ही सर्व गोदाम भाड्याची नोंद केली आहे. तसेच, आम्ही या भाड्याच्या वसुलीसाठी पाठपुरावा करत आहोत.
४.	महामंडळाने खालील तपशिलानुसार 'द इन्स्टिट्यूट ऑफ्य चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया'द्वारे जारी केलेल्या काही लेखांकन मानकांचे पूर्णपणे पालन केलेले नाही: महामंडळ खरेदी आणि विक्रीची नोंद केवळ पुरवठादारांकडून बीजक (इन्व्हॉइस) प्राप्त झाल्यानंतरच करते; विक्रेत्याने मोबदल्यासाठी खरेदीदाराकडे माल हस्तांतरित केल्यावर आणि त्यावरील जोखीम व लाभ हस्तांतरित झाल्यानंतर ही नोंद केली जात नाही. महसूल मान्यतेची (रेव्हेन्यू रेकग्निशनची) ही पद्धत 'लेखांकन मानक ९ – महसूल मान्यते'शी सुसंगत नाही. यामुळे महामंडळाच्या चालू वर्षातील खरेदी आणि विक्रीचे चुकीचे व अयोग्य चित्र समोर येते. विक्रीची नोंद करतानाच वजावट (रिबेट) उत्पन्नाची नोंद केली जात आहे. विक्रीची नोंद करणे हे लेखांकन मानक ९शी सुसंगत नसल्यामुळे, 'लेखांकन मानक ५ – कालावधीसाठीचा निव्वळ नफा किंवा तोटा, पूर्व कालावधीतील बाबी आणि लेखांकन धोरणांमधील बदल' याचे पालन करण्यासाठी वजावट उत्पन्नामध्ये आवश्यक समायोजन करणे गरजेचे होते. तसे करण्यात आलेले नाही आणि यामुळे नफा-तोटा पत्रक चालू वर्षाच्या तोट्याचे चुकीचे व अयोग्य चित्र दर्शविते. महामंडळाने लेखांकन मानक ९ आणि लेखांकन मानक ५ चे पूर्णपणे पालन केलेले नाही आणि याच्या परिणामाचे प्रमाण निश्चित (क्वांटिफाय) करता येत नाही.	सरकारी विभागांसोबतच्या आमच्या विपणन (मार्केटिंग) उलाढालीची विक्री बीजके दरवर्षी जानेवारी, फेब्रुवारी, मार्च महिन्यात सरकारी विभागांना जारी केली जातात, तथापि, त्यांचा पुरवठा (डिलिव्हरी) पुढील वर्षात होतो (माल पुरवठा पावतीची तारीख पुढील वर्षातील असते). शिवाय, सरकारी विभाग लेखांकनाची रोख पद्धत (कॅश बेसिस) पाळतात, तर महामंडळ लेखांकनाची व्यापारी पद्धत (मर्कंटाईल सिस्टम) पाळते. वर नमूद केलेल्या दोन वेगवेगळ्या पद्धतींमुळे हा मुद्दा उपस्थित होतो. या व्यावहारिक अडचणीमुळे लेखांकन मानकांचे पालन करणे आम्हाला शक्य होत नाही.

वित्तीय वर्ष २०२१-२२ च्या लेखापरीक्षकांच्या अहवालास उत्तर (स्वतंत्र)

	लेखापरीक्षकांचे भाष्य	व्यवस्थापनाचे भाष्य
	प्रतिकूल मतासाठी आधार	
	५. इतर बाबी: (अ) स्वतंत्र वित्तीय विवरणांमधील नोंद ६ कडे लक्ष वेधण्यात येत आहे. ही नोंद सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) कायद्यांतर्गत धनकोंच्या (क्रेडिटर्सच्या) स्थितीची ओळख न पटवण्याशी आणि अशा पक्षांना ४५ दिवसांपेक्षा जास्त काळ प्रलंबित असलेल्या देण्यांवर भारतीय रिझर्व्ह बँकेने अधिसूचित केलेल्या बँक दराच्या तीन पट दराने देय व्याजाची तरतूद न करण्याशी संबंधित आहे. या कारणास्तव उद्भवणारे दायित्व, असल्यास, कंपनीने निश्चित केलेले नाही. त्यामुळे आवश्यक असलेल्या व्याजाच्या तरतुदीचा (असल्यास) आणि लेखापरीक्षणाधीन वर्षाच्या नफ्यावर होणाऱ्या तद्अनुषंगिक परिणामाचा शोध घेण्यास आम्ही असमर्थ आहोत. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग कायद्यांतर्गत येणाऱ्या पक्षांची ओळख न पटवल्यामुळे, संबंधित कायद्यानुसार आवश्यक असलेले प्रकटीकरण महामंडळाद्वारे करण्यात आलेले नाही.	लघु उद्योग घटकांना विलंबाने केलेल्या प्रदानावरील (पेमेंटवरील) व्याज भरण्याची कोणतीही प्रकरणे आढळलेली नाहीत. महामंडळाला सरकारी विभागाकडून रक्कम प्राप्त झाल्यानंतर महामंडळाने ४५ दिवसांपेक्षा जास्त काळ प्रदान करण्यास विलंब केल्याचे एकही प्रकरण नाही. त्यामुळे व्याजासाठी कोणतीही तरतूद केलेली नाही.
	(ब) आमच्या लेखापरीक्षणादरम्यान केलेल्या तपासणीच्या आधारे, विकेंद्रित लेखांकनाशी (अकाउंटिंगशी) संबंधित आढळलेल्या काही प्रणालीगत किंवा नियंत्रणविषयक त्रुटींमुळे लेखांकन चुका झाल्या आहेत; उदाहरणार्थ- वस्तुसूचीची उणे (ऋण) संख्या असणे आणि 'टॅली ईआरपी' या लेखांकन आज्ञावलीमध्ये (सॉफ्टवेअरमध्ये) मागील तारखेतील नोंदी करण्यावरील निर्बंध लागू न करणे.	नोंद घेतली आहे आणि आवश्यक ती कार्यवाही केली जाईल.
६.	वर्ष २००७-०८ पासून खालील असुरक्षित कर्जांवर देय असलेल्या व्याजासाठी हिशोबपुस्तकांमध्ये कोणतीही तरतूद केलेली नाही. उद्योग आणि कामगार विभाग, महाराष्ट्र शासन (शिक्षित बेरोजगार योजना) — ०.१३ कोटी. उद्योग आणि कामगार विभाग, महाराष्ट्र शासन - बीज भांडवल (३.५ टक्के) — ०.६४ कोटी. (स्वतंत्र वित्तीय विवरणांमधील नोंद ४ नुसार)	महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाच्या माध्यमातून लाभार्थ्यांना सहाय्य दिले होते. त्यानुसार महामंडळाने वर्ष १९८०-८२ मध्ये लाभार्थ्यांना कर्ज वितरित केले होते. हे व्यवहार अत्यंत जुने असल्यामुळे आणि शासनानेही या कर्जाची परतफेड मागितलेली नसल्यामुळे मुद्दल रक्कम हिशोबपुस्तकात तशीच आहे. याशिवाय, महामंडळाने वर्ष २००७-०८ पर्यंत व्याजाची तरतूद केली होती. ही व्याजाची रक्कमही शासनाला देय नसल्यामुळे, पुढे व्याजाची तरतूद केलेली नाही.

वित्तीय वर्ष २०२१-२२ च्या लेखापरीक्षकांच्या अहवालास उत्तर (स्वतंत्र)

	लेखापरीक्षकांचे भाष्य	व्यवस्थापनाचे भाष्य
	प्रतिकूल मतासाठी आधार	
७.	महामंडळाची अंतर्गत नियंत्रण प्रणाली कमकुवत आहे आणि ती महामंडळाच्या व्यवसायाचा आकार व व्याप्ती यांच्याशी सुसंगत नाही. ही प्रणाली विविध स्तरांवर फसवणूक, फेरफार आणि अपहारास बळी पडू शकते. तसेच महामंडळाच्या कामकाजासाठी कोणत्याही प्रमाणित कार्यपद्धती (स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसिजर्स) अस्तित्वात नाहीत.	आम्ही लेखांकन आणि अंतर्गत लेखापरीक्षा नियमावली (मॅन्युअल्स) तयार केली असून, अंतर्गत नियंत्रणासाठी योग्य पावले व कारवाई करण्यासाठी ती संबंधित विभागांकडे आधीच पाठवण्यात आली आहे.
८.	तरतूद (अ) व्यवस्थापनाने प्रमाणित केल्यानुसार, महामंडळाची ४६.५० कोटींची असुरक्षित व्यापारी प्राप्ती (येणे बाकी) आणि व्यापारी देयकांमध्ये ५.६१ कोटींची नावे (डेबिट) शिल्लक असून, ती तीन वर्षांपेक्षा जास्त काळापासून समायोजनासाठी प्रलंबित आहे. महामंडळाने या 'येणे बाकी' आणि 'नावे शिलके'च्या बदल्यात केवळ ४.९६ कोटींची तरतूद केली आहे. त्यामुळे ४१.५४ कोटींची कमी तरतूद झाली आहे. (खात्यांच्या नोंदींमधील नोंद क्रमांक १५ पहा). यापैकी काही व्यापारी प्राप्ती न्यायालयात प्रलंबित (न्यायप्रविष्ट) असून तिची रक्कम २१.१० कोटी आहे.	एकूण व्यापारी प्राप्ती ४६.५० कोटी आहे. त्यापैकी हिशोबपुस्तकात ४.९६ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. ३ वर्षांपेक्षा जास्त जुनी व्यापारी प्राप्ती ४१.४१ कोटी आहे. या प्रलंबित रकमेचे (३ वर्षे) उपक्रमनिहाय विभाजन खालीलप्रमाणे आहे: **उपक्रम** — **रक्कम** विपणन (मार्केटिंग) — १०,६०,६४,०८०.१७ कोळसा — २,३२,०१,६०७.३९ कच्चा माल आणि इतर — २१,०४,६९,३५३.५८ भाडे — ७,४३,९५,०४६.३६ कच्चा माल, विपणन आणि कोळशाच्या व्यवहारांमध्ये, कायदेशीर दाव्यात गुंतलेली रक्कम २१,०९,८५,५२८/- आहे. विपणन व्यवहारांच्या संदर्भात, आम्ही विपणनाची छाननी हाती घेतली असून छाननीनंतर त्याचा लेखांकन परिणाम वित्तीय वर्ष २०१५-१६ ते २०१७-१८ मध्ये देण्यात आला होता. जुने अभिलेख (रेकॉर्ड्स) उपलब्ध नसल्यामुळे उर्वरित विपणन धनको अजूनही प्रलंबित आहेत. ३ वर्षांपेक्षा जास्त जुन्या विपणन धनको आणि विविध ऋणको यांच्या नावे (डेबिट) शिलकेचा मेळ घालणे आवश्यक आहे. धनको आणि ऋणको यांची रक्कम प्रचंड मोठी असल्यामुळे आणि नफा-तोटा पत्रकावर त्याचा विशेष परिणाम होणार असल्यामुळे आम्ही हिशोबपुस्तकात कोणतीही तरतूद केलेली नाही.

वित्तीय वर्ष २०२१-२२ च्या लेखापरीक्षकांच्या अहवालास उत्तर (स्वतंत्र)

	लेखापरीक्षकांचे भाष्य	व्यवस्थापनाचे भाष्य
	प्रतिकूल मतासाठी आधार	
९.	महामंडळाने हिशोबपुस्तकात उपदान दायित्व (ग्रॅच्युइटी लायबिलिटी) आणि रजा रोखीकरण (लीव्ह एनकॅशमेंट) अनुक्रमे ८,०३,३६,०७५ आणि १,८९,७३,२०६ नोंदवले आहे. विमा गणकीय (ॲक्च्युरिअल) मूल्यमापन अहवालानुसार उपदान दायित्व आणि रजा रोखीकरण अनुक्रमे ५,०२,५०,०५५ आणि १,७२,२७,३१५ आहे. भारतीय जीवनविमा निगमच्या (एलआयसीच्या) उपदान निधी विवरणातील १,५३,९०,६३६ या रकमेच्या तुलनेत मालमत्ता बाजूस (ॲसेट) दर्शविलेली उपदान निधीची रक्कम १६,४६,९३,९१२ आहे. उपदान दायित्वाच्या मूल्यमापन अहवालातील आणि भारतीय जीवनविमा निगमच्या उपदान निधी विवरणातील आकडेवारी व हिशोबपुस्तकातील आकडेवारी यामध्ये तफावत आहे.	सनदी लेखापाल (सीए) संस्थेची नियुक्ती करून उपदानाच्या खात्यांची छाननी केली जाईल आणि त्यांच्या सल्ल्यानुसार हिशोबपुस्तकात आवश्यक त्या नोंदी केल्या जातील.
१०.	कंपनीने आपल्या वस्तुसूचीचे मूल्यमापन 'लेखांकन मानक २ – वस्तुसूची मूल्यमापना'नुसार केलेले नाही. कंपनीने या संदर्भातील विहित तत्त्वे लागू केलेली नाहीत किंवा ३१ मार्च २०२२ अखेरची मूळ किंमत अथवा निव्वळ वसूलीयोग्य मूल्य निश्चित करण्यासाठी कोणत्याही मूल्यधारकाची (व्हॅल्युअरची) नियुक्ती केलेली नाही. अशा मूल्यमापनाच्या अभावी, या बिगर-पालनाचा वस्तुसूची, नफा किंवा तोटा आणि संबंधित प्रकटीकरणांवर होणारा परिणाम निश्चित करण्यास आम्ही असमर्थ आहोत. ३१ मार्च २०२२ अखेरची वस्तुसूची मूळ किंमत ७१.९८ लाख नोंदवली गेली आहे.	महामंडळ नोंदणीकृत मूल्यधारकाची नियुक्ती करून वस्तुसूचीचे मूल्यमापन करून घेईल.

वित्तीय वर्ष २०२१-२२ च्या लेखापरीक्षकांच्या अहवालास उत्तर (स्वतंत्र)

	लेखापरीक्षकांचे भाष्य	व्यवस्थापनाचे भाष्य
	इतर बाबी	
१.	आम्ही आपले लक्ष 'लेखांवरील नोंदी'मधील नोंद क्रमांक ४, ५, ६, ७, ८, १२, १३, १५, १७, १८ कडे वेधू इच्छितो.	उपलब्ध नोंदींच्या आधारे, आम्ही वित्तीय पत्रकात आवश्यक त्या नोंदी/माहिती जाहीर केली आहे.
२.	महामंडळाच्या ठाणे येथे काही मालमत्ता भाडेकरूंच्या ताब्यात आहेत; परंतु कायदेशीर वाद आणि वैध भाडेकरू करार (व्हॅलिड रेंट ॲग्रीमेंट) नसल्यामुळे, भाड्याचे उत्पन्न निश्चित करता आले नाही, म्हणूनच ते हिशोब पुस्तकात महसूल म्हणून दर्शवण्यात आलेले नाही.	डी-१० ठाणे गोदामातील (गोडाऊन) खालील ५ पक्षांशी कायदेशीर वाद सुरू असल्यामुळे, आम्ही आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी भाडे करार केलेला नाही:१) शिवशक्ती इंजिनिअरिंग कंपनी२) जगदंबा पावडर कोटिंग३) धर्मेश फॅब्रिकेटर्स प्रायव्हेट लिमिटेड४) कुणाल इंजिनिअरिंग५) मयूर इंजिनिअरिंगआम्ही वरील पक्षांकडून मिळणारे आर्थिक वर्ष २०२१-२२ चे उत्पन्न पुस्तकात नोंदवलेले नाही.
३.	प्रलंबित विक्रीकर, सेवा कर, आयकर,कर वजावट, व्यवसाय कर आणि कंत्राटी कामांवरील कराच्या मूल्यमापनाची तसेच इतर कायदेशीर प्रकरणांची सद्यस्थिती उपलब्ध नसल्यामुळे, त्यासंबंधीचे कोणतेही संभाव्य दायित्व निश्चित करता येत नाही; कारण विविध वर्षांची प्रकरणे संबंधित अपीलीय प्राधिकरणांकडे प्रक्रियेत आहेत आणि त्यांची अचूक रक्कम निश्चित करणे शक्य नाही.	महामंडळाने विक्रीकर, आयकर, टीडीएस आणि इतर लागू करांशी संबंधित प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी मेसर्स टॅक्सपर्ट प्रोफेशनल प्रायव्हेट लिमिटेड, चार्टर्ड अकाउंटंट्स, मुंबई यांची नियुक्ती केली होती. प्रलंबित सेवा कराचे (सर्व्हिस टॅक्स) प्रकरण बंद करण्यात आले असून, असेसमेंट ऑर्डरनुसार थकबाकी भरण्यात आली आहे. याशिवाय, महामंडळाने प्रलंबित एमव्हीएटी (चतअढ) प्रकरणांसाठी अभय योजनेचा (ॲम्नेस्टी स्कीम) लाभ घेतला, ज्यानुसार आर्थिक वर्ष २०२२-२३ आणि २०२३-२४ दरम्यान अशी सर्व प्रकरणे निकाली काढण्यात आली असून संबंधित थकबाकी पूर्णपणे भरली गेली आहे.

वित्तीय वर्ष २०२१-२२ च्या लेखापरीक्षकांच्या अहवालास उत्तर (स्वतंत्र)

	लेखापरीक्षकांचे भाष्य	व्यवस्थापनाचे भाष्य
	इतर कायदेशीर आणि नियामक आवश्यकतांवरील अहवाल	
१	कंपनी कायद्याच्या कलम १४३(११) अन्वये केंद्र सरकारने जारी केलेल्या कंपन्या (लेखापरीक्षकांचा अहवाल) आदेश, २०२० (सदर आदेश) च्या आवश्यकतांनुसार, आम्ही लागू असेल त्या मर्यादेपर्यंत, सदर आदेशाच्या परिच्छेद ३ आणि ४ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बाबींवरील विवरणाचा अहवाल 'सहपत्र – अ' मध्ये सादर करत आहोत.	कलम १४३ नुसार, हे लेखापरीक्षकांचे प्रकटीकरण (घोषणा) आहे.
२	कंपनी कायद्याच्या कलम १४३(३) च्या आवश्यकतांनुसार, आम्ही खालीलप्रमाणे अहवाल देत आहोत: (अ) वरील 'प्रतिकूल अभिप्रायाचा आधार' या परिच्छेदात वर्णन केलेल्या बाबींच्या संभाव्य परिणामांचा अपवाद वगळता, आमच्या सर्वोत्तम ज्ञानानुसार आणि विश्वासाने आमच्या लेखापरीक्षणाच्या उद्देशासाठी आवश्यक अशी सर्व माहिती आणि स्पष्टीकरणे आम्ही मागवून घेतली आहेत आणि ती प्राप्त केली आहेत.	नोंद घेतली आहे आणि आवश्यक ती कार्यवाही सुरू केली आहे.
	(ब) वरील 'प्रतिकूल अभिप्रायाचा आधार' या परिच्छेदात वर्णन केलेल्या बाबींच्या संभाव्य परिणामांचा अपवाद वगळता, आमच्या हिशोबपुस्तकांच्या तपासणीवरून असे दिसून येते की, कायद्यानुसार आवश्यक असणारी योग्य हिशोबपुस्तके महामंडळाद्वारे ठेवली गेली आहेत आणि आम्ही भेट न दिलेल्या शाखांकडून आमच्या लेखापरीक्षणाच्या उद्देशासाठी पुरेसे आणि योग्य विवरणी अहवाल (रिटर्न्स) प्राप्त झाले आहेत.	निरंक.
	(क) वरील 'प्रतिकूल अभिप्रायाचा आधार' या परिच्छेदात वर्णन केलेल्या बाबींच्या संभाव्य परिणामांचा अपवाद वगळता, या अहवालाशी संबंधित असलेला ताळेबंद, नफा-तोटा पत्रक आणि रोख प्रवाह पत्रक हे हिशोबपुस्तकांशी आणि आम्ही भेट न दिलेल्या शाखांकडून प्राप्त झालेल्या विवरणी अहवालांशी सुसंगत आहेत.	नोंद घेतली आहे आणि आवश्यक ती कार्यवाही सुरू केली आहे.
	(ड) वरील 'प्रतिकूल अभिप्रायाचा आधार' या परिच्छेदात वर्णन केलेल्या बाबींच्या संभाव्य परिणामांचा अपवाद वगळता, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक आणि रोख प्रवाह पत्रक हे कंपन्या (खाती) नियम, २०१४ च्या नियम ७ सह वाचल्या जाणाऱ्या कंपनी कायद्याच्या कलम १३३ अन्वये विहित केलेल्या लेखांकन मानकांचे (अकाउंटिंग स्टँडर्ड्सचे) पालन करतात.	नोंद घेतली आहे आणि आवश्यक ती कार्यवाही सुरू केली आहे.
	(इ) आमच्या मते, वरील 'प्रतिकूल अभिप्रायाचा आधार' या परिच्छेदात वर्णन केलेल्या बाबींचा महामंडळाच्या कामकाजावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो.	नोंद घेतली.
	(फ) संचालक मंडळाने अभिलेखात घेतलेल्या ३१ मार्च २०२२ रोजीच्या संचालकांच्या लेखी निवेदनांच्या आधारे, कंपनी कायद्याच्या कलम १६४(२) अन्वये ३१ मार्च २०२२ रोजी कोणताही संचालक, संचालक म्हणून नियुक्त होण्यासाठी अपात्र ठरलेला नाही.	होय.
	(ग) महामंडळाच्या वित्तीय अहवालविषयक अंतर्गत वित्तीय नियंत्रणांची पर्याप्तता आणि अशा नियंत्रणांच्या कार्यक्षमतेच्या संदर्भात, आमच्या स्वतंत्र 'सहपत्र – ब' मधील अहवालाचा संदर्भ घ्यावा. आमचा अहवाल कंपनीच्या वित्तीय अहवालविषयक अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची पर्याप्तता आणि कार्यक्षमतेवर अभिप्राय अस्वीकृती (डिस्क्लेमर ऑफ ओपिनियन) व्यक्त करतो.	नोंद घेतली.
	(ह) खाती ठेवण्याशी आणि त्याच्याशी संबंधित इतर बाबींविषयीचे प्रतिकूल शेरे वर नमूद केलेल्या 'प्रतिकूल अभिप्रायाचा आधार' या परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आहेत.	नोंद घेतली आहे आणि आवश्यक ती कार्यवाही सुरू केली आहे.

वित्तीय वर्ष २०२१-२२ च्या लेखापरीक्षकांच्या अहवालास उत्तर (स्वतंत्र)

	लेखापरीक्षकांचे भाष्य	व्यवस्थापनाचे भाष्य
	इतर कायदेशीर आणि नियामक आवश्यकतांवरील अहवाल	
	(य) महामंडळ ही पूर्णपणे मालकीची सरकारी कंपनी असल्यामुळे, व्यवस्थापकीय मोबदल्याच्या (मानधनाच्या) मर्यादेबाबत कायद्याचे कलम १९७ सह वाचली जाणारी अनुसूची ५, ही दिनांक ०५ जून २०१५ च्या परिपत्रक जीएसआर ४६३ (ई) नुसार या कंपनीला लागू होत नाही.	नोंद घेतली.
	(झ) कंपन्या (लेखापरीक्षा आणि लेखापरीक्षक) नियम, २०१४ च्या नियम ११ नुसार लेखापरीक्षकांच्या अहवालात समाविष्ट करायच्या इतर बाबींच्या संदर्भात, आमच्या मते आणि आमच्या सर्वोत्तम माहितीनुसार तसेच आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणांनुसार:	होय.
	i. महामंडळाने आपल्या वित्तीय विवरणांमध्ये प्रलंबित कायदेशीर दाव्यांचा वित्तीय स्थितीवर होणारा परिणाम प्रकट केला आहे - वित्तीय विवरणांमधील नोंद क्रमांक ३३ पाहा;	नोंद घेतली आहे आणि प्रकट केले आहे.
	ii. वर नमूद केलेल्या 'प्रतिकूल अभिप्रायाचा आधार' या परिच्छेदात वर्णन केलेल्या बाबींच्या संभाव्य परिणामांचा अपवाद वगळता, महामंडळाने लागू कायदा किंवा लेखांकन मानकांनुसार आवश्यकतेनुसार, दीर्घकालीन करारांवरील (व्युत्पन्न करारांसह - डेरिव्हेटिव्ह करारांसह) कोणत्याही संभाव्य लक्षणीय तोट्यासाठी योग्य तरतूद केली आहे;	नोंद घेतली.
	iii. अहवालाधीन वर्षात महामंडळाकडून 'गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी'कडे (इन्व्हेस्टर एज्युकेशन अँड प्रोटेक्शन फंडकडे) कोणतीही रक्कम हस्तांतरित करण्याचा प्रसंग आलेला नाही. त्यामुळे अशी रक्कम हस्तांतरित करण्यास विलंब होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.	निरंक.
	iv. (अ) व्यवस्थापनाने असे निवेदन दिले आहे की, त्यांच्या सर्वोत्तम ज्ञानानुसार आणि विश्वासाने, प्रकट केलेल्या माहितीव्यतिरिक्त, कंपनीने इतर कोणत्याही व्यक्ती किंवा घटकामध्ये किंवा त्यांच्या माध्यमातून कोणताही निधी (जो वैयक्तिकरित्या किंवा एकत्रितपणे लक्षणीय असेल) अशा समजुतीने गुंतवलेला नाही (कर्जाऊ घेतलेल्या निधीतून किंवा भागांच्या अधिमूल्यातून - शेअर प्रीमियममधून किंवा इतर कोणत्याही स्रोतातून किंवा प्रकारच्या निधीतून), मग ती लेखी स्वरूपात नोंदवलेली असो किंवा नसो, की तो मध्यस्थ प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कंपनीच्या वतीने किंवा कंपनीद्वारे निर्देशित केलेल्या इतर व्यक्ती किंवा घटकांमध्ये ('अंतिम लाभार्थी') कर्ज किंवा गुंतवणूक करेल किंवा अंतिम लाभार्थ्यांच्या वतीने कोणतीही हमी (गॅरंटी), तारण किंवा तत्सम सुरक्षा प्रदान करेल.	
	iv. (ब) व्यवस्थापनाने असे प्रतिपादन केले आहे की, वित्तीय पत्रकांमध्ये जाहीर केलेल्या माहितीव्यतिरिक्त, त्यांच्या संपूर्ण माहिती आणि विश्वासाच्या आधारे, कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेकडून, ज्यामध्ये परदेशी संस्थांचाही (फंडिंग पार्टीज) समावेश आहे, कंपनीला कोणताही असा निधी (जो वैयक्तिकरीत्या या एकत्रितपणे मोठ्या प्रमाणाचा असेल) प्राप्त झालेला नाही, ज्यामध्ये अशी कोणतीही लेखी किंवा अलिखित समज असेल की कंपनीने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, त्या निधी पुरवणाऱ्या पक्षाने अथवा त्यांच्या वतीने निर्दिष्ट केलेल्या इतर कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेमध्ये (अंतिम लाभार्थी/ अल्टिमेट बेनिफिशियरीज) कर्ज किंवा गुंतवणूक करावी, अथवा अशा अंतिम लाभार्थ्यांच्या वतीने कोणतीही हमी, सुरक्षा किंवा यासारखे इतर सहाय्य पुरवावे.	
	iv. (क) सद्यस्थितीत वाजवी आणि योग्य मानल्या गेलेल्या लेखापरीक्षण प्रक्रियेच्या (ऑडिट प्रोसिजर्स) आधारे, अशी कोणतीही बाब आमच्या निदर्शनास आलेली नाही ज्यामुळे आम्हाला असा विश्वास बसेल की, वरील (अ) आणि (ब) मध्ये नमूद केल्यानुसार नियम ११ (इ) च्या उप-कलम (१) आणि (२) अंतर्गत व्यवस्थापनाने दिलेले प्रतिपादन किंवा माहिती यामध्ये कोणतीही गंभीर त्रुटी (मटेरिअल मिसस्टेटमेंट) आहे.	
	(v.) कंपनीने चालू आर्थिक वर्षात कोणताही लाभांश (डिव्हिडंड) घोषित केलेला नाही किंवा दिलेला नाही.	

वित्तीय वर्ष २०२१-२२ च्या लेखापरीक्षकांच्या अहवालास उत्तर (स्वतंत्र)

	स्वतंत्र लेखापरीक्षकांच्या अहवालातील ''परिशिष्ट अ''	
१.	कंपनीच्या स्थायी मालमत्तेच्या (स्थिर मालमत्तेच्या) संदर्भात: (अ) महामंडळाने स्थायी मालमत्तेचे परिमाणात्मक तपशील (प्रमाण) आणि तिचे स्थान यासारख्या पूर्ण तपशिलांसह योग्य अभिलेख (नोंदी) ठेवलेले नाहीत. (ब) महामंडळाचा आकार आणि तिच्या मालमत्तेचे स्वरूप लक्षात घेता, महामंडळाकडे आपल्या स्थायी मालमत्तेच्या भौतिक (प्रत्यक्ष) पडताळणीचा कोणताही नियमित कार्यक्रम किंवा पद्धत नाही. (क) आम्हाला दिलेल्या माहिती, स्पष्टीकरणे आणि निवेदनांनुसार, महामंडळाने वित्तीय वर्षात आपल्या स्थायी मालमत्तेचा कोणताही मोठा किंवा महत्त्वपूर्ण भाग विकलेला अथवा निकाली काढलेला नाही. (ड) आमच्या मते आणि आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणांनुसार तसेच कंपनीच्या अभिलेखांच्या आमच्या तपासणीच्या आधारे, सर्व स्थावर मालमत्तांचे मालकी हक्क दस्तऐवज (टायटल डीड्स) कंपनीच्या नावावर आहेत. (इ) वित्तीय वर्षादरम्यान, कंपनीने नोंदणीकृत मूल्यधारकाकडून मिळालेल्या मूल्यमापनाच्या आधारे आपली मालमत्ता, संयंत्र व उपस्करांचे (प्लँट आणि इक्विपमेंटचे) (वापराच्या अधिकाराच्या मालमत्तेसह) आणि अमूर्त मालमत्तेचे पुनर्मूल्यांकन केलेले नाही. त्यामुळे, ३१ मार्च २०२२ रोजी संपलेल्या वर्षात सदर मालमत्तेच्या (मालमत्ता वर्गाच्या) निव्वळ वहन मूल्याच्या (कॅरिंग व्हॅल्यूच्या) एकूण रकमेतील कोणतीही वाढ किंवा घट आम्ही निश्चित करू शकत नाही. (फ) आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणांनुसार तसेच कंपनीच्या अभिलेखांच्या आमच्या तपासणीच्या आधारे, बेनामी मालमत्ता हस्तांतरण (प्रतिबंध) कायदा, १९८८ आणि त्याअन्वये तयार केलेल्या नियमांनुसार कंपनीविरुद्ध बेनामी मालमत्ता बाळगल्याबद्दल कोणतीही कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आलेली नाही.	वित्तीय वर्ष २०१४-१५ मध्ये, सर्व स्थायी मालमत्तेच्या पडताळणीचे काम स्वतंत्र सनदी लेखापाल संस्थेद्वारे करण्यात आले होते आणि वित्तीय वर्ष २०१६-१७ पासून स्थायी मालमत्तेमधील नवीन जोडण्यांचा त्यात समावेश करण्यात आला होता. त्यामुळे आम्ही स्थायी मालमत्ता नोंदवही (रजिस्टर) राखत आहोत. याव्यतिरिक्त, आमचे विभागीय व्यवस्थापक मार्च २०२२ अखेर स्थायी मालमत्तेची नेहमी प्रत्यक्ष पडताळणी करत असतात.
२.	कंपनीच्या वस्तुसूचीच्या संदर्भात: (अ) वित्तीय वर्षादरम्यान व्यवस्थापनाद्वारे महामंडळाच्या वस्तुसूचीची कोणतीही भौतिक (प्रत्यक्ष) पडताळणी करण्यात आलेली नाही. (ब) महामंडळाचा आकार आणि तिच्या व्यवसायाचे स्वरूप लक्षात घेता, व्यवस्थापनाद्वारे वस्तुसूचीची प्रत्यक्ष पडताळणी करण्यासाठी कोणतीही वाजवी, पर्याप्त आणि पद्धतशीर कार्यप्रणाली अस्तित्वात नाही. (क) वित्तीय वर्षादरम्यान वस्तुसूचीची प्रत्यक्ष पडताळणी न केल्यामुळे, पडताळणीअंती आढळणाऱ्या कोणत्याही लक्षणीय विसंगतीची (फरकाची) विल्हेवाट लावण्याबाबत किंवा त्यावर भाष्य करण्यास आम्ही असमर्थ आहोत.	पैठण, नवी दिल्ली, जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यूटीसी), अहमदनगर आणि कुडाळ येथील वस्तुसूचीची मार्च २०२२ अखेर संबंधित व्यक्तींद्वारे प्रत्यक्ष पडताळणी करण्यात आली आहे.
३.	आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, महामंडळाने कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १८९ अन्वये राखलेल्या नोंदवहीत (रजिस्टरमध्ये) समाविष्ट असलेल्या कंपन्या, भागीदारी संस्था किंवा इतर पक्षांना कोणतेही तारण असलेले अथवा तारण नसलेले कर्ज दिलेले नाही; तसेच अशा कंपन्या, भागीदारी संस्था किंवा इतर पक्षांकडून कोणतेही तारण असलेले अथवा तारण नसलेले कर्ज घेतलेले नाही.	नाही, असा कोणताही व्यवहार झालेला नसल्यामुळे ही माहिती निरंक आहे.
४.	आमच्या मते आणि आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणांनुसार, महामंडळाने वितरित केलेली कर्जे आणि केलेल्या गुंतवणुकीच्या संदर्भात कायद्याच्या कलम १८५ आणि १८६ च्या तरतुदींचे पालन केले आहे. महामंडळाने कोणतीही हमी (गॅरंटी) जारी केलेली नाही किंवा कोणतेही तारण (सुरक्षा) दिलेले नाही.	नोंद घेतली.

वित्तीय वर्ष २०२१-२२ च्या लेखापरीक्षकांच्या अहवालास उत्तर (स्वतंत्र)

	स्वतंत्र लेखापरीक्षकांच्या अहवालातील ''परिशिष्ट अ''	
५.	आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणांनुसार; ज्यांना भारतीय रिझर्व्ह बँकेने जारी केलेले निर्देश आणि कायद्याच्या कलम ७३ ते कलम ७६ च्या तरतुदी किंवा इतर कोणतीही संबंधित तरतूद आणि त्याअन्वये तयार केलेले नियम लागू होतात अशा ठेवी कंपनीने जनतेकडून स्वीकारलेल्या नाहीत.	नोंद घेतली.
६.	भारताच्या केंद्र सरकारने कंपनीद्वारे प्रदान केलेल्या कोणत्याही उत्पादनांसाठी किंवा सेवांसाठी कायद्याच्या कलम १४८ च्या उपकलम (१) अन्वये परिव्यय (खर्च) अभिलेख (कॉस्ट रेकॉर्ड्स) ठेवणे विहित केलेले नाही. त्यानुसार, या आदेशाच्या परिच्छेद ३(६) मधील तरतुदी कंपनीला लागू होत नाहीत.	नोंद घेतली.
७.	(अ) महामंडळाच्या अभिलेखांनुसार आणि आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणांनुसार, सेवाकर (रक्कम निश्चित करता येत नाही), कर वजावट – टीडीएस (रक्कम निश्चित करता येत नाही) आणि वस्तू व सेवाकर – जीएसटी (रक्कम निश्चित करता येत नाही) चा अपवाद वगळता, महामंडळ भविष्य निर्वाह निधी, गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी, कर्मचारी राज्य विमा, आयकर, विक्रीकर, संपत्तीकर, सीमाशुल्क, उत्पादन शुल्क, उपकर (सेस) आणि इतर लागू वैधानिक देणी योग्य प्राधिकरणांकडे नियमितपणे जमा करत आहे. महामंडळाने कर वजावट (टीडीएस) जमा करण्यात कसूर केली असून रु. २९.४० लाखांचे दायित्व थकीत आहे, तरीही महामंडळाकडून कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. महामंडळाच्या अभिलेखांनुसार आणि आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणांनुसार, आयकर, विक्रीकर, संपत्तीकर, सीमाशुल्क, उत्पादन शुल्क आणि उपकर या संदर्भात ३१ मार्च २०२२ रोजी संपलेल्या कालावधीत कोणतीही विवादरहित देय रक्कम ती देय झाल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांपेक्षा जास्त काळासाठी थकीत राहिलेली नाही.	नोंद घेतली.
	(ब) आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणांनुसार, खालील तक्त्यात नमूद केलेल्या बाबींव्यतिरिक्त, कोणत्याही विवादामुळे योग्य प्राधिकरणांकडे जमा न केलेली कोणतीही लक्षणीय वैधानिक देणी प्रलंबित नाहीत: कायद्याचे नाव | देयाचे स्वरूप | संबंधित कालावधी | रक्कम (रु.) | विवाद प्रलंबित असलेला मंच आयकर कायदा | आयकर मागणी | वित्तीय वर्ष २०११-१२ | ४६,६२,३९० | आयकर आयुक्त (अपील)	आयकराची प्रकरणे संबंधित प्राधिकरणाकडे अपीलात आहेत आणि आम्ही आमच्या सनदी लेखापाल संस्थेच्या माध्यमातून त्यांच्या उत्तरासाठी संबंधित प्राधिकरणाकडे या प्रकरणांचा पाठपुरावा करत आहोत.
८.	आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणांनुसार आणि आमच्याद्वारे तपासणी केलेल्या कंपनीच्या नोंदींनुसार, आयकर कायदा, १९६१ अंतर्गत चालू वर्षातील कर आकारणीदरम्यान उत्पन्न म्हणून घोषित केलेले किंवा प्रत्यार्पित झालेले (सरेंडर) असे कोणतेही उत्पन्न नाही, ज्याची नोंद हिशोबपुस्तकात केलेली नाही.	बरोबर

वित्तीय वर्ष २०२१-२२ च्या लेखापरीक्षकांच्या अहवालास उत्तर (स्वतंत्र)

	स्वतंत्र लेखापरीक्षकांच्या अहवालातील ''परिशिष्ट अ''	
९.	(अ) आम्हाला दिलेल्या माहिती, स्पष्टीकरणे आणि निवेदनांनुसार, महामंडळाने वित्तीय संस्था, बँका, सरकार किंवा कर्जरोखा (डिबेंचर) धारकांना त्यांच्या देय रकमांची परतफेड करण्यात कोणतीही कसूर केलेली नाही. महामंडळाकडे कर्जरोख्यांच्या स्वरूपातील कोणतेही कर्ज नाही. (ब) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणांनुसार आणि आमच्या लेखापरीक्षा प्रक्रियेच्या आधारे, आम्ही असे नोंदवतो की, कोणत्याही बँकेने, वित्तीय संस्थेने, सरकारने किंवा कोणत्याही सरकारी प्राधिकरणाने कंपनीला 'हेतुपुरस्सर कसूरदार' (विल्फुल डिफॉल्टर) घोषित केलेले नाही. (क) आमच्या मते आणि आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणांनुसार, मुदती कर्जे ज्या उद्देशांसाठी घेण्यात आली होती, त्याच उद्देशांसाठी त्यांचा वापर करण्यात आला आहे. (ड) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणांनुसार, आमच्याद्वारे राबविलेल्या प्रक्रियेनुसार आणि कंपनीच्या वित्तीय विवरणांच्या सर्वसमावेशक तपासणीच्या आधारे, आम्ही असे नोंदवतो की, कंपनीने अल्पकालीन आधारावर उभारलेला कोणताही निधी दीर्घकालीन उद्देशांसाठी वापरलेला नाही. (इ) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणांनुसार आणि कंपनीच्या वित्तीय विवरणांच्या सर्वसमावेशक तपासणीच्या आधारे, आम्ही असे नोंदवतो की, कंपनीने आपल्या साहाय्यक कंपन्या, सहयोगी संस्था किंवा संयुक्त उपक्रमांची (जॉइंट व्हेंचर्सची) दायित्वे पूर्ण करण्यासाठी किंवा त्या अनुषंगाने कोणत्याही घटकाकडून किंवा व्यक्तीकडून कोणताही निधी घेतलेला नाही. (फ) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणांनुसार आणि आमच्याद्वारे राबविलेल्या प्रक्रियेनुसार, आम्ही असे नोंदवतो की, कंपनीने चालू वर्षात आपल्या साहाय्यक कंपन्या, संयुक्त उपक्रम किंवा सहयोगी कंपन्यांमधील रोखे (सिक्युरिटीज) गहाण ठेवून कोणतेही कर्ज उभारलेले नाही.	बरोबर (अ ते फ).
१०.	(अ) कंपनीने चालू वर्षात आरंभिक जाहीर प्रस्तावाद्वारे (आयपीओद्वारे) किंवा पुढील जाहीर प्रस्तावाद्वारे (कर्ज साधनांसह) कोणताही निधी उभारलेला नाही. त्यानुसार, या आदेशाच्या परिच्छेद ३(१०)(अ) अंतर्गत अहवाल देणे कंपनीला लागू होत नाही. (ब) कंपनीने चालू वर्षात खासगी नियोजनाद्वारे (प्रायव्हेट प्लेसमेंटद्वारे) कायद्याच्या कलम ४२ आणि कलम ६२ च्या आवश्यकतांनुसार असणे आवश्यक अशा कर्जरोख्यांचे समभागांमध्ये (इक्विटी शेअर्समध्ये) रूपांतर केलेले नाही. त्यानुसार, या आदेशाच्या परिच्छेद ३(१०)(ब) अंतर्गत अहवाल देणे कंपनीला लागू होत नाही.	व्यवस्थापनाचे उत्तर: लागू नाही (अ आणि ब).

वित्तीय वर्ष २०२१-२२ च्या लेखापरीक्षकांच्या अहवालास उत्तर (स्वतंत्र)

	स्वतंत्र लेखापरीक्षकांच्या अहवालातील ''परिशिष्ट अ''	
११.	(अ) भारतात सामान्यतः स्वीकारल्या गेलेल्या लेखापरीक्षा पद्धतींनुसार केलेल्या कंपनीच्या हिशोबपुस्तकांच्या आणि अभिलेखांच्या तपासणीदरम्यान, तसेच आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणांनुसार, चालू वर्षात कंपनीद्वारे किंवा कंपनीवर झालेला कोणताही लक्षणीय फसवणुकीचा प्रसंग आमच्या निदर्शनास आलेला नाही किंवा नोंदवला गेलेला नाही, तसेच व्यवस्थापनाद्वारेही आम्हाला अशा कोणत्याही प्रकरणाची माहिती दिलेली नाही. (ब) भारतात सामान्यतः स्वीकारल्या गेलेल्या लेखापरीक्षा पद्धतींनुसार केलेल्या कंपनीच्या हिशोबपुस्तकांच्या आणि अभिलेखांच्या तपासणीदरम्यान, तसेच आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणांनुसार, कायद्याच्या कलम १४३(१२) अंतर्गत 'एडीटी-४' या प्रपत्रात (फॉर्मात) अहवाल सादर करणे आवश्यक नव्हते. त्यानुसार, या आदेशाच्या परिच्छेद ३(११)(ब) अंतर्गत अहवाल देणे कंपनीला लागू होत नाही. (क) भारतात सामान्यतः स्वीकारल्या गेलेल्या लेखापरीक्षा पद्धतींनुसार केलेल्या कंपनीच्या हिशोबपुस्तकांच्या आणि अभिलेखांच्या तपासणीदरम्यान, तसेच आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणांनुसार आणि व्यवस्थापनाने आमच्याकडे सादर केलेल्या निवेदनानुसार, चालू वर्षात कंपनीकडे कोणतीही व्हिसलब्लोअर (गैरव्यवहार उघडकीस आणणारी) तक्रार प्राप्त झालेली नाही. त्यानुसार, या आदेशाच्या परिच्छेद ३(११)(क) अंतर्गत अहवाल देणे कंपनीला लागू होत नाही.	नोंद घेतली (अ ते क)
१२.	कंपनी ही निधी कंपनी नसल्यामुळे आणि निधी नियम, २०१४ तिला लागू होत नसल्यामुळे, या आदेशाच्या परिच्छेद ३(१२) अंतर्गत अहवाल देणे कंपनीला लागू होत नाही.	नोंद घेतली.
१३.	कंपनीने कायद्याच्या कलम १७७ आणि १८८ च्या तरतुदींचे पालन करून संबंधित पक्षांसोबत (रिलेटेड पार्टीजसोबत) व्यवहार केले आहेत. अशा संबंधित पक्षांच्या व्यवहारांचे तपशील वित्तीय विवरणांमध्ये नोंद क्रमांक ३४(ब) अंतर्गत प्रकट करण्यात आले आहेत, जे कायद्याच्या कलम १३३ अन्वये विहित केलेल्या लेखांकन मानक १८ ''संबंधित पक्षांचे प्रकटीकरण'' नुसार आवश्यक आहे.	लागू नाही.
१४.	(अ) आमच्या मते आणि आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणांनुसार, कंपनीकडे कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३८ नुसार अंतर्गत लेखापरीक्षा प्रणाली अस्तित्वात आहे. (ब) आम्ही लेखापरीक्षणाधीन कालावधीसाठीच्या अंतर्गत लेखापरीक्षकांच्या अहवालांचा विचार केला आहे.	नोंद घेतली आहे आणि प्रकट केले आहे.
१५.	आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणांनुसार तसेच महामंडळाच्या अभिलेखांच्या आमच्या तपासणीच्या आधारे, महामंडळाने संचालकांशी किंवा त्यांच्याशी संबंधित व्यक्तींशी कोणताही गैर-रोख (रोखीशिवायचा) व्यवहार केलेला नाही. त्यानुसार, या आदेशाचा परिच्छेद ३(१५) लागू होत नाही.	नोंद घेतली.

वित्तीय वर्ष २०२१-२२ च्या लेखापरीक्षकांच्या अहवालास उत्तर (स्वतंत्र)

	स्वतंत्र लेखापरीक्षकांच्या अहवालातील ''परिशिष्ट अ''	
१६.	(अ) आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणांनुसार तसेच महामंडळाच्या अभिलेखांच्या आमच्या तपासणीच्या आधारे, महामंडळाला भारतीय रिझर्व्ह बँक कायदा, १९३४ च्या कलम ४५-१अ अंतर्गत नोंदणी करणे आवश्यक नाही. (ब) कंपनीने चालू वर्षात बिगर-बँकिंग वित्तीय क्रियाकलाप केलेले नाहीत. त्यानुसार, या आदेशाच्या परिच्छेद ३(१६)(ब) अंतर्गत अहवाल देणे कंपनीला लागू होत नाही. (क) भारतीय रिझर्व्ह बँकेने तयार केलेल्या नियमांमध्ये परिभाषित केल्यानुसार कंपनी ही मुख्य गुंतवणूक कंपनी (कोअर इन्व्हेस्टमेंट कंपनी) नाही. त्यानुसार, या आदेशाच्या परिच्छेद ३(१६)(क) अंतर्गत अहवाल देणे कंपनीला लागू होत नाही. (ड) कंपनीच्या व्यवस्थापनाने दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणांच्या आधारे, समूहामध्ये मुख्य गुंतवणूक कंपन्यांचा समावेश नाही, ज्या समूहाचा भाग आहेत. तथापि, व्यवस्थापनाने दिलेली माहिती अचूक आणि पूर्ण आहे की नाही, याचे आम्ही स्वतंत्रपणे मूल्यमापन केलेले नाही. त्यानुसार, या आदेशाच्या परिच्छेद ३(१६)(ड) अंतर्गत अहवाल देणे कंपनीला लागू होत नाही.	नोंद घेतली (अ ते ड).
१७.	कंपनीला एकूण १.४७ कोटींचा तोटा झाला आहे, ज्यापैकी २४.३९ लाख घसारा (डेप्रिसिएशन) असून उर्वरित १.२३ कोटी हा वित्तीय वर्षातील रोख तोटा (कॅश लॉस) आहे.	लागू नाही.
१८.	चालू वर्षात वैधानिक लेखापरीक्षकांनी (स्टॅच्युटरी ऑडिटर्सनी) राजीनामा दिलेला नाही आणि त्यानुसार परिच्छेद (१८) अंतर्गत अहवाल देणे कंपनीला लागू होत नाही.	बरोबर.
१९.	आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणांनुसार आणि वित्तीय विवरणांमधील नोंद ३५ मधील वित्तीय गुणोत्तरांच्या आधारे, वित्तीय मालमत्तेच्या वसुलीचा आणि वित्तीय दायित्वांच्या (देण्यांच्या) प्रदानाचा कालावधी व अपेक्षित तारखा, वित्तीय विवरणांसोबत असलेली इतर माहिती, संचालक मंडळ आणि व्यवस्थापनाच्या योजनांविषयीचे आमचे ज्ञान तसेच गृहीतकांना पुष्टी देणाऱ्या पुराव्यांच्या आमच्या तपासणीच्या आधारे, आमच्या निदर्शनास असे काहीही आलेले नाही, ज्यामुळे आम्हाला असे वाटेल की लेखापरीक्षा अहवालाच्या तारखेला अशी कोणतीही लक्षणीय अनिश्चितता अस्तित्वात आहे की कंपनी ताळेबंदाच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीत देय होणारी ताळेबंदाच्या तारखेची दायित्वे पूर्ण करण्यास सक्षम नाही. तथापि, आम्ही असे स्पष्ट करतो की, हे कंपनीच्या भविष्यातील दायित्वांची पूर्तता करण्याबाबतचे कोणतेही आश्वासन नाही. आम्ही पुढे असेही नमूद करतो की, आमचा हा अहवाल लेखापरीक्षा अहवालाच्या तारखेपर्यंतच्या तथ्यांवर आधारित आहे आणि ताळेबंदाच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीत देय होणारी सर्व दायित्वे कंपनीद्वारे ती देय होतील तशी पूर्ण केली जातील, याची आम्ही कोणतीही हमी अथवा आश्वासन देत नाही.	नोंद घेतली.
२०.	आमच्या मते आणि आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणांनुसार, कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३५(५) अन्वये कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (कंपनीची सामाजिक जबाबदारी - सीएसआर) लेखापरीक्षणाधीन वर्षात कंपनीला लागू होत नाही.	नोंद घेतली.
२१.	स्वतंत्र वित्तीय विवरणांच्या लेखापरीक्षणाच्या संदर्भात या आदेशाच्या परिच्छेद ३(२१) अंतर्गत अहवाल देणे लागू होत नाही. त्यानुसार, सदर परिच्छेदाच्या संदर्भातील कोणतेही भाष्य या अहवालात समाविष्ट करण्यात आलेले नाही.	नोंद घेतली.

3
9-4-26

10
09/04/26

महालेखाकार का कार्यालय (लेखापरीक्षा - II)
महाराष्ट्र, मुंबई शाखा कार्यालय,
तल मंजिल, प्रतिष्ठा भवन, 101,
महर्षि कर्वे मार्ग, मुंबई - 400 020.

SUPREME AUDIT INSTITUTION OF INDIA
लोकहितार्थ सत्यनिष्ठा
Dedicated to Truth in Public Interest

OFFICE OF THE ACCOUNTANT
GENERAL (AUDIT - II) MAHARASHTRA,
BRANCH OFFICE MUMBAI,
GROUND FLOOR, PRATISHTHA BHAVAN,
101, M.K. MARG, MUMBAI - 400 020.

मले/लेप-II/मुंबई शाखा/तकनीकी अनुभाग/स्माल स्केल/समायोजित/2021-22/626 दिनांक / Date : 27/03/2026

सेवा मे,

प्रबंध निदेशक,
महाराष्ट्र स्माल स्केल इंडस्ट्रीज़ डेव्लपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड,
मुंबई।

विषयः- 31 मार्च 2022 को समाप्त हुए वर्ष के महाराष्ट्र स्माल स्केल इंडस्ट्रीज़ डेव्लपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड (समायोजित) के लेखों पर कंपनी अधिनियम, 2013 की धारा 143(6)(b) के अंतर्गत भारत के नियंत्रक व महालेखापरीक्षक की टिप्पणियाँ।

महोदय,

31 मार्च, 2022 को समाप्त हुए वर्ष के **महाराष्ट्र स्माल स्केल इंडस्ट्रीज़ डेव्लपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड** के **समायोजित** लेखों पर कंपनी अधिनियम, 2013 की धारा 143(6)(b) के अंतर्गत भारत के नियंत्रक एवं महालेखापरीक्षक का निरंक टिप्पणी प्रमाणपत्र (Nil Comment Certificate) संलग्न है।

वार्षिक आमसभा (A.G.M.) होने के पश्चात, वार्षिक रिपोर्ट की तीन मुद्रित प्रतियाँ कृपया इस कार्यालया को भेज दें, साथ ही उपरोक्त लेखों के वार्षिक प्रतिवेदन को विधानसभा में प्रस्तुत करने की तिथि को भी इस कार्यालय को सूचित करें।

भवदीया,

संलग्नक : यथोपरि।

(शुभांगी, *IAAS*)
वरिष्ठ उपमहालेखाकार
महालेखाकार (लेखापरीक्षा)- II महाराष्ट्र
शाखा कार्यालय मुम्बई।

H	MD	JMD	SECY
rC	RECEIVED M.S.S.I.D.C. LTD. 49 07 APR 2026 MUMBAI - 400001 S. No.		MD
			ADM
MRK			RM
CH	HCT	PRO	EPP	CWH

FXA

Phone : 022-2205 4022 / 022-2205 7360
Email : agcommaumaharashtra@cag.gov.in

COMMENTS OF THE COMPTROLLER & AUDITOR GENERAL OF INDIA UNDER SECTION 143(6)(b) READ WITH SECTION 129(4) OF THE COMPANIES ACT, 2013 2013 ON THE CONSOLIDATED FINANCIAL STATEMENTS OF MAHARASHTRA SMALL SCALE INDUSTRIES DEVELOPMENT CORPORATION LIMITED FOR THE YEAR ENDED 31 MARCH 2022.

The preparation of Consolidated financial statements of **Maharashtra Small Scale Industries Development Corporation Limited** for the year ended **31 March 2022** in accordance with the financial reporting framework prescribed under the Companies Act, 2013 (Act) is the responsibility of the management of the company. The Statutory Auditors appointed by the Comptroller and Auditor General of India under Section 139(5) read with Section 129 (4) of the Act are responsible for expressing opinion on the Financial Statements under Section 143 read with Section 129 (4) of the Act based on independent audit in accordance with the standards on auditing prescribed under Section 143(10) of the Act. This is stated to have been done by them vide their Audit Report dated **26 September 2025**.

I, on behalf of the Comptroller and Auditor General of India, have conducted supplementary audit of the consolidated financial statements of **Maharashtra Small Scale Industries Development Corporation Limited** for the year ended **31 March 2022** under Section 143(6)(a) read with Section 129(4) of the Act. We conducted a supplementary audit of the Financial Statements of Krupanidhi Ltd (subsidiary of the Company) for the year ended on that date. This supplementary audit has been carried out independently without access to the working papers of the statutory auditors and is limited primarily to inquiries of the statutory auditors and company personnel and a selective examination of some of the accounting records.

On the basis of my supplementary audit nothing significant has come to my knowledge which would give rise to any comment upon or supplement to statutory auditors' report under section 143(6)(b) of the Act.

For and on behalf of the
Comptroller and Auditor General of India

Shirsat 27.03.26

Place: Nagpur
Date: 27/03/2026

(Dattaprasad S. Shirsat)
Accountant General (Audit-II) Maharashtra

महालेखाकार का कार्यालय (लेखापरीक्षा - II)
महाराष्ट्र, मुंबई शाखा कार्यालय,
तल मंजिल, प्रतिष्ठा भवन, 101,
महर्षि कर्वे मार्ग, मुंबई - 400 020.

SUPREME AUDIT INSTITUTION OF INDIA
लोकहितार्थ सत्यनिष्ठा
Dedicated to Truth in Public Interest

OFFICE OF THE ACCOUNTANT GENERAL (AUDIT - II) MAHARASHTRA,
BRANCH OFFICE MUMBAI,
GROUND FLOOR, PRATISHTHA BHAVAN,
101, M.K. MARG, MUMBAI - 400 020.

मले/लेप-II/मुंबई शाखा/तकनीकी अनुभाग/स्माल स्केल/समायोजित/2021-22/629 दिनांक / Date : 27/03/2026

सेवा में,

प्रबंध निदेशक,
महाराष्ट्र स्माल स्केल इंडस्ट्रीज़ डेव्लपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड,
मुंबई।

विषय: महाराष्ट्र स्माल स्केल इंडस्ट्रीज़ डेव्लपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड (समायोजित) के वर्ष 2021-22 के वित्तीय विवरणों की लेखापरीक्षा में कंपनी अधिनियम, 2013 की धारा 143(6)(बी) के तहत कमियां देखी गईं है।

विषय: Deficiencies noticed in the audit of financial statements of Maharashtra Small Scale Industries Development Corporation Limited (Consolidated) for the year 2021-22 under section 143(6)(b) of the Companies Act, 2013.

महोदय/महोदया,

कंपनी अधिनियम, 2013 की धारा 143(6)(a) के तहत इस कार्यालय द्वारा **महाराष्ट्र स्माल स्केल इंडस्ट्रीज़ डेव्लपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड (समायोजित)** के वर्ष 2021-22 के लेखो की लेखापरीक्षा की गई थी। लेखापरीक्षा के दौरान प्राप्त कुछ मुद्दों/ टिप्पणियों पर प्रबंधन को ध्यान देने की आवश्यकता है।

The supplementary audit of the Financial Statements of **Maharashtra Small Scale Industries Development Corporation Limited (Consolidated)** for the year 2021-22 section 143(6)(b) of Companies Act 2013 was recently undertaken by this office. During the course of audit, the following issue was noticed which needs the attention of the management:

A. COMMENTS ON FINANCIAL POSITION

Balance Sheet
Assets
Long terms loans and Advances (Note 13) – Rs. 3394.49 lakh

1. The company has included Advance Tax and Tax Deducted at Source (TDS) amounting to ₹.7.53 crore under the head "Long-Term Loans and Advances". of the balance sheet.

CH | MD | JMD | SECY
FC | RECEIVED M.S.S.I.D.C. LTD. 07 APR 2026 MUMBAI - 400001 S. No. | MD
MRK | ADM
RM
CH | HCT | PRO | EPP | CWH

Phone : 022-2205 4022 / 022-2205 7360
Email : agcommaumaharashtra@cag.gov.in

Advance Tax and TDS represent statutory tax assets recoverable from the Income Tax Department and are required to be disclosed separately in accordance with Schedule III of the Companies Act, 2013 and established accounting principles.

The Company may give a suitable disclosure and presentation in accordance with Schedule - III.

B. COMMENTS ON DISCLOSURE

Statement of Profit and loss
Prior Period Expenses Rs.10.34 lakh

2. The company has charged ₹ 10.34 lakh prior period expenses to the Profit and Loss Account for the year 2021-22. The nature-wise details of these expenses have been disclosed in the Notes to Accounts under Note 28.

However, the financial statements do not disclose the financial year(s) to which these expenses relate nor the reasons why these expenses became payable during the current year, as required under Accounting Standard-5 (Net Profit or Loss for the Period, Prior Period Items).

Equity and Liabilities: Rs. 16563.30 lakhs
Other Current Liabilities: Rs. 7124.84 lakhs
Other Miscellaneous Liabilities: Rs. 3460.34 lakhs

3. As per the Accounting Standards (AS) 12 (Accounting for Government Grants), the receipt of government grants by an enterprise is significant for preparation of the financial statements and an appropriate method of accounting is necessary. Further, in case of Government Grants following disclosures are required: (i) The accounting policy adopted for government grants, including the methods of presentation in the financial statements; (ii) the nature and extent of government grants recognised in the financial statements, including grants of non-monetary assets given at a concessional rate or free of cost.

The company received following grants from the Central Government and Government of Maharashtra during 2010-11 to 2021-22 which is included under Other Miscellaneous Liabilities:

Sr. No.	Particulars of the Grants	Amt. of the Grants received (Rs. in lakhs)
1.	Central Government Grants	5.33
2.	Exhibition Accounts (Grant received from Central and State Govt for Handicraft Development and IITF Exhibition)	582.30
3.	Gold Beads Craft	44.66
4.	State Government Grants	947.00

5.	State Government Grants (CFC)	233.23
6.	Bamboo Trading Centre (Akola, Jalgaon, Nanded, and Bhandara)	9.87
7.	Fund received from GOM for the schemes of Districts	3.83
8.	Training Programme Market Dev. & Marketing under Coir	25.00
	Total Grant Received	**1851.22**

The financial statements of MSSIDC do not provide a comprehensive reconciliation of government grants received, utilized, and unutilized, nor do they clarify deviations and unlinked funds to specific sanctioned projects. This does not align with the mandatory disclosure requirements of AS 12 (Section: Disclosure Requirements).

प्रबंधन द्वारा उपरोक्त मुद्दों पर उचित कार्यवाही की जा सकती है।

Management may take necessary steps under intimation to Audit in this regard.

भवदीया,

(शुभांगी, *IAAS*)
वरिष्ठ उपमहालेखाकार
महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, महाराष्ट्र,
शाखा कार्यालय मुम्बई।

महालेखाकार का कार्यालय (लेखापरीक्षा - II)
महाराष्ट्र, मुंबई शाखा कार्यालय,
तल मंजिल, प्रतिष्ठा भवन, 101,
महर्षि कर्वे मार्ग, मुंबई - 400 020.

SUPREME AUDIT INSTITUTION OF INDIA
लोकहितार्थ सत्यनिष्ठा
Dedicated to Truth in Public Interest

OFFICE OF THE ACCOUNTANT
GENERAL (AUDIT - II) MAHARASHTRA,
BRANCH OFFICE MUMBAI,
GROUND FLOOR, PRATISHTHA BHAVAN,
101, M.K. MARG, MUMBAI - 400 020.

मले/लेप-II/शाखा कार्यालय/ मुम्बई/तकनीकी अनुभाग/MSSIDC/2021-22/622 दिनांक / Date : 27/03/2026

सेवा में,

प्रबंध निदेशक,
महाराष्ट्र स्माल स्केल इंडस्ट्रीज़ डेव्लपमेंट कार्पोरेशन लिमिटेड,
कृपानिधि बिल्डिंग, बॅलार्ड इस्टेट,
फोर्ट, मुंबई – 400001

विषय:- 31 मार्च 2022 को समाप्त हुए वर्ष के महाराष्ट्र स्माल स्केल इंडस्ट्रीज़ डेव्लपमेंट कार्पोरेशन लिमिटेड के लेखों पर कम्पनी अधिनियम, 2013 की धारा 143(6)(b) के अंतर्गत भारत के नियंत्रक एवं महालेखापरीक्षक की टिप्पणियां।

महोदय,

31 मार्च, 2022 को समाप्त हुए वर्ष के **महाराष्ट्र स्माल स्केल इंडस्ट्रीज़ डेव्लपमेंट कार्पोरेशन लिमिटेड** के लेखों पर कंपनी अधिनियम, 2013 की धारा 143(6)(b) के अंतर्गत भारत के नियंत्रक एवं महालेखापरीक्षक की निरंक टिप्पणी प्रमाणपत्र (NIL comment certificate) संलग्न है।

वार्षिक आमसभा (A.G.M.) होने के पश्चात, वार्षिक रिपोर्ट की तीन मुद्रित प्रतियाँ कृपया इस कार्यालया को भेज दें, साथ ही उपरोक्त लेखों के वार्षिक प्रतिवेदन को विधानसभा में प्रस्तुत करने की तिथि को भी इस कार्यालय को सूचित करें।

भवदीया,

संलग्नक: यथोपरि।

(शुभांगी, *IAAS*)
वरिष्ठ उपमहालेखाकार
महालेखाकार (लेखापरीक्षा)- II महाराष्ट्र,
शाखा कार्यालय मुम्बई।

CH | MD | JMD | SECY
FC | RECEIVED M.S.S.I.D.C. LTD. 07 APR 2026 MUMBAI - 400001 S. No. | MD
MRK | ADM | RM
CH | HOT | PRO | EP

Phone : 022-2205 4022 / 022-2205 7360 Email : agcommaumaharashtra@cag.gov.in

COMMENTS OF THE COMPTROLLER & AUDITOR GENERAL OF INDIA UNDER SECTION 143(6)(b) OF THE COMPANIES ACT, 2013 2013 ON THE STANDALONE FINANCIAL STATEMENTS OF MAHARASHTRA SMALL SCALE INDUSTRIES DEVELOPMENT CORPORATION LIMITED FOR THE YEAR ENDED 31 MARCH 2022.

The preparation of financial statements of **Maharashtra Small Scale Industries Development Corporation Limited** for the year ended **31 March 2022** in accordance with the financial reporting framework prescribed under the Companies Act, 2013 (Act) is the responsibility of the management of the company. The statutory auditor/auditors appointed by the Comptroller and Auditor General of India under section 139 (5) of the Act are responsible for expressing opinion on the financial statements under section 143 of the Act based on independent audit in accordance with the standards on auditing prescribed under section 143(10) of the Act. This is stated to have been done by them vide their Audit Report dated **26 September 2025**.

I, on behalf of the Comptroller and Auditor General of India, have conducted a supplementary audit of the financial statements of **Maharashtra Small Scale Industries Development Corporation Limited** for the year ended **31 March 2022** under Section 143(6)(a) of the Act. This supplementary audit has been carried out independently without access to the working papers of the statutory auditors and is limited primarily to inquiries of the statutory auditors and company personnel and a selective examination of some of the accounting records.

On the basis of my supplementary audit nothing significant has come to my knowledge which would give rise to any comment upon or supplement to statutory auditors' report under section 143(6)(b) of the Act.

For and on behalf of the
Comptroller and Auditor General of India

Shirsat 27.03.26

(Dattaprasad S. Shirsat)
Accountant General (Audit)-II Maharashtra

Place: Nagpur
Date: 27/03/2026

महालेखाकार का कार्यालय (लेखापरीक्षा - II)
महाराष्ट्र, मुंबई शाखा कार्यालय,
तल मंजिल, प्रतिष्ठा भवन, 101,
महर्षि कर्वे मार्ग, मुंबई - 400 020.

SUPREME AUDIT INSTITUTION OF INDIA
लोकहितार्थ सत्यनिष्ठा
Dedicated to Truth in Public Interest

OFFICE OF THE ACCOUNTANT
GENERAL (AUDIT - II) MAHARASHTRA,
BRANCH OFFICE MUMBAI,
GROUND FLOOR, PRATISHTHA BHAVAN,
101, M.K. MARG, MUMBAI - 400 020.

2
9-4-26
11
09/04/26

दिनांक / Date : 27/03/2026

मले/लेप-II/मुंबई शाखा/तकनीकी अनुभाग/MSSIDC/2021-22/ 625

सेवा में,

प्रबंध निदेशक,
महाराष्ट्र स्माल स्केल इंडस्ट्रीज़ डेव्लपमेंट कार्पोरेशन लिमिटेड,
कृपानिधि बिल्डिंग, बॅलार्ड इस्टेट,
फोर्ट, मुंबई – 400001

विषय: महाराष्ट्र स्माल स्केल इंडस्ट्रीज़ डेव्लपमेंट कार्पोरेशन लिमिटेड के वर्ष 2021-22 के वित्तीय विवरणों की लेखापरीक्षा में कंपनी अधिनियम, 2013 की धारा 143(6)(बी) के तहत कमियां देखी गईं है।

विषय: Deficiencies noticed in the audit of financial statements of Maharashtra Small Scale Industries Development Corporation Limited for the year 2021-22 under section 143(6)(b) of the Companies Act, 2013.

महोदय/महोदया,

कंपनी अधिनियम, 2013 की धारा 143(6)(b) के तहत इस कार्यालय द्वारा **महाराष्ट्र स्माल स्केल इंडस्ट्रीज़ डेव्लपमेंट कार्पोरेशन लिमिटेड के वर्ष 2021-22** के लेखो की लेखापरीक्षा की गई थी। लेखापरीक्षा के दौरान प्राप्त कुछ मुद्दों/ टिप्पणियों पर प्रबंधन को ध्यान देने की आवश्यकता है।

The supplementary audit of the Financial Statements of **Maharashtra Small Scale Industries Development Corporation Limited for the year 2021-22** section 143(6)(b) of Companies Act 2013 was recently undertaken by this office. During the course of audit, the following issue was noticed which needs the attention of the management:

A. COMMENTS ON FINANCIAL POSITION

Balance Sheet
Assets
Long terms loans and Advances – Rs.3394.49 lakh (Note 12)

1. The company has included Advance Tax and Tax Deducted at Source (TDS) amounting to ₹.7.53 crore under the head "Long-Term Loans and Advances". of the balance sheet.

CH | MD | JMD | SECY
FC | RECEIVED M.S.S.I.D.C. LTD. 48 07 APR 2026 MUMBAI - 400001 S. No. | MD
MRK | ADM
RM
CH | HCT | PRO | EPP | CWH

FKA

Phone : 022-2205 4022 / 022-2205 7360
Email : agcommaumaharashtra@cag.gov.in

Advance Tax and TDS represent statutory tax assets recoverable from the Income Tax Department and are required to be disclosed separately in accordance with Schedule III of the Companies Act, 2013 and established accounting principles.

The Company may give a suitable disclosure and presentation in accordance with Schedule -III

B. COMMENTS ON DISCLOSURE

Statement of Profit and loss

Prior Period Expenses (Note 28): ₹ 10.34 lakh

2. The Corporation has charged ₹ 10.34 lakh prior period expenses to the Profit and Loss Account for the year 2021-22. The nature-wise details of these expenses have been disclosed in the Notes to Accounts under Note 28.

However, the financial statements do not disclose the financial year(s) to which these expenses relate nor the reasons why these expenses became payable during the current year, as required under Accounting Standard-5 (Net Profit or Loss for the Period, Prior Period Items).

Equity and Liabilities: Rs. 16308.89 lakhs
Other Current Liabilities: Rs. 7085.37 lakhs
Other Miscellaneous Liabilities : Rs. 3460.34 lakhs

3. As per the Accounting Standards (AS) 12 (Accounting for Government Grants), the receipt of government grants by an enterprise is significant for preparation of the financial statements and an appropriate method of accounting is necessary. Further, in case of Government Grants following disclosures are required: (i) The accounting policy adopted for government grants, including the methods of presentation in the financial statements; (ii) the nature and extent of government grants recognised in the financial statements, including grants of non-monetary assets given at a concessional rate or free of cost.

The company received following grants from the Central Government and Government of Maharashtra during 2010-11 to 2021-22 which is included under Other Miscellaneous Liabilities:

Sr. No.	Particulars of the Grants	Amt. of the Grants received (Rs. in lakhs)
1.	Central Government Grants	5.33
2.	Exhibition Accounts (Grant received from Central and State Govt for Handicraft Development and IITF Exhibition)	582.30

3.	Gold Beads Craft	44.66
4.	State Government Grants	947.00
5.	State Government Grants (CFC)	233.23
6.	Bamboo Trading Centre (Akola, Jalgaon, Nanded, and Bhandara)	9.87
7.	Fund received from GOM for the schemes of Districts	3.83
8.	Training Programme Market Dev. & Marketing under Coir	25.00
	Total Grant Received	**1851.22**

The financial statements of MSSIDC do not provide a comprehensive reconciliation of government grants received, utilized, and unutilized, nor do they clarify deviations and unlinked funds to specific sanctioned projects. This does not align with the mandatory disclosure requirements of AS 12.

प्रबंधन द्वारा उपरोक्त मुद्दों पर उचित कार्यवाही की जा सकती है।

Management may take necessary steps under intimation to Audit in this regard.

भवदीया,

(शुभांगी *IAAS*)
वरिष्ठ उपमहालेखाकार
महालेखाकार(लेखापरीक्षा)-II, महाराष्ट्र,
शाखा कार्यालय मुंबई

२०२१-२०२२

MSSIDC

महामंडळाची एकत्रित वित्तीय विवरणपत्रे

: नोंदणीकृत कार्यालय :

कृपानिधी, दुसरा मजला
९, वालचंद हिराचंद मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१.

महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित

दिनांक ३१ मार्च २०२२ रोजीचा संकलित ताळेबंद

रक्कम रुपयांत

विवरण	**नोंद क्रमांक**	**३१ मार्च २०२२**	**३१ मार्च २०२१**
भागभांडवल आणि देणी			
भागधारकांचा निधी			
भागभांडवल	३	१४,५०,०९,९००	१४,५०,०९,९००
राखीव निधी आणि जादा रक्कम	४	२४,४५,१२,६६२	२६,१०,३७,३६४
अल्पसंख्याक व्याज	**२**	**३८,000**	**३८,000**
बिगर-चालू दायित्वे (दीर्घकालीन देणी)			
दीर्घकालीन कर्जे	५	१,२३,५८,८१०	१,२३,५८,८१०
दीर्घकालीन तरतुदी	६	११,५२,२४,२३२	१०,८२,२६,८१४
चालू दायित्वे (अल्पकालीन देणी)			
व्यापारी देयके	७		
– सूक्ष्म आणि लघु उद्योगांना देणे		–	–
– इतरांना देणे		३५,८६,४७,७०८	३५,१५,९७,९२४
इतर चालू दायित्वे	८	७१,२४,८३,९२०	६८,३८,४१,४०९
अल्पकालीन तरतुदी	९	६,८०,५४,५१४	७,७९,१०,४५०
एकूण		**१,६५,६३,२९,७४५**	**१,६४,००,२०,६७१**
मालमत्ता			
बिगर-चालू मालमत्ता (दीर्घकालीन मालमत्ता)			
स्थायी मालमत्ता (स्थिर मालमत्ता)			
– मूर्त मालमत्ता	१०.१	८,५६,९४,१०७	८,९६,६४,६८७
– अमूर्त मालमत्ता	१०.२	२१,८८,३२८	२५,४४,०६४
बिगर-चालू गुंतवणुकी (दीर्घकालीन गुंतवणुकी)	११	४०,२५०	४०,२५०
आस्थगित कर मालमत्ता (निव्वळ)	१२	१,४२,९३,२८९	१,४४,८९,१९६
दीर्घकालीन कर्जे आणि अगाऊ रकम	१३	३३,९४,४८,५२०	२७,८५,३३,१६५
इतर बिगर-चालू मालमत्ता	१४	१८,३३,४७,३७८	१८,४९,९१,१८०
चालू मालमत्ता (अल्पकालीन मालमत्ता)			
वस्तुसूची	१५	७१,९८,००२	७२,३६,३६४
व्यापारी प्राप्ती (येणे बाकी)	१६	४१,७२,३४,१४७	३०,५१,४३,७२२
रोख आणि बँक शिल्लक	१७	५१,८३,१०,८२१	५५,५७,९८,१६५
अल्पकालीन कर्जे आणि अगाऊ रकमा	१८	६,२७,००,६५०	७,०७,०७,२६४
इतर चालू मालमत्ता	१९	२,५८,७४,२५३	१३,०८,७२,६१५
एकूण		**१,६५,६३,२९,७४५**	**१,६४,००,२०,६७१**

वैशिष्ट्यपूर्ण लेखा धोरणे १

या टीपा वित्तीय विवरणपत्राचा अविभाज्य भाग आहेत.

आमच्या समदिनांकाच्या अहवालानुसार

अंबावत जैन अँड असोसिएट्स एलएलपी
सनदी लेखापाल यांच्याकरिता
(संस्था नोंदणी क्रमांक : १०९६८१ डब्ल्यू)

कमल शर्मा
भागीदार
(सभासद क्र. ११२८४३)
स्थळ : मुंबई
दिनांक :
UDIN: 25112843BMOCQY7758

संचालक मंडळाच्या वतीने व करिता

मुख्य वित्तीय अधिकारी

व्यवस्थापकीय संचालक
DIN:11317828

कंपनी सचिव

संचालक
DIN:10741883

स्थळ : मुंबई
दिनांक : २६.०९.२०२५

महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित

३१ मार्च २०२२ रोजी संपलेल्या वर्षासाठीचे एकत्रित नफा–तोटा पत्रक

(रक्कम रुपयांमध्ये)

विवरण	नोंद क्रमांक	३१ मार्च २०२२	३१ मार्च २०२१
महसूल (उत्पन्न)			
कामकाजातून महसूल	२०	५,३५,०५,३८४	१३,००,६३,७१०
इतर उत्पन्न	२१	७,८१,९३,९९९	८,१२,६६,३४५
एकूण महसूल		**१३,१६,९९,३८३**	**२१,१३,३०,०५५**
खर्च			
वापरलेल्या कच्च्या मालाचा परिव्यय (खर्च)	२२	५,०५,८५५	४,२१,४९४
व्यापारी वस्तूंची खरेदी	२३	४,८३,७४,९९६	१२,६०,४०,७३३
उत्पादित माल, प्रगतीपथावरील काम आणि व्यापारी साठ्यातील बदल	२४	२,८०१	६१,९३३
कर्मचारी लाभ खर्च	२५	३,१६,२५,८८७	३,९३,४१,१४२
वित्त (वित्तीय) खर्च	२६	६,४७,२९५	६,१४,१८५
घसारा आणि कर्जमुक्ती (अमॉर्टायझेशन) खर्च	२७	२४,४०,१२१	२४,८८,२२५
इतर खर्च	२८	६,०७,१५,८०२	३,६०,००,८३७
एकूण खर्च		**१४,४३,१२,७५७**	**२०,४९,६८,५५०**
अपवादात्मक, असाधारण बाबी आणि करापूर्वीचा नफा/ (तोटा)		(१,२६,१३,३७४)	६३,६१,५०५
अपवादात्मक बाबी			
पूर्व कालावधीतील बाबी (निव्वळ)	२९	(१०,३४,२२६)	(१०,२६,३९,४१३)
इतर अपवादात्मक बाब		–	–
करापूर्वीचा नफा / (तोटा)		**(१,३६,४७,६००)**	**(९,६२,७७,९०७)**
कर खर्च			
चालू कर		–	–
मागील वर्षांचे कर समायोजन		८,४८,२०२	–
आस्थगित कर	१२	(१,९५,९०७)	(२,६९,४२५)
कालावधीसाठीचा नफा / (तोटा)		**(१,४६,९१,७०९)**	**(९,६५,४७,३३२)**
प्रति समभाग प्राप्ती (दर्शनी मूल्य १०, मागील वर्षी १०)	३०		
मूलभूत (बेसिक)		(१०.१३)	(६६.५८)
सुधारित (डायल्युटेड)		(१०.१३)	(६६.५८)

वैशिष्ट्यपूर्ण लेखा धोरणे १

या टीपा वित्तीय विवरणपत्राचा अविभाज्य भाग आहेत.

आमच्या समदिनांकाच्या अहवालानुसार

अंबावत जैन अँड असोसिएट्स एलएलपी
सनदी लेखापाल यांच्याकरिता
(संस्था नोंदणी क्रमांक : १०९६८१ डब्ल्यू)

कमल शर्मा
भागीदार
(सभासद क्र. ११२८४३)
स्थळ : मुंबई
दिनांक :
UDIN: 25112843BMOCQY7758

संचालक मंडळाच्या वतीने व करिता

मुख्य वित्तीय अधिकारी

व्यवस्थापकीय संचालक
DIN:11317828

कंपनी सचिव

संचालक
DIN:10741883

स्थळ : मुंबई
दिनांक : २६.०९.२०२५

महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित

३१ मार्च २०२२ रोजी संपलेल्या वर्षासाठीचे एकत्रित रोख प्रवाह पत्रक

(रक्कम रुपयांमध्ये)

विवरण	३१ मार्च २०२२	३१ मार्च २०२१
कामकाजातून (व्यवसायातून) रोख प्रवाह		
अपवादात्मक, असाधारण बाबी आणि करापूर्वीचा नफा / (तोटा)	(१,२६,१३,३७४)	७१,४८,३३८
समायोजन (ॲडजस्टमेंट्स):		
– घसारा व कर्जफेडीबाबतची तरतूद	२४,४०,१२१	२४,८८,२२५
– स्थिर मत्तेच्या बिघाड/पडझडीतील नुकसान	–	–
– व्याज आणि लाभांश उत्पन्न	(२,३९,८२,७६८)	(३,३६,४०,२९५)
– शंकास्पद प्राप्तीसाठी (येणे बाकीसाठी) तरतूद	–	–
– थकीत भाड्यासाठी तरतूद	–	–
– नफा तोटा खात्यामध्ये समाविष्ट केलेले अनुदान	(४२,३३८)	(४२,३३८)
– बाजारातील जोखमीसाठी राखीव हस्तांतरण	१,२५७	६,४१५
– आकस्मिक खर्चासाठी राखीव हस्तांतरण	–	–
– बाजारातील राखीव जोखमीतून वापर	–	(६,०८७)
खेळत्या भांडवलातील बदलानंतरचा चालू नफा/तोटा	**(३,४१,९७,१०१)**	**(२,४०,४५,७४२)**
खेळत्या भांडवलातील बदल:		
– व्यापारी प्राप्तीमधील (वाढ) / घट	(११,२०,९०,४२६)	(२,३०,३६,९३५)
– वस्तुसूचीमधील (वाढ) / घट	३८,३६२	(१,९३,०२५)
– इतर चालू मालमत्तेमधील (वाढ) / घट	१०,४९,९८,३६२	(२,३७,५७,३५९)
– अल्पकालीन कर्जे आणि अगाऊ रकमांमधील (वाढ) / घट	८०,०६,६१४	(३,१९,४५,९६७)
– दीर्घकालीन कर्जे आणि अगाऊ रकमांमधील (वाढ) / घट	(६,०९,१५,३५५)	३,९०,८२,३२२
– इतर बिगर–चालू मालमत्तेमधील (वाढ) / घट	१६,४३,८०२	(१,३०,९४,४४२)
– व्यापारी देयकांमध्ये वाढ / (घट)	७०,४९,७८४	२,०९,५६,१८६
– दीर्घकालीन तरतुदींमध्ये वाढ / (घट)	६९,९७,४१८	(१२,२५,४००)
– अल्पकालीन तरतुदींमध्ये वाढ / (घट)	(९८,५५,९३६)	(८२,९६,६२५)
– इतर चालू दायित्वांमध्ये वाढ / (घट)	२,८६,४२,५११	(१४,४४,६६,३४८)
– इतर दायित्वांमध्ये वाढ / (घट)	–	–
– दीर्घकालीन कर्जांमध्ये वाढ / (घट)	(०)	(०)
कामकाजातून निर्माण झालेली रोख	**(५,९६,८१,९६६)**	**(२१,००,२३,३३६)**
– भरलेला कर (परतावा वजा जाता)	(८,४८,२०२)	–
अपवादात्मक आणि असाधारण बाबींपूर्वी कामकाजातून मिळालेली निव्वळ रोख	**(६,०५,३०,१६८)**	**(२१,००,२३,३३६)**
– अपवादात्मक बाबी / पूर्व कालावधीतील बाबी	(१०,३४,२२६)	(१,०३,२२,५२०)
कामकाजातून (व्यवसायातून) मिळालेली निव्वळ रोख	**(६,१५,६४,३९४)**	**(२२,०३,४५,८५६)**
गुंतवणूक व्यवहारातून रोख प्रवाह		
– मूर्त मालमत्ता, प्रगतीपथावरील भांडवली कामाची खरेदी	९४,२८१	(२,१२,२५०)
– गुंतवणुकीची विक्री	–	–
– व्याज आणि लाभांश उत्पन्न	२,३९,८२,७६८	३,३६,४०,२९५

गुंतवणूक व्यवहारांतून मिळालेला निव्वळ रोख प्रवाह	**२,४०,७७,०४९**	**३,३४,२८,०४५**
वित्तीय व्यवहारांतून (निधी उभारणीतून) रोख प्रवाह	**–**	**–**
रोख आणि रोख समभागातील (कॅश इक्विव्हॅलंट) निव्वळ वाढ/ (घट)	**(३,७४,८७,३४५)**	**(१८,६९,१७,८१२)**
वर्षाच्या सुरुवातीला असलेली रोख आणि रोख समभाग	**५५,५७,९८,१६५**	**७४,२७,१५,९७७**
वर्षाच्या शेवटी असलेली रोख आणि रोख समभाग (नोंद १७ पहा)	**५१,८३,१०,८२१**	**५५,५७,९८,१६५**
महत्त्वपूर्ण लेखांकन धोरणांचा सारांश: १		
नोंद क्रमांक १ ते ३६ हे या वित्तीय विवरणांचे (फायनान्शियल स्टेटमेंट्सचे) अविभाज्य भाग आहेत.		

समदिनांकाच्या अहवालानुसार

अंबावत जैन अँड असोसिएट्स एलएलपी
सनदी लेखापाल यांच्याकरिता
(संस्था नोंदणी क्रमांक : १०९६८१ डब्ल्यू)

कमल शर्मा
भागीदार
(सभासद क्र. ११२८४३)
स्थळ : मुंबई
दिनांक :

UDIN: 25112843BMOCQY7758

संचालक मंडळाच्या वतीने व करिता

मुख्य वित्तीय अधिकारी

व्यवस्थापकीय संचालक
DIN:11317828

कंपनी सचिव

संचालक
DIN:10741883

स्थळ : मुंबई
दिनांक : २६.०९.२०२५

महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादित

३१ मार्च २०२२ रोजी संपलेल्या वर्षासाठीच्या एकत्रित वित्तीय विवरणांचे भाग असलेले स्पष्टीकरणात्मक टिपण

नोंद : १

१. एकत्रीकरणाची तत्त्वे

संयुक्त वित्तीय विवरणपत्र (CFS) महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ (कंपनी) आणि त्याच्या उपकंपन्यांशी संबंधित आहे (कंपनी आणि उपकंपन्यांना एकत्रितपणे ''गट'' असे संबोधले जाते). ही एकत्रित वित्तीय विवरणपत्रे 'लेखा मानक –२१' नुसार खालील तत्त्वांवर तयार करण्यात आली आहेत:

(अ) कंपनी आणि तिच्या उपकंपन्यांचे वित्तीय विवरणपत्र ओळखसाम्य असलेल्या मालमत्ता, दायित्व, उत्पन्न आणि खर्चाच्या पुस्तक मूल्यांची ओळीनुसार एकत्र करून तयार केले जाते, आणि गटातील अंतर्गत शिल्लक व व्यवहार (उदा. कालावधीअखेरच्या मालमत्ता – साठा, स्थावर मालमत्ता इत्यादींमधील अप्राप्त नफा/तोटा) पूर्णपणे वगळले जातात. उपकंपनीतील समभाग खरेदीच्या वेळी कंपनीच्या गुंतवणुकीच्या खर्च आणि तिच्या समभागातील हिस्सा यामधील फरक एकत्रित वित्तीय विवरणपत्रात ख्यातिमूल्य (गुडविल) किंवा भांडवली राखीव म्हणून ओळखला जातो.

कंपनीच्या समभागधारकांसाठी निव्वळ उत्पन्न निश्चित करण्यासाठी समूहाच्या उत्पन्नावर उपकंपन्यांच्या निव्वळ नफा/तोट्यातील अल्पसंख्याक हिस्सा समायोजित केला जातो. उपकंपन्यांच्या एकत्रित निव्वळ मालमत्तेतील अल्पसंख्याक हिस्सा एकत्रित ताळेबंदात कंपनीच्या समभागधारकांच्या भांडवल व दायित्वांपासून स्वतंत्रपणे दर्शवला जातो. खालील बाबींचा विचार करून एकत्रित वित्तीय विवरणपत्रात अल्पसंख्याक हिस्सा ओळखला व मान्य केला जातो:

(i) उपकंपनीत गुंतवणूक केल्याच्या तारखेस अल्पसंख्याकांना संबंधित भांडवलाचा हिस्सा

(ii) धारक–उपकंपनी संबंध अस्तित्वात आल्यापासून भांडवलातील हालचालींमध्ये अल्पसंख्याकांचा हिस्सा

(iii) अल्पसंख्याकांना संबंधित तोटा उपकंपनीच्या भांडवलातील अल्पसंख्याक हिस्स्याविरुद्ध समायोजित केला जातो

(iv) अल्पसंख्याक भांडवलाच्या हिस्स्यापेक्षा अधिक तोटा असल्यास, तो कंपनीच्या सामान्य राखीव निधीविरुद्ध समायोजित केला जातो.

(ब) एकत्रित वित्तीय विवरणपत्र समान व्यवहार आणि तत्सम परिस्थितींतील इतर घटनांसाठी एकसमान लेखा धोरणांचा वापर करून तयार करण्यात आले आहेत. कोणत्याही विचलनासाठी आवश्यक समायोजन, शक्य त्या प्रमाणात, या विवरण पत्रामध्ये करण्यात आले आहेत आणि जोवर या वेळापत्रकात अन्यथा नमूद केलेले नाही तोवर कंपनीच्या स्वतंत्र वित्तीय विवरणपत्रांप्रमाणेच सादर करण्यात आले आहेत.

२. महत्त्वाची लेखा धोरणे

(अ) लेखा परंपरा

हे वित्तीय विवरण भारतीय सामान्यतः स्वीकारलेले लेखा तत्त्व (GAAP) नुसार, उपार्जित आधारावरील ऐतिहासिक खर्च पद्धतीनुसार तयार करण्यात आले आहेत. या तत्त्वामध्ये कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३३ अंतर्गत अनिवार्य लेखा मानके उपयोजली गेली आहेत. यामध्ये कंपनी (खाते) नियम, २०१४ मधील नियम ७ सह वाचले जातात आणि कायद्यात अधिसूचित केलेल्या तरतुदींचा समावेश होतो. सर्व मालमत्ता आणि दायित्वे कंपनी कायदा, २०१३ च्या अनुसूची ३ मध्ये दिलेल्या निकषांनुसार चालू किंवा न चालू म्हणून वर्गीकृत केली जातात.

(आ) अंदाजांचा वापर

GAAP शी सुसंगत वित्तीय विवरण तयार करताना व्यवस्थापनाने काही अंदाज व गृहितके वापरणे आवश्यक असते. ही गृहितके वित्तीय विवरणाच्या दिनांकानुसार नोंदवलेल्या मालमत्ता व दायित्वांच्या शिलकींवर आणि संभाव्य दायित्वांशी संबंधित खुलाशांवर तसेच कालावधीत नोंदवलेल्या उत्पन्न व खर्चावर परिणाम करतात.

अशा अंदाजांची उदाहरणे म्हणजे पूर्णतेच्या टक्केवारीची गणना (समूहाने आतापर्यंत केलेल्या प्रयत्नांची एकूण आवश्यक प्रयत्नांशी तुलना), संशयास्पद देयकांसाठी तरतूद; कर्मचारी निवृत्ती लाभ योजनांखालील भविष्यातील दायित्वे; आयकर; तसेच स्थावर मालमत्ता व अमूर्त मालमत्तेचे उपयुक्त आयुष्य अशा प्रकारे सांगता येतील.

लेखा अंदाज कालावधी दरम्यान बदलू शकतात. प्रत्यक्ष परिणाम/निष्पत्ती हे अंदाजांपेक्षा वेगळे असू शकतात. व्यवस्थापनास संबंधित परिस्थितीत बदल झाल्याचे लक्षात आल्यावर योग्य बदल केले जातात. हे बदल त्या कालावधीत एकत्रित वित्तीय विवरणपत्रात दर्शवले जातात आणि जर ते महत्त्वाचे असतील, तर त्यांचा परिणाम नोंदीमध्ये प्रकट केला जातो.

(इ) स्थावर मालमत्ता, अमूर्त मालमत्ता आणि प्रगतीपथावरील भांडवली कामे

(अ) मूर्त मालमत्ता मूळ खर्च वजा संचित घसारा रक्कम आणि मूल्यऱ्हास (असल्यास) नंतर दर्शवली जाते. खर्चामध्ये खरेदी किंमत, मालमत्ता कार्यक्षम स्थितीत आणण्यासाठी थेट संबंधित खर्च आणि वापरासाठी आवश्यक असलेले विघटन खर्च यांचा समावेश होतो.

(ब) अमूर्त मालमत्ता मूळ खर्च वजा संचित अमॉर्टायझेशन रक्कम आणि मूल्यऱ्हास (असल्यास) नंतर दर्शवली जाते. खर्चामध्ये मालमत्ता इच्छित वापरासाठी तयार करण्यासाठी थेट संबंधित खर्चाचा समावेश होतो.

(क) बांधकाम कालावधीत थेट संबंधित पूर्व-ऑपरेटिंग खर्च प्रगतीपथावरील भांडवली कामांत समाविष्ट केले जातात. हे खर्च मालमत्ता इच्छित वापरासाठी तयार झाल्यावर स्थावर मालमत्तेच्या खर्चात समाविष्ट केले जातात.

(ड) लीजहोल्ड जमिनीच्या बाबतीत, मूल्यांकनकर्त्याद्वारे पुन्हा मूल्यांकन केलेली मूळ किंमत खात्यांमध्ये विचारात घेतली जाते.

(ई) घसारा

(अ) मूर्त स्थावर मालमत्तेवर घसारा देताना सरासरी पद्धतीने अंदाजित उपयुक्त आयुच्या आधारावर किंवा कंपनी कायदा, २०१३ च्या अनुसूची २ मध्ये नमूद केलेल्या दरांनुसार दिला जातो. अमूर्त मालमत्तेचा घसारा तिच्या अंदाजित उपयुक्त आयुच्या आधारावर सरासरी पद्धतीने दिला जातो. ५,०००/- किंवा त्यापेक्षा कमी किंमतीच्या वैयक्तिक मालमत्तेवर १००% घसारा दिला जातो.

(ब) वित्तीय भाडेपट्ट्यांतर्गत प्राप्त मालमत्तेवर घसारा भाडेपट्टा कालावधीमध्ये विभागून दिला जातो.

(क) पुनर्मूल्यांकित केलेल्या पट्टेधारी जमिनी उर्वरित भाडेपट्टा कालावधीमध्ये परिशोधित केल्या जातात.

(उ) मूल्यऱ्हास (Impairment)

एखाद्या मालमत्तेची वहन किंमत तिच्या पुनर्प्राप्त मूल्यापेक्षा जास्त असल्यास ती मालमत्ता मूल्यऱ्हासित (impaired) मानली जाते. पुनर्प्राप्त मूल्य म्हणजे वापरातील मूल्य आणि निव्वळ विक्री किंमत यांपैकी अधिक असलेली रक्कम. वापरातील मूल्य म्हणजे मालमत्तेच्या उर्वरित उपयुक्त आयुष्यात अपेक्षित रोख प्रवाहाचे निव्वळ वर्तमान मूल्य. मूल्यऱ्हास झाल्याचे ओळखले गेलेल्या वर्षात तो तोटा नफा-तोटा विवरणपत्रात खर्च म्हणून ओळखला जातो. मागील लेखा कालावधीत ओळखलेला मूल्यऱ्हास तोटा, जर पुनर्प्राप्त मूल्यामध्ये सुधारणा

झाली असेल तर, उलट केला जातो परंतु एकत्रीकरणातील ख्यातिमूल्याच्या बाबतीत, केवळ अपवादात्मक स्वरूपाच्या विशिष्ट बाह्यघटनेमुळे झालेला मूल्यऱ्हास तोटा उलट केला जातो; (त्या घटनेचा परिणाम प्रत्यक्षात उलट झालेला असेल तर).

(ऊ) भाडेपट्टे (Leases)

(अ) परिचालन पट्ट्यांतर्गत भाडेपट्टीचे प्रदान भाडे कराराच्या अटींनुसार नफा–तोटा खात्यात खर्च म्हणून ओळखले जाते.

(ब) १ एप्रिल २००१ पूर्वीचा वित्तीय भाडे करार: भाडेपट्टा हा पट्ट्याच्या कराराच्या अटींनुसार नफा–तोटा खात्यात खर्च म्हणून ओळखले जातो.

(क) १ एप्रिल २००१ नंतरचा वित्तीय भाडेपट्टा: मालमत्तेचे न्याय्य मूल्य किंवा किमान भाडेपट्ट्याचे वर्तमान मूल्य यांपैकी कमी रक्कम स्थावर मालमत्ता म्हणून नोंदवली जाते आणि त्यासमोरील रक्कम असुरक्षित कर्ज म्हणून दर्शवली जाते. भाडेपट्ट्याच्या मूळ घटकाचे समायोजन पट्टा दायित्वाविरुद्ध केली जाते आणि व्याजघटक नफा–तोटा खात्यात व्याज खर्च म्हणून ओळखला जातो.

(ड) भाडेपट्ट्यावर घेतलेल्या व दिलेल्या स्थावर मालमत्ता स्थावर मालमत्तेचा भाग म्हणून दर्शवल्या जातात.

(ए) शासकीय अनुदान

भाडेपट्ट्यावर देण्यात आलेल्या जमिनीशी संबंधित शासकीय अनुदानांना विलंबित उत्पन्न म्हणून गणले जाते. हे उत्पन्न मालमत्तेच्या उपयुक्त कालावधीत प्रणालीबद्ध आणि तर्कसंगत पद्धतीने नफा–तोटा विवरणपत्रात ओळखले जाते. म्हणजेच, अशा अनुदानांचा समावेश उत्पन्नात त्या कालावधी आणि प्रमाणानुसार केला जातो व त्यामध्ये त्या मालमत्तेवर घसारा आकारला जातो.

इतर स्थावर मालमत्तेशी संबंधित शासकीय अनुदानांचा ताळेबंदात दाखवताना संबंधित मालमत्तेच्या एकूण मूल्यातून वजा करून त्यांचे पुस्तक मूल्य निश्चित केले जाते.

याशिवाय, मागील लेखा कालावधीत आलेल्या खर्च किंवा नुकसानीसाठी भरपाई म्हणून मिळणारे शासकीय अनुदान किंवा कोणत्याही अतिरिक्त खर्चाशिवाय संस्थेला तात्काळ आर्थिक सहाय्य देण्यासाठी मिळणारे अनुदान नफा–तोटा विवरणपत्रात ओळखले आणि प्रकटीत केले जाते.

(ऐ) गुंतवणूक

(अ) दीर्घकालीन गुंतवणूक मूळ खर्चावर आधारित दाखवली जाते, परंतु मूल्यऱ्हास तात्पुरता नसल्याचे मानले गेले असल्यास त्यासाठी तरतूद वजा केली जाते.

(ब) चालू गुंतवणूक मूळ खर्च किंवा न्याय्य मूल्य यांपैकी कमी रकमेवर दर्शवली जाते.

(ओ) वस्तुसूची (Inventories)

कच्चा माल आणि वाहतुकीतील वस्तुसूचीचे मूळ खर्चावर आधारित मूल्यांकन केले जाते. प्रक्रियेत असलेली सूची आणि तयार माल मूळ खर्चावर आधारित असतात. व्यापारासाठी असलेल्या सूचीचे मूळ खर्च किंवा बाजारमूल्य यांपैकी कमी रकमेवर मूल्यांकन केले जाते.

(औ) महसूल ओळख (Revenue Recognition)

सर्व उत्पन्न आणि खर्च हिशोबी पद्धतीने भारतीय सामान्यतः स्वीकारलेल्या लेखा तत्त्वांनुसार आणि कंपनी कायदा २०१३ च्या संबंधित तरतुदीनुसार नोंदवले जातात. त्यास खालील अपवाद आहेतः

(अ) विपणन व्यवहारांमध्ये, शासकीय विभागाकडून खरेदी आणि त्यास संबंधित सवलत ही चलन प्राप्त झाल्यावर खरेदी म्हणून नोंदवली जाते आणि संबंधित विक्री ही बिल तयार करून नोंदवली जाते.

(ब) विविध योजनांखाली मिळणारे अनुदान, गुंतवणुकीवरील लाभांश आणि आयकर परताव्यावर मिळणारे व्याज हे प्राप्तीच्या आधारे नोंदवले जातात.

(क) खरेदी ही सवलत, परतावा, VAT, उत्पादन शुल्क आणि दरातील फरक वजा करून दर्शवली जाते.

(ड) विक्री ही सवलत, परतावा, तअढ, उत्पादन शुल्क, सवलती आणि दर वजा करून दर्शवली जाते.

(क) कर्मचारी लाभ

(अ) भविष्यनिर्वाह निधी

महामंडळाकडून मान्यताप्राप्त भविष्यनिर्वाह निधी व निवृत्तीवेतन निधीसाठी वर्षभरात दिलेली/देय रक्कम नफा–तोटा खात्यात खर्च म्हणून नोंदवली जाते.

(आ) उपदान

महामंडळाने कर्मचारी गट उपदान व जीवन विमा योजनेअंतर्गत LIC कडे उपदानाची देयता सुरक्षित केली आहे. सदर देयता विमागणितीय मूल्यांकनाच्या आधारे ओळखली व नोंदवली जाते.

(इ) रजा व भत्ता

सेवानिवृत्ती, निवृत्ती, राजीनामा किंवा मृत्यूमुळे रजा व भत्त्याची देयता निर्माण होते. ही देयता विमागणितीय मूल्यांकनाच्या आधारे ओळखली व नोंदवली जाते.

(ख) मागील वर्षांशी संबंधित व्यवहार

हिशोबी पद्धतीने नोंद न झालेली, वर्षभरात दिलेली मागील कालावधीतील खर्च व प्राप्त झालेले उत्पन्न हे मागील वर्षांशी संबंधित व्यवहार म्हणून दर्शवले जातात.

(ग) उत्पन्न कर

चालू कर

चालू उत्पन्न कर खर्च भारतीय उत्पन्न कर अधिनियम, १९६१ च्या तरतुदीनुसार ओळखला जातो. कर कायद्यानुसार भरलेला किमान पर्यायी कर (MAT) भविष्यातील उत्पन्न कर दायित्वाच्या समायोजनाच्या स्वरूपात आर्थिक लाभ निर्माण करतो. कंपनीने सामान्य उत्पन्न कर भरावा लागेल याचे ठोस पुरावे असल्यास, ही रक्कम मालमत्ता म्हणून विचारात घेतली जाते. त्यामुळे, जेव्हा संबंधित भविष्यातील आर्थिक लाभ कंपनीकडे येण्याची शक्यता असते आणि मालमत्ता विश्वसनीयपणे मोजता येते MAT क्रेडिट ही मालमत्ता म्हणून ताळेबंदात ओळखली जाते.

स्थगित कर (Deferred Tax)

स्थगित कर हा मालमत्ता आणि दायित्वे यांच्यामधील त्या वेळेच्या फरकांमुळे निर्माण होणाऱ्या भविष्यातील कर परिणामांसाठी ओळखला जातो. हा कर उत्पन्न करासाठी सादर केलेल्या नफ्यात आणि वित्तीय विवरणपत्रानुसार नोंदवलेल्या नफ्यात फरक निर्माण करतो. स्थगित कर मालमत्ता आणि दायित्वे ताळेबंद दिनांकावर अधिनियमित किंवा वस्तुनिष्ठपणे अधिनियमित केलेल्या कर दर आणि कर कायद्यांचा वापर करून मोजला जातो. कर दरांमध्ये बदल झाल्यास त्याचा परिणाम अधिनियमित तारीख समाविष्ट असलेल्या कालावधीत ओळखला जातो.

स्थगित कर मालमत्ता केवळ त्या मर्यादेपर्यंत ओळखल्या जातात जेथे भविष्यात या मालमत्ता वसूल होऊ

शकतील याची वाजवी खात्री असते, तथापि, जेथे कराधान कायद्यांअंतर्गत अशोषित घसारा किंवा प्रलंबित नुकसान असते, तेव्हा स्थगित कर मालमत्ता केवळ तेव्हाच ओळखल्या जातात जेव्हा अशा मालमत्तांच्या ओळखीसाठी खात्रीशीर पुराव्यांनी समर्थित आभासी निश्चितता असते. प्रत्येक ताळेबंद तारखेला त्यांच्या संबंधित वहन मूल्यांच्या योग्यतेसाठी स्थगित कर मालमत्तांचे पुनर्मूल्यांकन केले जाते.

(घ) तरतुदी आणि संभाव्य दायित्वे

कंपनीकडे पूर्वीच्या घटनेमुळे सध्याची कायदेशीर किंवा बांधिलकीची जबाबदारी असल्यास, आणि ती जबाबदारी पूर्ण करण्यासाठी संसाधनांचा खर्च होण्याची शक्यता जास्त असल्यास, कंपनी तरतूद निर्माण करते. ही तरतूद ताळेबंद दिनांकावर व्यवस्थापनाच्या सर्वोत्तम अंदाजानुसार आवश्यक खर्चाच्या प्रमाणात मोजली जाते.

संभाव्य दायित्वासाठी प्रकटीकरण तेव्हाच केले जाते जेव्हा संभाव्य किंवा सध्याची जबाबदारी असते, जी संसाधनांचा खर्च मागणी करेल असे शक्य असते, आणि त्या खर्चाचा विश्वसनीय अंदाज करता येतो.

जर संभाव्य जबाबदारीसाठी संसाधनांचा खर्च होण्याची शक्यता अत्यल्प असेल, तर कोणतीही तरतूद किंवा प्रकटीकरण केले जात नाही.

(च) प्रारंभिक खर्च

प्रारंभिक खर्च त्या वर्षाच्या नफा–तोटा विवरणपत्रात खर्च म्हणून ओळखले जातात, ज्यामध्ये ते खर्च झालेले असतात.

(छ) समभाग जारी खर्च

नवीन समभाग भांडवल जारी करण्याशी संबंधित खर्च त्या वर्षाच्या नफा–तोटा विवरणपत्रात खर्च म्हणून ओळखले जातात, ज्यामध्ये ते खर्च झालेले असतात.

३. समूहाच्या संयुक्त वित्तीय विवरणपत्रात समाविष्ट उपकंपन्यांची यादी आणि गटाचा प्रभावी मालकी हिस्सा –

कृपानिधी लिमिटेड – भारतात समाविष्ट उपकंपनी– यामध्ये समूहाचा मालकी हिस्सा ६२% आहे

नोंद २: अल्पसंख्याक व्याज (मायनॉरिटी इंटरेस्ट): मेसर्स कृपानिधी मर्यादितची भागधारकता रचना (शेअरहोल्डिंग पॅटर्न)

(रक्कम रुपयांमध्ये)

तपशील	प्रमाण (गुणोत्तर)	वित्तीय वर्ष २०२१ – २२	वित्तीय वर्ष २०२० – २१
एअर इंडिया लि.	०.०९	९,०००	९,०००
फ्युजन कन्सल्टन्सी प्रा. लि.	०.०२	२,०००	२,०००
महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादित	०.६२	६२,०००	६२,०००
मुंबई पोर्ट ट्रस्ट	०.१२	१२,०००	१२,०००
नियती कन्सल्टंट्स	०.०२	२,०००	२,०००
रोहन मर्चंट	०.०१	१,०००	१,०००
सीमेन्स प्रॉव्हिडंट फंड ऑर्गनायझेशन	०.१२	१२,०००	१२,०००
एकूण	**१.००**	**१,००,०००**	**१,००,०००**

तपशील	३१.०३.२०२२	३१.०३.२०२१
अधिकृत भांडवल (ऑथराईज्ड कॅपिटल)		
प्रत्येकी १००/– चे ५०,००० समभाग (इक्विटी शेअर्स)	५०,००,०००	५०,००,०००
विक्रीस काढलेले, नोंदणीकृत आणि पूर्णदत्त भांडवल (पेड अप कॅपिटल)		
प्रत्येकी १००/– चे १,००० समभाग (इक्विटी शेअर्स)	१,००,०००	१,००,०००
एकूण	**१,००,०००**	**१,००,०००**

हक्क, प्राधान्ये आणि समभागांशी संबंधित निर्बंध

महामंडळाकडे १००/– दर्शनी मूल्य असलेल्या एकाच वर्गातील इक्विटी समभाग आहेत. प्रत्येक समभागधारकास धारित प्रत्येक समभागासाठी एक मत देण्याचा अधिकार आहे. संचालक मंडळाने प्रस्तावित केलेला लाभांश हा पुढील वार्षिक सर्वसाधारण सभेत समभागधारकांच्या मंजुरीस अधीन असतो, अंतरिम लाभांशाच्या बाबतीत अपवाद वगळता. महामंडळाच्या परिसमापनाच्या वेळी, सर्व प्राधान्य रक्कमांचे वितरण झाल्यानंतर उर्वरित मालमत्ता समभागधारकांना त्यांच्या समभागधारणाच्या प्रमाणात प्राप्त होण्यास पात्रता असते.

सूत्रधारी/अंतिम सूत्रधारी कंपनी आणि/किंवा त्यांच्या उपकंपन्या/संबंधित संस्थांकडून धारित समभाग.

सूत्रधारी कंपनी	समभाग संख्या	धारण गुणोत्तर
एमएसएसआय लिमिटेड	६२०	६२%

अहवाल दिनांकाच्या आधीच्या पाच वर्षांच्या कालावधीत बोनस समभाग जारी, रोख रकमेव्यतिरिक्त प्रतिफळासाठी समभाग जारी, आणि परत खरेदी केलेले समभाग यांची एकूण संख्या: **निरंक**

पर्यायांअंतर्गत जारी करण्यासाठी राखून ठेवलेले समभाग: **निरंक**

नोंद ३: समभाग भांडवल

तपशील	३१ मार्च २०२१	३१ मार्च २०२०
अधिकृत		
२०,००,००० (मागील वर्षी २०,००,०००) समभाग प्रत्येकी रु. १०० प्रमाणे	२००,०००,०००	२००,०००,०००
	२००,०००,०००	२००,०००,०००
विक्रीस काढलेले :		
१४,५०,०९९ समभाग प्रत्येकी १०० रु. चे. (मागील वर्षाचे १४,५०,०९९ भाग प्रत्येकी १०० रु. प्रमाणे)	१४५,००९,९००	१४५,००९,९००
सदस्यत्व घेतलेले व पूर्ण भरणा केलेले :		
१४,५०,०९९ समभाग प्रत्येकी १०० रु. चे (मागील वर्षाचे १४,५०,०९९ भाग प्रत्येकी १०० रु. प्रमाणे)	१४५,००९,९००	१४५,००९,९००
एकूण	**१४५,००९,९००**	**१४५,००९,९००**

समभागांचा ताळमेळ :

तपशील	दि. ३१ मार्च, २०२०		दि. ३१ मार्च, २०१९	
	संख्या	रक्कम (रु.)	संख्या	रक्कम (रु.)
वर्षाप्रारंभीचे शिलकी समभाग	१४,५०,०९९	१४,५०,०९,९००	१४,५०,०९९	१४,५०,०९,९००
वर्षभरात विक्रीस काढलेले समभाग	–	–	–	–
वर्षाअखेरचे शिलकी समभाग	१४,५०,०९९	१४,५०,०९,९००	१४,५०,०९९	१४,५०,०९,९००

शेअरसंबंधी हक्क, प्राधान्य, आणि प्रतिबंध

कंपनीचे एका श्रेणीचे समभाग १०० रुपये मूल्याचे आहेत. प्रत्येक भागधारक हा एका समभागासाठी एक असे मतदान करू शकतो. अंतरीम लाभांशाच्या बाबतीत वार्षिक सर्वसाधारण सभेत समभागधारकांनी संमत केल्यानुसार संचालक मंडळाच्या वतीने प्रस्तावित केलेला लाभांश समभागधारकांना वितरित करण्यात येतो. दिवाळखोरीसारख्या घटनांच्या वेळी कंपनीच्या अधिमान्य रकमांच्या वितरणानंतर उर्वरित मत्तेचा त्या–त्या प्रमाणानुसार हिस्सा मिळण्यास समभागधारक पात्र आहेत.

कंपनीच्या ५ टक्क्यांहून अधिक समभाग असलेल्या भागधारकांची यादी :

क्र.	समभागधारकाचे नाव	३१ मार्च २०२०		३१ मार्च २०२१	
		धारण केलेल्या समभागांची संख्या	धारण केलेल्या समभागांची टक्केवारी	धारण केलेल्या समभागांची संख्या	धारण केलेल्या समभागांची टक्केवारी
१.	श्री.रविंद्र गुरव, उपसचिव, उद्योग आणि महाराष्ट्र राज्यपालांचे प्रतिनिधी	१४,४०,०९३	९९.३१	**१४,४०,०९३**	**९९.३१**
	एकूण	**१४,४०,०९३**	**९९.३१**	**१४,४०,०९३**	**९९.३१**

महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित

दिनांक ३१ मार्च २०२२ रोजी संपणाऱ्या वर्षाच्या संकलित आर्थिक विवरणपत्रांबाबत टीपा

कंपनीचे संचालक मंडळ हे कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३४(५) मध्ये नमूद केलेल्या बाबींसाठी जबाबदार आहे आणि या अंतर्गत, कंपनीची आर्थिक स्थिती, आर्थिक कामगिरी आणि रोख प्रवाह यांचे खरे आणि वाजवी चित्र दर्शवणारे सुधारित वित्तीय पत्रक तयार करणे ही संचालक मंडळाची जबाबदारी आहे. हे वित्तीय पत्रक भारतात सामान्यतः स्वीकारल्या गेलेल्या लेखांकन तत्त्वांना आणि कायद्याच्या कलम १३३ अंतर्गत निर्दिष्ट केलेल्या लेखांकन मानकांना अनुसरून असणे आवश्यक आहे. या जबाबदारीमध्ये कंपनीच्या मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी तसेच फसवणूक आणि इतर अनियमितता रोखण्यासाठी व शोधण्यासाठी कायद्याच्या तरतुदींनुसार पुरेशा लेखा नोंदी ठेवणे, योग्य लेखा धोरणांची निवड करणे, त्यांची अंमलबजावणी करणे आणि ती कायम ठेवणे, वाजवी आणि विचारी असतील असे निर्णय व अंदाज वर्तवणे आणि वित्तीय पत्रक तयार करताना व ते सादर करताना, त्यामध्ये फसवणूक किंवा चुकीमुळे कोणतीही गंभीर त्रुटी राहणार नाही याची दक्षता घेणे, तसेच लेखा नोंदींची अचूकता आणि पूर्णता सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक असणारी आणि प्रभावीपणे कार्यरत असणारी पुरेशी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे तयार करणे, त्यांची अंमलबजावणी करणे आणि ती टिकवून ठेवणे या बाबींचाही समावेश होतो.

सुधारित वित्तीय पत्रक तयार करताना, कंपनीची व्यावसायिक निरंतरता (गोइंग कन्सर्न) राखण्याच्या क्षमतेचे मूल्यांकन करणे, व्यावसायिक निरंतरतेशी संबंधित आवश्यक बाबी स्पष्ट करणे आणि जोपर्यंत व्यवस्थापन कंपनीचे परिसमापन (लिक्विडेट) किंवा तिचा व्यवसाय बंद करण्याचा हेतू नसेल किंवा तसे करण्याशिवाय व्यवस्थापनाकडे कोणताही वास्तववादी पर्याय उपलब्ध नसेल, तोपर्यंत लेखांकनासाठी व्यावसायिक निरंतरतेच्या तत्त्वाचा वापर करणे, ही व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. तसेच, कंपनीच्या वित्तीय अहवाल प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी देखील संचालक मंडळ जबाबदार आहे.

सुधारित वित्तीय विवरणपत्रांसदर्भात लेखापरीक्षकांची जबाबदारी

एकत्रित वित्तीय विवरणपत्रे ही लबाडी किंवा चुकांमुळे दाखविण्यात येणाऱ्या सदोष अहवालांपासून मुक्त असावीत याची वाजवी हमी मिळवण्यासाठी त्यांची तपासणी करणे तसेच त्यानंतर आमचा अभिप्राय असलेला सुधारित लेखापरीक्षकांचा अहवाल तयार करणे हे आमचे उद्दिष्ट आहे. सयुक्तिक हस्तांतरण उच्च पातळीच्या हस्तांतरणाची हमी देत असले तरी सांविधानिक लेखापरीक्षकांनी केलेले लेखापरीक्षण हे चुकीची विवरणे शोधून काढण्यात नेहमीच यशस्वी ठरेल याची खात्री देता येत नाही. चुकीची विवरणे ही फसवणुकीच्या उद्देशाने अथवा त्रुटींमुळे नमूद केलेली असू शकतात व अशी विवरणे व्यक्तिगत किंवा सामूहिक रित्या घेण्यात आलेल्या आर्थिक निर्णयांवर जेव्हा गंभीर परिणाम करतात तेव्हाच महत्त्वाची

मानली जातात.

सांविधानिक लेखापरीक्षकांच्या लेखा परीक्षणाचा एक भाग म्हणून संपूर्ण लेखा परीक्षणादरम्यान आम्ही व्यावसायिक अभिप्राय तसेच व्यावसायिक संशयवादाचा अवलंब करतो. याशिवाय आमची जबाबदारी पुढीलप्रमाणे आहेः

- फसवणुकीमुळे अथवा त्रुटींमुळे नोंदविण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण चुकीच्या विवरणांमुळे एकत्रित आर्थिक विवरणांमध्ये हानी होऊ शकेल अशी विवरणे ओळखणे आणि त्यांच्यामुळे होणाऱ्या हानीचा अंदाज घेणे, अशी हानी होण्यापासून रोखण्यासाठी उपयुक्त लेखापरीक्षण प्रक्रियांचे संकल्पन आणि त्या पार पाडणे, तसेच आमच्या अभिप्रायाच्या समर्थनार्थ पुरेसे आणि योग्य लेखापरीक्षणात्मक पुरावे प्राप्त करणे. फसवणुकीच्या उद्देशाने असलेले चुकीचे विवरण हे त्रुटीमुळे नोंदवलेल्या चुकीच्या विवरणापेक्षा अधिक धोकादायक असते, कारण फसवणुकीच्या उद्देशाने नोंदवण्यात आलेल्या चुकीच्या विवरणामध्ये संगनमत, बनावट दस्तावेज, अंतर्गत वगळणूक, विपर्यास, किंवा अंतर्गत नियंत्रणावरील अधिभाव इत्यादी गोष्टींचा समावेश असतो.
- अंतर्गत नियंत्रणाचे आकलन करणे व लेखापरीक्षणाशी संबंधित परिस्थितीनुरूप लेखापरीक्षण प्रक्रियांचे संकल्पन करणे. कंपनी कायद्यामधील कलम १४३(३)(१) नुसार, मंडळाकडे सक्षम अंतर्गत आर्थिक नियंत्रण यंत्रणा आहे किंवा कसे तसेच या अंतर्गत नियंत्रण यंत्रणेच्या परिणामकारकेसंबंधी आमचा अभिप्राय व्यक्त करण्यासंबंधी आम्ही जबाबदार आहोत.
- व्यवस्थापनाकडून वापरात असलेल्या लेखांकन अंदाज व संबंधित माहितीचे प्रकटन पद्धतींचे तसेच लेखांकन धोरणांच्या योग्यतेचे मूल्यमापन करणे.
- व्यवस्थापनाने व्यावसायिक निरंतरतेच्या (गोइंग कन्सर्न) तत्त्वावर आधारित केलेली लेखांकनाची अंमलबजावणी कितपत योग्य आहे, याचा निष्कर्ष काढणे; आणि प्राप्त झालेल्या लेखापरीक्षण पुराव्यांच्या आधारे, अशा काही घटना किंवा परिस्थितीशी संबंधित गंभीर अनिश्चितता अस्तित्वात आहे का, ज्या कंपनीच्या व्यवसाय निरंतर सुरू ठेवण्याच्या क्षमतेवर मोठी शंका निर्माण करू शकतात, हे निश्चित करणे आमची जबाबदारी आहे. जर अशी गंभीर अनिश्चितता अस्तित्वात आहे असा निष्कर्ष आम्ही काढला, तर आमच्या लेखापरीक्षण अहवालात वित्तीय पत्रकातील संबंधित प्रकटीकरणाकडे लक्ष वेधणे आम्हाला आवश्यक आहे, किंवा जर अशी प्रकटीकरणे अपुरी असतील, तर आमचे मत सुधारित (मॉडिफाय) करणे आवश्यक आहे. आमचे निष्कर्ष हे आमच्या लेखापरीक्षण अहवालाच्या तारखेपर्यंत प्राप्त झालेल्या लेखापरीक्षण पुराव्यांवर आधारित आहेत. तथापि, भविष्यातील घटना किंवा परिस्थितीमुळे कंपनीची व्यावसायिक निरंतरता संपुष्टात येऊ शकते.
- एकत्रित सुधारित आर्थिक विवरणपत्रांचे एकूण सादरीकरण, संरचना, आणि आशय यांचे मूल्यमापन करणे, यामध्ये माहितीचे प्रकटन, एकत्रित आर्थिक विवरणपत्रांमध्ये रास्त सादरीकरण करणारे तलस्थित व्यवहार आणि परिस्थिती दर्शविण्यात आले आहेत किंवा कसे याचाही समावेश आहे.

वित्तीय विवरणांमध्ये वैयक्तिक अथवा एकत्रितपणे चुकीची विवरणे असतील तर त्यांचा विपरित प्रभाव या वित्तीय विवरणांचा वापर करणाऱ्या जाणकार उपयोगकर्त्यांच्या आर्थिक निर्णयांवर पडू शकतो. यास्तव आम्ही मात्रात्मक भौतिकता आणि गुणात्मक कारकांचा पुढील प्रमाणे विचार करतोः (१) आमच्या लेखापरीक्षणाच्या कार्यावर आधारित योजना आखणे आणि आमच्या कामाच्या परिणामांचे मूल्यांकन करणे; तसेच (२) वित्तीय विवरणांमध्ये लक्षात आलेल्या चुकीच्या विवरणांच्या प्रभावाचे मूल्यांकन करणे

इतर गोष्टींसह लेखापरीक्षणाची सुनियोजित व्याप्ती आणि कालनियोजन, आणि महत्त्वपूर्ण लेखांकन निष्कर्ष, अंतर्गत नियंत्रणामध्ये लेखापरीक्षणादरम्यान आमच्या निदर्शनास आलेली कुठलीही महत्त्वपूर्ण न्यूनता आदी बाबींसंबंधी ज्यांना शासन व्यवहारांचे अधिकार आहेत अशांशी आमच्याकडून संपर्क ठेवला जाईल.

लेखापरीक्षकांचा अहवाल आणि वित्तीय विवरणपत्रे यांच्याखेरीज इतर माहिती

कंपनीचे संचालक मंडळ हे इतर माहिती तयार करण्यासाठी जबाबदार आहे. या इतर माहितीमध्ये व्यवस्थापकीय चर्चा आणि विश्लेषण, संचालक मंडळाचा अहवाल आणि त्या अहवालासोबत जोडलेल्या परिशिष्टांमधील माहितीचा समावेश

होतो; परंतु यामध्ये सुधारित वित्तीय पत्रक आणि त्यावर आम्ही दिलेला सुधारित लेखापरीक्षण अहवाल यांचा समावेश होत नाही.

सुधारित वित्तीय पत्रकावरील आमचे मत या इतर माहितीला लागू होत नाही आणि आम्ही त्यावर कोणत्याही स्वरूपाचा खात्रीशीर निष्कर्ष व्यक्त करत नाही.

सुधारित वित्तीय पत्रकांच्या आमच्या लेखापरीक्षणाशी संबंधित, आमची जबाबदारी ही इतर माहिती वाचणे आणि ती वाचताना, ही इतर माहिती सुधारित वित्तीय पत्रकांशी किंवा लेखापरीक्षणादरम्यान आम्हाला मिळालेल्या ज्ञानाशी मोठ्या प्रमाणावर विसंगत आहे का, अथवा ती इतर कोणत्याही प्रकारे चुकीची वाटत आहे का, याचा विचार करणे ही आहे.

आम्ही केलेल्या कामाच्या आधारे जर आम्ही असा निष्कर्ष काढला की या इतर माहितीमध्ये गंभीर त्रुटी किंवा चुकीची विधाने आहेत, तर आम्हाला ती वस्तुस्थिती अहवालात नमूद करणे आवश्यक आहे. या संदर्भात आमच्याकडे अहवालात नमूद करण्यासारखे काहीही नाही.

इतर कायदेशीर आणि नियामक आवश्यकतांबाबतचा अहवाल

१. कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १४३ च्या उप-कलम (११) च्या अटींनुसार भारताच्या केंद्र सरकारने जारी केलेल्या कंपनी (लेखापरीक्षक अहवाल) आदेश, २०२० च्या आवश्यकतांनुसार, आम्ही या आदेशातील परिच्छेद ३ आणि ४ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बाबींवर, लागू होईल त्या मर्यादेपर्यंतचे विवरण ''परिशिष्ट अ'' मध्ये देत आहोत.

२. कायद्याच्या कलम १४३ (३) नुसार आम्ही नमूद करतो की

अ. आमच्या माहिती आणि विश्वासाच्या आधारे, आमच्या लेखापरीक्षणाच्या उद्दिष्टांसाठी आवश्यक असलेली सर्व माहिती आणि स्पष्टीकरणे आम्ही मागवून घेतली आहेत व ती आम्हाला प्राप्त झाली आहेत.

ब. आमच्या तपासणीवरून असे दिसून येते की, कायद्यानुसार आवश्यक असणारी योग्य हिशोब पुस्तके कंपनीने पद्धतशीरपणे ठेवली आहेत.

क. कंपनीची कोणतीही शाखा अस्तित्वात नाही, त्यामुळे कंपनीला कायद्याच्या कलम १४३(८) अंतर्गत शाखा लेखापरीक्षण करण्याची आवश्यकता नाही.

ड. या अहवालाशी संबंधित सुधारित ताळेबंद, सुधारित नफा-तोटा पत्रकआणि सुधारित रोख प्रवाह पत्रक हे कंपनीच्या हिशोब पुस्तकांशी तंतोतंत जुळत आहेत.

इ. आमच्या मते, उपरोक्त सुधारित वित्तीय पत्रके ही कंपनी (लेखा) नियम, २०१४ च्या नियम ७ सह वाचल्या जाणाऱ्या कायद्याच्या कलम १३३ अंतर्गत निर्दिष्ट केलेल्या लेखांकन मानकांचे पालन करतात.

फ. संचालक मंडळाच्या अपात्रतेबाबत कंपनी कायदा, २०१३ चे कलम १६४(२) हे कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाच्या ५ जून २०१५ रोजीच्या अधिसूचना क्रमांक एफ नं. १/२/२०१४-सीएल.व्ही, जीएसआर ४६३(ई) नुसार सरकारी कंपन्यांना लागू होत नाही.

ग. कंपनीच्या वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणांची पुरेशी उपलब्धता आणि त्यांच्या कार्यक्षमतेबाबतचा आमचा स्वतंत्र अहवाल ''परिशिष्ट ब'' मध्ये पहावा.

ह. कंपनी (लेखापरीक्षक आणि लेखापरीक्षण) नियम, २०१४ च्या नियम ११ नुसार लेखापरीक्षकांच्या अहवालात समाविष्ट करावयाच्या इतर बाबींच्या संदर्भात, आमच्या मते, आमच्या माहितीनुसार आणि आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणांनुसार:

i. कंपनीने आपल्या प्रलंबित न्यायालयीन दाव्यांचा आर्थिक स्थितीवर होणारा परिणाम आपल्या सुधारित वित्तीय पत्रकांमध्ये स्पष्ट केला आहे आणि आम्हाला दिलेल्या माहितीनुसार, या न्यायालयीन दाव्यांमधून उद्भवणारे कोणतेही आर्थिक दायित्व सभासदांकडून 'जसे आहे जिथे आहे' (ॲज इज व्हेअर इज) या तत्त्वावर वसूल केले जाईल – सुधारित वित्तीय पत्रकांमधील नोंद १९ चा मुद्दा 'फ' पाहावा.

ii. भविष्यात मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता वर्तवली जाऊ शकते असा कोणताही दीर्घकालीन करार कंपनीकडे अस्तित्वात नव्हता,

iii. गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधीकडे (इन्व्हेस्टर एज्युकेशन अँड प्रोटेक्शन फंड) हस्तांतरित करणे

कायदेशीररित्या आवश्यक ठरेल अशी कोणतीही रक्कम कंपनीकडे नव्हती.

iv. (अ) व्यवस्थापनाने असे प्रतिपादन केले आहे की, त्यांच्या संपूर्ण माहिती आणि विश्वासाच्या आधारे, कंपनीद्वारे इतर कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला, ज्यामध्ये परदेशी संस्थांचा ('मध्यस्थ') समावेश आहे, कोणताही निधी (जो वैयक्तिकरित्या किंवा एकत्रितपणे लक्षणीय आहे) आगाऊ रक्कम (ॲडव्हान्स), कर्ज किंवा गुंतवणूक म्हणून (कर्जाऊ निधीतून किंवा समभाग अधिमूल्यातून (शेअर प्रीमियम) किंवा इतर कोणत्याही स्रोतातून किंवा प्रकारच्या निधीतून) देण्यात आलेला नाही अथवा गुंतवला गेलेला नाही; ज्यामध्ये अशी लेखी किंवा अन्य स्वरूपातील समजूत असेल की, तो मध्यस्थ प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कंपनीद्वारे किंवा कंपनीच्या वतीने कोणत्याही प्रकारे निश्चित केलेल्या इतर व्यक्तींमध्ये किंवा संस्थांमध्ये ('अंतिम लाभार्थी') कर्ज किंवा गुंतवणूक करेल अथवा अंतिम लाभार्थ्यांच्या वतीने कोणतीही हमी, सुरक्षा (सिक्युरिटी) किंवा यासारखे इतर काही प्रदान करेल;

(ब) व्यवस्थापनाने असे प्रतिपादन केले आहे की, त्यांच्या संपूर्ण माहिती आणि विश्वासाच्या आधारे, कंपनीला इतर कोणत्याही व्यक्तीकडून किंवा संस्थेकडून, ज्यामध्ये परदेशी संस्थांचा ('निधी पुरवणारे पक्ष') समावेश आहे, कोणताही निधी (जो वैयक्तिकरित्या किंवा एकत्रितपणे लक्षणीय आहे) प्राप्त झालेला नाही; ज्यामध्ये अशी लेखी किंवा अन्य स्वरूपातील समजूत असेल की, कंपनी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे निधी पुरवणाऱ्या पक्षाद्वारे किंवा त्यांच्या वतीने कोणत्याही प्रकारे निश्चित केलेल्या इतर व्यक्तींमध्ये किंवा संस्थांमध्ये ('अंतिम लाभार्थी') कर्ज किंवा गुंतवणूक करेल अथवा अंतिम लाभार्थ्यांच्या वतीने कोणतीही हमी, सुरक्षा किंवा यासारखे इतर काही प्रदान करेल;

(क) परिस्थितीनुसार जे लेखापरीक्षण उपाय वाजवी आणि योग्य मानले गेले आहेत, त्या आधारे आमच्या निदर्शनास अशी कोणतीही बाब आलेली नाही ज्यामुळे आम्हाला असे मानण्याचे कारण मिळेल की, वरील (अ) आणि (ब) अंतर्गत प्रदान केलेल्या नियम ११(ई) च्या उप-कलम (१) आणि (२) मधील प्रतिपादनांमध्ये कोणतेही लक्षणीय चुकीचे विधान समाविष्ट आहे.

इ. कंपनीने वर्षभरात कोणताही लाभांश (डिव्हिडंड) प्रस्तावित केलेला नाही किंवा अदा केलेला नाही.

ज. आम्ही आमच्या मते योग्य वाटलेल्या कंपनीच्या पुस्तकांच्या व दस्तऐवजांच्या तपासणीच्या आधारे आणि आम्हाला मिळालेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी जारी केलेल्या निर्देशांवर/ उप-निर्देशांवर आधारित कायदा कलम १४३(५) अन्वये आमचा अहवाल 'परिशिष्ट क' मध्ये जोडत आहोत.

एस आय जी एम ए सी अँड कंपनी करिता
सनदी लेखापाल
(फर्म नोंदणी क्रमांक 116351W)

राहुल सारडा
भागीदार
आयसीएआय सदस्यत्व क्रमांक: १३५५०१
ठिकाण: मुंबई
दिनांक: २१/०८/२०२५
UDIN: 25135501BMKOMU3754

मे. एसआयजीएमएसी अँड कंपनी

सनदी लेखापाल

२०४, कल्पतरू प्लाझा, चिंचोली बंदर, एस व्ही रोड जवळ, मालाड (प), मुंबई ४०००६४

कृपानिधी मर्यादितसाठी स्वतंत्र लेखापरीक्षकांच्या अहवालाचे जोडपत्र अ

(कृपानिधी लिमिटेडच्या सदस्यांसाठी आमच्या अहवालाच्या 'अन्य कायदेशीर आणि नियामक आवश्यकतांवरील अहवाल' विभागांतर्गत परिच्छेद १ मध्ये सम तारखांच्या संदर्भात)

१)

अ) (एक) कंपनीने मालमत्ता, संयंत्र आणि साधनसामग्रीचे (प्रॉपर्टी, प्लांट अँड इक्विपमेंट) परिमाणात्मक तपशील आणि सद्यस्थितीसह संपूर्ण तपशील दर्शवणारे योग्य दस्तऐवज राखले आहेत;

(दोन) कंपनीकडे कोणतीही अमूर्त मालमत्ता (इंटँजिबल ॲसेट्स) नाही.

ब) मालमत्ता, संयंत्र आणि साधनसामग्रीचे व्यवस्थापनाद्वारे ठरावीक कालावधीत टप्प्याटप्प्याने भौतिकरीत्या प्रमाणीकरण (फिजिकल व्हेरिफिकेशन) करण्यात आले आहे, जे आमच्या मते, कंपनीचा आकार आणि तिच्या व्यवसायाचे स्वरूप लक्षात घेता वाजवी आहे. पुस्तकी नोंदी आणि प्रत्यक्ष स्थिर मालमत्ता यांच्यात कोणतेही लक्षणीय फरक आढळलेले नाहीत;

क) स्थावर मालमत्तांची मालकी हक्क पत्रात (टायटल डीड्स) कंपनीच्या नावे आहेत.

ड) चालू वर्षात मालमत्ता, संयंत्र आणि साधनसामग्रीचे पुनर्मूल्यांकन (रिव्हॅल्युएशन) करण्यात आलेले नाही.

इ) बेनामी व्यवहार (प्रतिबंध) कायदा, १९८८ आणि त्याअंतर्गत तयार केलेल्या नियमांनुसार कोणतीही बेनामी मालमत्ता बाळगल्याबद्दल कंपनीविरुद्ध कोणतीही कायदेशीर प्रक्रिया सुरू केलेली नाही किंवा प्रलंबित नाही;

२) कंपनीकडे कोणतीही वस्तुसूची नाही आणि म्हणून संबंधित कलम कंपनीला लागू होत नाही;

३) आम्हाला मिळालेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार तसेच कंपनीच्या दस्तऐवजांच्या आमच्या तपासणीच्या आधारे, कंपनीने कंपन्या, भागीदारी संस्था, मर्यादित दायित्व भागीदारी संस्था किंवा इतर कोणत्याही पक्षांमध्ये गुंतवणूक केलेली नाही, तसेच त्यांना कोणतीही हमी वा सुरक्षा प्रदान केलेली नाही किंवा सुरक्षित अथवा असुरक्षित स्वरूपाचे कोणतेही कर्ज किंवा कर्जासारखी आगाऊ रक्कम दिलेली नाही. त्यानुसार, कलम ३(३)(अ) ते ३(३)(फ) कंपनीला लागू होत नाहीत;

४) आमच्या मते आणि आम्हाला मिळालेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार, कंपनीने कलम १८५ अंतर्गत येणाऱ्या पक्षांना कोणतेही कर्ज दिलेले नाही किंवा कोणतीही हमी वा सुरक्षा प्रदान केलेली नाही. कंपनीने या कायद्याच्या कलम १८६ च्या तरतुदींचे लागू असलेल्या मर्यादेपर्यंत पालन केले आहे;

५) कंपनीने जनतेकडून ठेवी (डिपॉझिट्स) स्वीकारलेल्या नाहीत आणि त्यामुळे जनतेकडून स्वीकारलेल्या ठेवींच्या संदर्भात भारतीय रिझर्व्ह बँकेने जारी केलेले निर्देश आणि या कायद्यातील कलम ७३ ते ७६ किंवा इतर कोणतीही संबंधित कलमे तसेच कंपनी (ठेवी स्वीकारणे) नियम, २०१५ च्या तरतुदी लागू होत नाहीत;

६) आम्हाला दिलेल्या माहितीनुसार, कंपनीद्वारे चालवल्या जाणाऱ्या उपक्रमांच्या संदर्भात, केंद्र सरकारद्वारे या कायद्याच्या कलम १४८ च्या उप-कलम (१) अंतर्गत खर्च नोंदी (कॉस्ट रेकॉर्ड्स) ठेवणे निर्दिष्ट केलेले नाही;

७) वैधानिक देयांबाबत:

(अ) आम्हाला मिळालेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार, भविष्य निर्वाह निधी (प्रॉव्हिडंट फंड), कर्मचारी राज्य विमा (एम्प्लॉईज स्टेट इन्शुरन्स), आयकर, विक्रीकर, सेवाकर, वस्तू आणि सेवाकर (जीएसटी), सीमाशुल्क (कस्टम ड्युटी), उत्पादन शुल्क (एक्साईज ड्युटी), मूल्यवर्धित कर (व्हॅल्यू ॲडेड टॅक्स), उपकर (सेस) आणि इतर महत्त्वाच्या वैधानिक देयांच्या संदर्भात कोणतीही विवादरहित देय रक्कम ३१ मार्च २०२२ रोजी, ती देय झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी थकीत नव्हती, खालील तपशील वगळता:

कराचे स्वरूप	थकबाकीचे स्वरूप	संबंधित कालावधी (वित्तीय वर्ष)	देय रक्कम
आयकर	कलम २४३/ई नुसार उशिरा दप्तरी दाखल केल्याबद्दल	२०१४–१५	११,०७८
आयकर	अपुरी वजावट	२०१२–१३	६,१२०
आयकर	कलम २०१ नुसार अपुऱ्या वजावटीवरील दंड	२०१२–१३	५९२
आयकर	देय कर वजावट	२०१९–२०२० ते २०२१–२०२२	१७,६८,३२८
आयकर	कर वजावटीवरील विलंब शुल्क आणि व्याज	२०१९–२०२० ते २०२१–२०२२	७,९४,९१८

(ब) आम्हाला मिळालेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार, आयकर, विक्रीकर, सेवाकर, सीमाशुल्क, उत्पादन शुल्क, मूल्यवर्धित कर, वस्तू आणि सेवाकर यांची कोणतीही देय रक्कम वादाच्या कारणास्तव थकीत नाही;

८) आम्हाला दिलेल्या माहितीनुसार, चालू वर्षात आयकर कायदा, १९६१ अंतर्गत कर आकारणीदरम्यान (टॅक्स असेसमेंट) कोणताही व्यवहार उत्पन्न म्हणून सरेंडर किंवा घोषित करण्यात आलेला नाही;

९) आमच्या मते आणि आम्हाला मिळालेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार, कंपनीने कोणतेही कर्ज घेतलेले नाही. त्यानुसार कलम ३(९) अंतर्गत अहवाल देणे कंपनीला लागू होत नाही;

१०) केलेल्या लेखापरीक्षण प्रक्रियेच्या आधारे आणि व्यवस्थापनाने दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार, कंपनीने प्रारंभिक जाहीर समभाग विक्री (आयपीओ) किंवा पुढील जाहीर समभाग विक्रीद्वारे (रोखे पत्रांसह) कोणताही निधी उभारलेला नाही, त्यानुसार कलम ३(१०)(अ) ते ३(१०)(ब) कंपनीला लागू होत नाहीत आणि म्हणूनच त्यावर कोणतेही भाष्य केलेले नाही;

११)

अ) केलेल्या लेखापरीक्षण प्रक्रियेच्या आधारे आणि व्यवस्थापनाने दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार, आम्ही असे प्रमाणित करतो की चालू वर्षात कंपनीद्वारे किंवा कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून वा कर्मचाऱ्यांकडून कंपनीवर कोणताही फसवणुकीचा प्रकार निदर्शनास आलेला नाही अथवा नोंदवला गेलेला नाही;

(ब) आम्हाला मिळालेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार, चालू वर्षात आणि या अहवालाच्या दिनांकापर्यंत केंद्र सरकारकडे कंपनी (लेखापरीक्षा आणि लेखापरीक्षक) नियम, २०१४ च्या नियम १३ अंतर्गत विहित केलेल्या फॉर्म एडीटी–मध्ये कंपनी कायद्याच्या कलम १४३ च्या उप–कलम (१२) अंतर्गत कोणताही अहवाल दाखल करण्यात आलेला नाही;

(क) या कायद्याच्या कलम १७७(९) च्या तरतुदी कंपनीला लागू होत नाहीत. कंपनीच्या व्यवस्थापनाने आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार, चालू वर्षात कंपनीकडे कोणतीही व्हिसल–ब्लोअर (तक्रारदार) तक्रार प्राप्त झालेली नाही;

१२) आमच्या मते, कंपनी ही निधी कंपनी नाही. त्यानुसार, आदेशातील कलम ३(१२) कंपनीला लागू होत नाही;

१३) आम्हाला मिळालेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार तसेच कंपनीच्या दस्तऐवजांच्या आमच्या तपासणीच्या आधारे, संबंधित पक्षांसोबतचे (रिलेटेड पार्टीज) व्यवहार लागू असलेल्या ठिकाणी कायद्याच्या कलम १८८ च्या अनुपालनात आहेत आणि अशा व्यवहारांचा सविस्तर तपशील लागू असलेल्या लेखांकन मानकांच्या आवश्यकतेनुसार सुधारित वित्तीय विवरणांमध्ये उघड करण्यात आला आहे. कायद्याचे कलम १७७ कंपनीला लागू होत नाही.

१४) कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३८ अन्वये कंपनीला अंतर्गत लेखापरीक्षक (इंटरनल ऑडिटर) नियुक्त करणे आवश्यक नाही. त्यानुसार, कलम ३(१४) कंपनीला लागू होत नाही;

१५) केलेल्या लेखापरीक्षण प्रक्रियेच्या आधारे आणि व्यवस्थापनाने दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार, कंपनीने संचालकांशी किंवा त्यांच्याशी संबंधित व्यक्तींशी कोणताही बिगर–रोख (नॉन–कॅश) व्यवहार केलेला नाही. त्यानुसार, कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १९२ च्या तरतुदी कंपनीला लागू होत नाहीत आणि म्हणूनच त्यावर कोणतेही भाष्य

केलेले नाही;

१६)

(अ) आमच्या मते, कंपनीला भारतीय रिझर्व्ह बँक कायदा, १९३४ च्या कलम ४५ आयए अंतर्गत नोंदणी करणे आवश्यक नाही आणि त्यानुसार, आदेशातील कलम ३(१६) (अ), (ब) आणि (क) कंपनीला लागू होत नाहीत आणि म्हणूनच त्यावर कोणतेही भाष्य केलेले नाही;

(ब) आमच्या मते, समूहामध्ये भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार कोणतीही मुख्य गुंतवणूक कंपनी (कोर इन्व्हेस्टमेंट कंपनी) मुख्य गुंतवणूक कंपनी (रिझर्व्ह बँक) निर्देश, २०१६ मध्ये परिभाषित केल्यानुसार नाही आणि म्हणूनच आदेशातील कलम (१६)(ड) च्या तरतुदी लागू होत नाहीत.

१७) कंपनीला चालू आर्थिक वर्षात तसेच मागील आर्थिक वर्षात कोणताही रोख तोटा (कॅश लॉस) झालेला नाही;

१८) विचाराधीन वर्षात लेखापरीक्षकाचा कोणताही राजीनामा झालेला नाही;

१९) वित्तीय गुणोत्तर (फायनान्शियल रेशो), वित्तीय मालमत्तेच्या वसुलीचे आणि वित्तीय दायित्वांच्या अदायगीचे वय व अपेक्षित दिनांकांची आकडेवारी, वित्तीय विवरणांसोबत असलेली इतर माहिती आणि संचालक मंडळ व व्यवस्थापनाच्या योजनांबाबतची आमची माहिती या आधारे, तसेच गृहितकांना पूरक असलेल्या पुराव्यांच्या आमच्या तपासणीनुसार, आमच्या निदर्शनास अशी कोणतीही बाब आलेली नाही ज्यामुळे आम्हाला असे मानण्याचे कारण मिळेल की, लेखापरीक्षण अहवालाच्या दिनांकास अशी कोणतीही लक्षणीय अनिश्चितता अस्तित्वात आहे जी दर्शवते की कंपनी ताळेबंदाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत देय होणारी ताळेबंदाच्या दिनांकावरील तिची दायित्वे पूर्ण करण्यास सक्षम नाही. तथापि, आम्ही असे नमूद करतो की, हे कंपनीच्या भविष्यातील व्यवहार्यतेचे आश्वासन नाही. आम्ही पुढे असेही नमूद करतो की, आमचा हा अहवाल लेखापरीक्षण अहवालाच्या दिनांकापर्यंतच्या तथ्यांवर आधारित आहे आणि ताळेबंदाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत देय होणारी सर्व दायित्वे कंपनीद्वारे ती देय होतील तशी पूर्ण केली जातील, याची आम्ही कोणतीही हमी किंवा आश्वासन देत नाही;

२०) कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३५ च्या तरतुदी कंपनीला लागू होत नाहीत आणि म्हणूनच कलम ३(२०)(अ), (ब) च्या तरतुदींवर कोणतेही भाष्य केलेले नाही;

२१) सुधारित लेखापरीक्षण अहवाल आणि सुधारित वित्तीय विवरणे एका स्वतंत्र (स्टँडअलोन) कंपनीची आहेत आणि त्यामुळे कलम ३(२१) कंपनीला लागू होत नाही.

एस आय जी एम ए सी अँड कंपनी करिता
सनदी लेखापाल
(फर्म नोंदणी क्रमांक ११६३५१डब्ल्यू)

राहुल सारडा
भागीदार
आयसीएआय सदस्यत्व क्रमांक: १३५५०१
ठिकाण: मुंबई
दिनांक: २१/०८/२०२५

मे. एसआयजीएमएसी अँड कंपनी

सनदी लेखापाल

२०४, कल्पतरू प्लाझा, चिंचोली बंदर, एस व्ही रोड जवळ, मालाड (प), मुंबई ४०००६४

कृपानिधी लिमिटेडच्या सुधारित स्वतंत्र लेखापरीक्षकाच्या अहवालाचे ''परिशिष्ट ब''

(आमच्या याच दिनांकाच्या कृपानिधी लिमिटेडच्या सदस्यांना दिलेल्या अहवालातील 'इतर कायदेशीर आणि नियामक आवश्यकतांवरील अहवाल' विभागातील परिच्छेद २–जी चा संदर्भ)

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १४३ च्या उप–कलम ३ च्या कलम (आय) अन्वये वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणांविषयीचा अहवाल

आम्ही ३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या वर्षासाठी कंपनीच्या सुधारित वित्तीय विवरणांच्या लेखापरीक्षणाच्या अनुषंगाने, कृपानिधी लिमिटेड (''कंपनी'') च्या वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणांचे लेखापरीक्षण केले आहे.

अंतर्गत वित्तीय नियंत्रणांसाठी व्यवस्थापनाचे उत्तरदायित्व

इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाने जारी केलेल्या वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणांच्या लेखापरीक्षणावरील मार्गदर्शन पुस्तिकेमध्ये (गाइडन्स नोट) नमूद केलेल्या अंतर्गत नियंत्रणाच्या आवश्यक घटकांचा विचार करून, कंपनीने वित्तीय अहवालावरील अंतर्गत नियंत्रण निकषांच्या आधारे अंतर्गत वित्तीय नियंत्रणे प्रस्थापित करणे आणि ती टिकवून ठेवणे यासाठी कंपनीचे व्यवस्थापन उत्तरदायी आहे. या उत्तरदायित्वांमध्ये कंपनी कायदा, २०१३ अंतर्गत आवश्यकतेनुसार व्यवसायाचे कामकाज सुरळीत आणि कार्यक्षमतेने चालणे सुनिश्चित करण्यासाठी प्रभावीपणे कार्यरत असणारी पुरेशी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे तयार करणे, लागू करणे व ती टिकवून ठेवणे; ज्यामध्ये कंपनीच्या धोरणांचे पालन करणे, तिच्या मालमत्तेचे संरक्षण करणे, फसवणूक आणि चुकांना प्रतिबंध करणे व शोधणे, लेखांकन दस्तऐवजांची अचूकता आणि पूर्णता सुनिश्चित करणे, आणि विश्वसनीय वित्तीय माहिती वेळेवर तयार करणे या बाबींचा समावेश होतो.

लेखापरीक्षकाचे उत्तरदायित्व

आमचे उत्तरदायित्व आमच्या लेखापरीक्षणाच्या आधारे कंपनीच्या वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणांविषयी अभिप्राय व्यक्त करणे हे आहे. आम्ही आमचे लेखापरीक्षण इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाने जारी केलेल्या वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणांच्या लेखापरीक्षणावरील मार्गदर्शन पुस्तिकेनुसार (गाइडन्स नोट) आणि कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १४३(१०) अंतर्गत विहित केलेल्या लेखापरीक्षण मानकांनुसार, अंतर्गत वित्तीय नियंत्रणांच्या लेखापरीक्षणास लागू असलेल्या मर्यादेपर्यंत पार पाडले आहे; हे दोन्ही इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाने जारी केले आहेत. या मानकांनुसार आणि मार्गदर्शन पुस्तिकेनुसार आम्ही नैतिक आवश्यकतांचे पालन करणे आणि वित्तीय अहवालावर पुरेशी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे प्रस्थापित व राखली गेली आहेत की नाही आणि अशी नियंत्रणे सर्व लक्षणीय बाबींमध्ये प्रभावीपणे कार्यरत होती की नाही, याबाबत वाजवी खात्री मिळवण्यासाठी लेखापरीक्षणाचे नियोजन व अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

आमच्या लेखापरीक्षणामध्ये वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रण व्यवस्थेची पर्याप्तता आणि त्यांच्या कार्यात्मक परिणामकारकतेबद्दल लेखापरीक्षण पुरावे मिळवण्यासाठी विविध प्रक्रिया पार पाडण्याचा समावेश होतो. वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणांच्या आमच्या लेखापरीक्षणामध्ये वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणांची समजून घेणे, एखादी लक्षणीय त्रुटी (मटेरियल वीकनेस) असण्याच्या जोखमीचे मूल्यांकन करणे आणि मूल्यांकित जोखमीच्या आधारे अंतर्गत नियंत्रणाची रचना व त्याची कार्यात्मक परिणामकारकता तपासणे व त्याचे मूल्यमापन करणे यांचा समावेश होतो. निवडलेल्या प्रक्रिया फसवणूक किंवा चुकीमुळे वित्तीय विवरणांमध्ये लक्षणीय चुकीची विधाने असण्याच्या जोखमीच्या मूल्यांकनासह, लेखापरीक्षकाच्या निर्णयावर अवलंबून असतात.

आमच्या मते, आम्ही मिळवलेले लेखापरीक्षण पुरावे कंपनीच्या वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रण व्यवस्थेवर आमचा लेखापरीक्षण अभिप्राय देण्यासाठी पुरेसे आणि योग्य आहेत.

वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणांचा अर्थ

कंपनीच्या वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रण म्हणजे सामान्यतः स्वीकारलेल्या लेखांकन तत्त्वांना (गॅप) अनुसरून बाह्य उद्देशांसाठी वित्तीय अहवालाची विश्वसनीयता आणि वित्तीय विवरणे तयार करण्याबाबत वाजवी खात्री देण्यासाठी तयार केलेली एक प्रक्रिया आहे. कंपनीच्या वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणामध्ये अशा धोरणांचा आणि प्रक्रियांचा समावेश होतो ज्या:

१. कंपनीच्या व्यवहारांचे आणि मालमत्तेच्या विल्हेवाटीचे वाजवी तपशिलानुसार, अचूक आणि वाजवी चित्रण करणारे दस्तऐवज राखण्याशी संबंधित आहेत;
२. सामान्यतः स्वीकारलेल्या लेखांकन तत्त्वांना अनुसरून वित्तीय विवरणे तयार करण्यास अनुमती देण्यासाठी आवश्यकतेनुसार व्यवहारांची नोंद केली जाते आणि कंपनीच्या जमा व खर्चाच्या रकमा केवळ व्यवस्थापन आणि कंपनीच्या संचालकांच्या अधिकृततेनुसारच केल्या जात आहेत, याबाबत वाजवी खात्री देतात; आणि
३. कंपनीच्या मालमत्तेची अनधिकृत खरेदी, वापर किंवा विल्हेवाट, ज्याचा वित्तीय विवरणांवर लक्षणीय परिणाम होऊ शकतो, अशा गोष्टींना प्रतिबंध करण्याबाबत किंवा वेळेवर शोध घेण्याबाबत वाजवी खात्री देतात.

वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणांच्या अंगभूत मर्यादा

वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणांच्या अंगभूत मर्यादांमुळे (ज्यामध्ये संगनमत असणे किंवा व्यवस्थापनाद्वारे नियंत्रणांचे अयोग्य उल्लंघन (ओव्हरराइड) असण्याच्या शक्यतेचा समावेश होतो), चूक किंवा फसवणुकीमुळे होणारी लक्षणीय चुकीची विधाने घडू शकतात आणि ती शोधली न जाण्याची शक्यता असते. तसेच, वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणांच्या कोणत्याही मूल्यमापनाचे भविष्यातील कालावधीसाठी केलेले अंदाज हे अशा जोखमीच्या अधीन असतात की, बदलत्या परिस्थितीमुळे वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणे अपुरी पडू शकतात किंवा धोरणे व प्रक्रियांच्या अनुपालनाचा (कम्प्लायन्स) दर्जा खालावू शकतो.

अभिप्राय

आमच्या मते, आम्हाला मिळालेल्या संपूर्ण माहितीच्या आधारे आणि आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाने जारी केलेल्या वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणांच्या लेखापरीक्षणावरील मार्गदर्शन पुस्तिकेमध्ये (गाइडन्स नोट) नमूद केलेल्या अंतर्गत नियंत्रणाच्या आवश्यक घटकांचा विचार करून कंपनीने प्रस्थापित केलेल्या वित्तीय अहवालावरील अंतर्गत नियंत्रण निकषांच्या आधारे, कंपनीकडे सर्व लक्षणीय बाबींमध्ये वित्तीय अहवालावर एक पुरेशी अंतर्गत वित्तीय नियंत्रण व्यवस्था आहे आणि अशी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे ३१ मार्च, २०२२ रोजी प्रभावीपणे कार्यरत होती.

एस आय जी एम ए सी अँड कंपनी करिता
सनदी लेखापाल
(फर्म नोंदणी क्रमांक ११६३५१डब्ल्यू)

राहुल सारडा
भागीदार
आयसीएआय सदस्यत्व क्रमांक: १३५५०१
ठिकाण: मुंबई
दिनांक: २१/०८/२०२५

मे. एसआयजीएमएसी अँड कंपनी

सनदी लेखापाल

२०४, कल्पतरू प्लाझा, चिंचोली बंदर, एस व्ही रोड जवळ, मालाड (प), मुंबई ४०००६४

कृपानिधी लिमिटेडच्या सुधारित स्वतंत्र लेखापरीक्षकाच्या अहवालाचे ''परिशिष्ट क''

(आमच्या याच दिनांकाच्या कृपानिधी लिमिटेडच्या सदस्यांना दिलेल्या अहवालातील 'इतर कायदेशीर आणि नियामक आवश्यकतांवरील अहवाल' विभागातील परिच्छेद २–आय चा संदर्भ)

अ. क्र.	कंपनी कायदा २०१३ च्या कलम १४३(५) अंतर्गत निर्देश	उत्तर
१	कंपनीकडे सर्व लेखांकन व्यवहार (अकाउंटिंग ट्रान्झॅक्शन्स) आयटी प्रणालीद्वारे (IT system) पार पाडण्यासाठी यंत्रणा कार्यरत आहे का? असल्यास, आयटी प्रणालीबाहेर लेखांकन व्यवहार पार पाडल्यामुळे खात्यांच्या अखंडतेवर (इंटिग्रिटी) होणारे परिणाम आणि त्याचे काही आर्थिक परिणाम झाले असल्यास, ते नमूद करावेत.	कंपनी आपले हिशोब पुस्तक 'टॅली' (ढरश्रश्रू) या आयटी प्रणालीवर ठेवते, जे एक ईआरपी (ERP) सॉफ्टवेअर आहे. सर्व लेखांकन व्यवहार टॅलीवर ठेवण्यात आलेल्या खात्यांमध्येच पार पाडले जातात. केलेल्या लेखापरीक्षण प्रक्रियेच्या आधारे आणि आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार, कंपनीच्या आयटी प्रणालीबाहेर कोणतेही लेखांकन व्यवहार पार पाडले किंवा चालवले गेलेले नाहीत. त्यानुसार, आमच्या मते खात्यांच्या अखंडतेवर (इंटिग्रिटी) कोणताही परिणाम झालेला नाही.
२	कंपनी कर्ज परतफेड करण्यास असमर्थ असल्यामुळे सावकाराने/कर्जदात्याने विद्यमान कर्जाची पुनर्रचना (रिस्ट्रक्चरिंग) केली आहे का, किंवा थकबाकी/कर्ज/व्याज इत्यादी माफ (वेव्हर) किंवा निर्लेखित (राईट ऑफ) केल्याची काही प्रकरणे आहेत का? असल्यास, त्याचा आर्थिक प्रभाव नमूद करावा.	केलेल्या लेखापरीक्षण प्रक्रियेच्या आधारे आणि कंपनीने आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार, कंपनी कर्ज परतफेड करण्यास असमर्थ असल्यामुळे कर्जदात्याकडून विद्यमान कर्जाची पुनर्रचना केलेली नाही, तसेच थकबाकी/कर्ज/व्याज माफ केल्याचे किंवा निर्लेखित केल्याचे कोणतेही प्रकरण अस्तित्वात नाही.
३	केंद्रीय/राज्य संस्थांकडून विशिष्ट योजनांसाठी प्राप्त झालेला/प्राप्त होणारा निधी योग्य प्रकारे हिशोबात घेतला गेला आहे का आणि त्याच्या अटी व शर्तींनुसार त्याचा विनियोग (वापर) केला गेला आहे का? विचलनाची (अटींचे उल्लंघन झाल्याची) प्रकरणे सूचीबद्ध करावीत.	केलेल्या लेखापरीक्षण प्रक्रियेच्या आधारे आणि आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार, केंद्रीय/राज्य संस्थांकडून विशिष्ट योजनांसाठी कोणताही निधी प्राप्त झालेला नाही किंवा प्राप्त होणे बाकी नाही.

एस आय जी एम ए सी अँड कंपनी करिता

सनदी लेखापाल

(फर्म नोंदणी क्रमांक ११६३५१डब्ल्यू)

राहुल सारडा

भागीदार

आयसीएआय सदस्यत्व क्रमांक: १३५५०१

ठिकाण: मुंबई

दिनांक: २१/०८/२०२५

OFFICE OF THE COMPTROLLER AND AUDITOR GENERAL OF INDIA
10, BAHADUR SHAH ZAFAR MARG, NEW DELHI - 110 124

No./CA. V/ COY/MAHARASHTRA,KRUPAN(1)/1722
Dated : 13/09/2022

To
THE MANAGING DIRECTOR
KRUPANIDHI LIMITED
KRUPANIDHI, 9,
WALCHAND HIRACHAND MARG,
MUMBAI-400038
MAHARASHTRA

Subject : Appointment of Auditors under section 139 of the Companies Act, 2013 for the financial year 2022-2023

Sir/Madam,

I am directed to state that in exercise of the powers conferred by section 139 of the Companies Act 2013, the Comptroller and Auditor General of India is pleased to appoint the Chartered Accountant firms/Limited Liability Partnerships As per Annexure - II as the Statutory/Joint Statutory/ Branch Auditors of the company for the year(s) : 2022-2023. Statutory/Joint Statutory Auditor (s) of holding company shall also be the auditors of Consolidated Financial Statements under section 139 read with section 129(4) of the Companies Act, 2013.

2. You are requested to contact the concerned auditors individually under intimation to this office

3. The supplementary/test audit under sections 143 (6) & (7) of the Companies Act, 2013 of your company is entrusted to
ACCOUNTANT GENERAL (AUDIT) - II
NAGPUR-440001

4. The remuneration and other allowances payable to the auditors may be regulated as per the provisions of section 142 of the Companies Act 2013 read with guidelines issued by the Department of Company Affairs vide no. 7/76 dated 8th April, 1976 and no. 8/6/83 dated 07th June, 1984.

5. The audit fees paid/payable to the auditors as intimated by the Company has been indicated in Annexure-II. Any revision in the audit fees payable (including fees for consolidation) for the year 2022-2023 and item-wise details of all remuneration paid to the auditors for other services (other than statutory audit) alongwith the amount of TA/DA paid for 2021-2022 may be intimated.
The said information may be provided as soon as the Accounts for the year 2021-2022 is finalised so as to enable this office to review the appointment/ re-appointment of the appointed auditors.

6. The above appointment is subject to the other conditions stipulated in Annexure-I(available on the CAG's website http://care.cag.gov.in/policy/terms.pdf).

Yours faithfully,
Sd
(Raj Kumar)
Sr. Administrative Officer

Phone : 011-23509240 Fax : 91-11-23237730, 91-11-23509241 E-mail : saoca5@cag.gov.in, sao2ca5@cag.gov.in

ANNEXURE - II

LIST OF CHARTERED ACCOUNTANT FIRMS FOR THE YEAR 2022-2023

Sl. No.	Firm Name	PSU Code / Unit Code	Station	Audit Details	Fees per annum in Rs (As intimated by the PSU)
STATUTORY AUDITOR					
1	SIGMAC & CO (WR2638) 204, KALPATAU PLAZA CHINCHOLI BUNDER ROAD, OFF SV ROAD MALAD WEST MUMBAI MUMBAI - 400064,MAHARASHTRA	KRUPAN BOM (2)	MUMBAI		11800

Any change/revision in the audit fee payable to each of the auditor (s) mentioned above should be immediately intimated to this office for record and reference as the selection of auditors is based on the audit fees paid/payable.

महालेखाकार का कार्यालय (लेखापरीक्षा) - II महाराष्ट्र-मुंबई शाखा कार्यालय
OFFICE OF THE ACCOUNTANT GENERAL(AUDIT) - II MAHARASHTRA
BRANCH OFFICE MUMBAI
दूरभाष सं./ Tel. No. : 022-22054022 / 022-22057360, फैक्स न./ Fax No.: 022-22092326
ई-मेल / E-mail : agcommauMaharashtra@cag.gov.in

सत्यमेव जयते

प्रमले-लेप/II/मुंबई शाखाटेक्निकल सेल// कृपानिधि/2021-22/1112/529 दिनांक: 09/03/2026

सेवा में,

प्रबंध निदेशक,
कृपानिधि लिमिटेड,
9, वालचंद हीराचंद मार्ग, बॅलार्ड एस्टेट,
मुंबई 400001.

विषय:- 31 मार्च 2022 को समाप्त हुए वर्ष के कृपानिधि लिमिटेड (revised) के लेखों पर कम्पनी अधिनियम, 2013 की धारा 143(6)(b) के अंतर्गत भारत के नियंत्रक एवं महालेखापरीक्षक की निरंक टिप्पणी।

महोदय,

31 मार्च, 2022 को समाप्त हुए वर्ष के **कृपानिधि लिमिटेड (revised)**लेखों पर कंपनी अधिनियम, 2013 की धारा 143(6)(b) के अंतर्गत भारत के नियंत्रक एवं महालेखापरीक्षक का **निरंक टिप्पणी** प्रमाणपत्र (Nil comment certificate) संलग्न है।

वार्षिक आमसभा (A.G.M.) होने के पश्चात, वार्षिक रिपोर्ट की तीन मुद्रित प्रतियाँ कृपया इस कार्यालया को भेज दें, साथ ही उपरोक्त लेखों के वार्षिक प्रतिवेदन को विधानसभा में प्रस्तुत करने की तिथि को भी इस कार्यालय को सूचित करें।

भवदीया,

संलग्नक : यथोपरि

(शुभांगी, *IAAS*)
वरिष्ठ उपमहालेखाकार
महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, महाराष्ट्र,
शाखा कार्यालय मुंबई।

COMMENTS OF THE COMPTROLLER AND AUDITOR GENERAL OF INDIA UNDER SECTION 143(6)(b) OF THE COMPANIES ACT, 2013 ON THE FINANCIAL STATEMENTS OF KRUPANIDHI LIMITED FOR THE YEAR ENDED 31 MARCH 2022.

The preparation of Financial Statements of **Krupanidhi Limited** for the year ended **31 March 2022** in accordance with the financial reporting framework prescribed under the Companies Act, 2013 is the responsibility of the management of the Company. The Statutory Auditors appointed by the Comptroller and Auditor General of India under Section 139 (5) of the Act, are responsible for expressing opinion on the Financial Statements under Section 143 of the Act based on independent audit in accordance with the standards on auditing prescribed under Section 143(10) of the Act. This is stated to have been done by them vide their Audit Report dated **21 August 2025.**

I, on behalf of the Comptroller and Auditor General of India, have conducted a supplementary audit of the Financial Statements of Krupanidhi Limited for the year ended 31 March 2022 under Section 143(6)(a) of the Act. This supplementary audit has been carried out independently without access to the working papers of the Statutory Auditors and is limited primarily to inquiries of the Statutory Auditors and Company personnel and a selective examination of some of the accounting records.

On the basis of my supplementary audit nothing significant has come to my knowledge which would give rise to any comment upon or supplement to statutory auditors' report under section 143 (6)(b) of the act.

For and on behalf of
The Comptroller and Auditor General of India

Date: 09/03/2026
Place: Nagpur

Shirsat
09.03.26

(Dattaprasad S. Shirsat)
Accountant General (Audit)-II, Maharashtra

महालेखाकार का कार्यालय (लेखापरीक्षा) - II महाराष्ट्र-मुंबई शाखा कार्यालय
OFFICE OF THE ACCOUNTANT GENERAL(AUDIT) - II MAHARASHTRA
BRANCH OFFICE MUMBAI
दूरभाष सं./ Tel. No. : 022-22054022 / 022-22057360, फैक्स न./ Fax No.: 022-22092326
ई-मेल / E-mail : agcommauMaharashtra@cag.gov.in

सत्यमेव जयते

प्रमले/ लेप-II/मुंबई शाखा/टेक्निकल सेल/ कृपानिधि/2021-22/1112/532 दिनांक: 09/03/2026

सेवा में,

प्रबंध निदेशक,
कृपानिधि लिमिटेड,
9, वालचंद हीराचंद मार्ग, बॅलार्ड एस्टेट,
मुंबई 400001.

विषय: कंपनी अधिनियम, 2013 की धारा 143(6)(बी) के तहत वर्ष 2024-25 के लिए कृपानिधि लिमिटेड, के लेखो पर लेखापरीक्षण में देखी गई कमियाँ (प्रबंधन पत्र)।

Sub: Issues noticed during the Supplementary Audit of the Financial Statements of Krupanidhi Limited for the year 2021-22 under Section 143(6)(b) of the Companies Act, 2013 (Management Letter)

महोदय/महोदया,

कंपनी अधिनियम, 2013 की धारा 143(6)(b) के तहत इस कार्यालय द्वारा कृपानिधि लिमिटेड के वर्ष 2021-22 के लेखो की लेखापरीक्षा की गई थी। लेखापरीक्षा ने निम्नलिखित मुद्दों/ टिप्पणियों पर प्रबंधन को ध्यान देने की आवश्यकता है।

The Supplementary Audit of the financial statements of Krupanidhi Limited for the year ended 31 March 2022 was conducted by this office under Section 143(6)(b) of the Companies Act, 2013. During the course of the audit, it was observed that the following significant issues require the attention of the Management:

A. COMMENTS ON FINANCIAL POSITION

Balance Sheet
Equity and Liabilities
Current Liabilities
Short term provision (Note No. 8): ₹ 8.39 lakh

1. The above has been understated by ₹ 8.70 lakh due to short provision of interest payable arising from default in timely deduction of tax at source in respect of rent arrears of ₹ 1.77

lakh for the period from 1 January 2009 to 31 March 2022, payable to Mumbai Port Trust. The Company had provided interest up to 31 March 2022 amounting to ₹7.17 lakh[1] as against the required interest liability of ₹ 15.86 lakh as per the provisions of Section 194-I and Section 201 (1A) of the Income Tax Act of 1961.

This has resulted **understatement** of **prior-period expenses, Liabilities (Short-term Provisions, revenue and assets (receivables) by ₹8.70 lakh**[2]

Balance Sheet
Current Liabilities
Short Term Provisions (Note 8): ₹8.39 lakh

2. The above does not include water charges amounting to ₹ 0.83 lakh pertaining to FY 2021–22, for which bills were received and paid during FY 2022–23. This has resulted in an **understatement of Current Liabilities (Short-term Provisions)** and a **consequent understatement of Expenses and Revenue** by ₹ 0.83 lakh

3. The above amount also does not include ₹ 0.36 lakh payable towards professional charges to M/s Little & Co., Advocates and Solicitors, for appearances before the Trial Court during the period from January 2021 to March 2022. This has resulted in an **understatement of Current Liabilities (Short-term Provisions)** and a **consequent understatement of Expenses and Revenue** by ₹ 0.36 lakh.

4. The above does not include ex-gratia amounting to ₹ 0.35 lakh pertaining to FY 2020–21, payable to three employees, which was not provided for, though the amount was subsequently paid by the Company in October 2022. This has resulted in an **understatement of Current Liabilities (Short-term Provisions)** and a **consequent understatement of Expenses and Revenue** by ₹ 0.35 lakh.

Current Assets
Other Current assets – Note 14 – Nil
Prepaid expenses – Nil

---

1 Previous years: ₹ 4.50 lakh and current year: ₹ 2.66 lakh

2 The company is not engaged in any business activity. Expenditure incurred for the maintenance of building during the year is allocated to members on their shareholding ratio and the allocated amount is recognised as revenue in the books on issue of debit notes to tenement.

5. The Company has paid insurance charges of ₹ 2.87 lakh in September 2021 Which includes premium paid towards policy for the period from September 2021 to September 2022. However, the entire expenditure has been booked in Profit and Loss account in 2021-22 itself.

This has resulted in **understatement of Current Assets** (note 14) – **prepaid expenses to the extent of ₹1.43 lakh (up to March 2022) and overstatement of other expenses** (note 18) – **building insurance to the same extent.**

B. OTHER COMMENTS

6. The period mentioned in Annexure IX of the Annexure to Notes should be read as "**Expenses Distribution during the year 01.04.2021 to 31.03.2022**" instead of "**Expenses Distribution during the year 01.04.2020 to 31.03.2021**". Further, as per Annexure IX of Annexure to Notes the distribution of expenses incurred during the year to Maharashtra Small Scale Industries Development Corporation Limited (MSSIDC) was shown as ₹ 15.06 lakh. However, recovery of expenses incurred shown under Sr. No. 1 of Table of transaction between related parties (MSSIDC) under Note No. 19 was ₹ 14.53 lakh-. Accordingly, the difference between the two figures requires correction to ensure consistency in disclosures.

प्रबंधन इस संबंध में आवश्यक कदम उठाये.

The Management may take necessary steps in this regard.

भवदीया,

(शुभांगी, IAAS)
वरिष्ठ उपमहालेखाकार
महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, महाराष्ट्र,
शाखा कार्यालय मुम्बई।

कृपानिधी लिमिटेड

कृपानिधी ९, वालचंद हिराचंद मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई ४००००१

दिनांक ३१ मार्च २०२२ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा सुधारित ताळेबंद

(रक्कम १००/– रुपयांत)

तपशील	टीप	३१.०३.२०२२	३१.०३.२०२१
I. भाग भांडवल व देयता			
(१) भागधारकांचे निधी			
(अ) शेअर भांडवल	२	१,०००.००	१,०००.००
(ब) राखीव व अधिशेष	३	–	–
(क) शेअर वॉरंट्सविरुद्ध प्राप्त रक्कम		–	–
(२) समभाग वाटप प्रलंबित आवेदन रक्कम		–	–
(३) बिगर चालू देणी			
(अ) दीर्घकालीन कर्ज		–	–
(ब) स्थगित कर देणी (निव्वळ)		–	–
(क) इतर दीर्घकालीन देणी	४	४६,३७४.७८	४६,३७४.७८
(ड) दीर्घकालीन तरतुदी	५	१,५९,१४९.५१	१,२२,६८०.६६
(४) चालू देणी			
(र) अल्पकालीन कर्ज		–	–
(ल) व्यापार देयके			
(अ) सूक्ष्म व लघु उद्योगांची प्रलंबित देयके तसेच		–	–
(ब) सूक्ष्म व लघु उद्योगांव्यतिरिक्त इतर देयकदारांची प्रलंबित देयके	६	६४७.३७	६३७.३७
(क) इतर अल्पकालीन देणी	७	३९,४६०.६१	८८,९०८.९३
(ड) अल्पकालीन तरतुदी	८	८,३८६.३५	८,३११.४६
एकूण		**२,५५,०१८.६२**	**२,६७,९१३.२०**
II. मत्ता			
(अ) बिगर चालू मत्ता			
(१) (अ) मालमत्ता, वनस्पती व उपकरणे			
(i) मूर्त मालमत्ता	९	१०२.८७	११९.२९
(ii) अमूर्त मालमत्ता		–	–
(iii) प्रगतीपथावरील भांडवली काम		–	–
(iv) विकासाधीन अमूर्त मालमत्ता		–	–

कृपानिधी लिमिटेड

कृपानिधी ९, वालचंद हिराचंद मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई ४००००१

दिनांक ३१ मार्च २०२२ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा सुधारित ताळेबंद

(रक्कम १००/– रुपयांत)

(ब) बिगर–चालू मालमत्ता	१०	४६,३९०.००	४६,३९०.००
(क) प्रलंबित कर मालमत्ता (निव्वळ)		–	–
(ड) बिगर चालू कर्ज व आगाऊ रक्कम		–	–
(इ) इतर बिगर चालू मालमत्ता	११	१,८२,५८७.११	१,६४,३७५.९९
(२) चालू मालमत्ता			
(अ) चालू गुंतवणूक		–	–
(ब) वस्तुसूची		–	–
(क) व्यापार प्राप्य	१२	२२,२०५.०७	५२,२८६.६५
(ड) रोख व रोख समकक्ष	१३	३,७३३.५७	४,७४१.२७
(इ) चालू कर्ज व आगाऊ रक्कम		–	–
(फ) इतर चालू मालमत्ता	१४	–	–
एकूण		**२,५५,०१८.६२**	**२,६७,९१३.२०**

सोबतच्या टीपा वित्तीय विवरणपत्राचा अविभाज्य भाग आहेत.

आमच्या समदिनांकाच्या अहवालानुसार

एस आय जी एम ए सी अँड कंपनी करिता
सनदी लेखापाल
(फर्म नोंदणी क्रमांक ११६३५१डब्ल्यू)

कृपानिधी लिमिटेड करिता

राहुल सारडा (भागीदार)
सदस्यत्व क्रमांक: १३५५०१
ठिकाण: मुंबई
दिनांक: २१/०८/२०२५

अक्षय पाठक
(अध्यक्ष आणि संचालक)
(DIN)- 11164722
ठिकाण: मुंबई
दिनांक:

सुरेंद्र कुमार (संचालक)
(DIN)- 08926482
ठिकाण: मुंबई
दिनांक

कृपानिधी लिमिटेड

कृपानिधी ९, वालचंद हिराचंद मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई ४००००१

दिनांक ३१ मार्च २०२२ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचे सुधारित नफा तोटा पत्रक

(रक्कम १००/– रुपयांत)

क्र.	तपशील	टीप	३१.०३.२०२२	३१.०३.२०२१
I.	कामकाज कार्यातून रोख ओघ		–	–
II.	इतर उत्पन्न	१५	४५,९५६.८८	३८,९८७.६९
III.	**एकूण महसूल (I+II)**		**४५,९५६.८८**	**३८,९८७.६९**
IV.	**खर्च :**			
	कर्मचाऱ्यांच्या लाभावरील खर्च	१६	७,७५६.७४	८,२५२.९३
	घसारा आणि परतफेडीची तरतूद	१७	१६.४२	२२.७५
	इतर खर्च	१८	३८,१८३.७२	३०,७१२.०१
	एकूण खर्च		**४५,९५६.८८**	**३८,९८७.६९**
V.	अपवादात्मक आणि असाधारण बाबी आणि करपूर्व नफा **(III-IV)**		०.००	–
VI.	अपवादात्मक आणि असाधारण बाबी			
	– कालावधीपूर्व बाबी (सामान्य टिपांमधील टीप 'ग' पाहा)			–
VII.	करपूर्व नफा **(V-VI)**		०.००	–
VIII.	**कर खर्च**			
	१. चालू कर		–	–
	२. स्थगित कर		–	–
IX.	**चालू व्यवहारांमुळे झालेला नफा/(तोटा) (VII-VIII)**		०.००	–
X.	**बंद व्यवहारांमुळे झालेला नफा/(तोटा)**		–	–
XI.	**बंद व्यवहारांवरील कर**		–	–
XII.	**बंद व्यवहारांमुळे करपश्चात नफा/(तोटा) (X-XI)**		–	–
XIII.	**प्रस्तुत कालावधीतील नफा/तोटा (IX+XII)**		–	–
XIV.	**साधारण भागांमुळे उत्पन्न**			
	(१) मूळ		–	–
	(२) सुधारित		–	–

सोबतच्या टीपा वित्तीय विवरणपत्राचा अविभाज्य भाग आहेत.

आमच्या समदिनांकाच्या अहवालानुसार

एस आय जी एम ए सी अँड कंपनी करिता
सनदी लेखापाल
(फर्म नोंदणी क्रमांक ११६३५१डब्ल्यू)

कृपानिधी लिमिटेड करिता

राहुल सारडा (भागीदार)

सदस्यत्व क्रमांक: १३५५०१
ठिकाण: मुंबई
दिनांक: २१/०८/२०२५

अक्षय पाठक
(अध्यक्ष आणि संचालक)
(DIN)- 11164722
ठिकाण: मुंबई
दिनांक:

सुरेंद्र कुमार (संचालक)
(DIN)- 08926482
ठिकाण: मुंबई
दिनांक

कृपानिधी लिमिटेड

कृपानिधी ९, वालचंद हिराचंद मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई ४००००१

दिनांक ३१ मार्च २०२२ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा सुधारित रोखओघ

(रक्कम १००/– रुपयांत)

अ.क्र.	तपशील	आर्थिक वर्ष संपल्याचा दिनांक	
		३१.०३.२०२२	३१.०३.२०२१
अ.	**कामकाज कार्यातून रोख ओघ**		
	नफा तोटा विवरणानुसार करपूर्व निव्वळ नफा		
	समायोजन :		
	घसारा	१६.४२	२२.७५
	मत्तांची विक्री	–	–
	मत्तांची खरेदी	–	–
	व्याजाचे उत्पन्न	–२०७.४१	–२४६.९३
	वजा : मत्तांच्या विक्रीतील नफा/तोटा	–	–
	खेळत्या भांडवलातील बदलांपूर्वीचा नफा	**–१९०.९९**	**–२२४.१८**
	समायोजन :		
	इतर बिगर चालू मत्तांमधील (वाढ) वा घट	१८,२११.१३	–२३,५५६.०७
	व्यापारी ऋणकोंमधील (वाढ) वा घट	३०,०८१.५८	३,२४३.७९
	अल्पकालीन कर्जे व अग्रिमे यातील (वाढ) वा घट	–	–
	इतर चालू मत्तांमधील (वाढ) वा घट	–	८०१.२०
	दीर्घकालीन तरतुदींमधील वाढ वा (घट)	३६,४६८.८५	–
	व्यापारी देण्यांमधील वाढ वा (घट)	१०.००	२२६.००
	इतर चालू दायित्वांमधील वाढ वा (घट)	–४९,४४८.३२	२४,१६२.२०
	अल्पकालीन तरतुदींमधील वाढ वा (घट)	७४.९०	–३२५.५१
	कार्यांमधून निर्माण झालेली रोख	**–१,२१५.११**	**४,३२७.४४**
	भरणा केलेला आयकर/ करवजावट	–	–
	कार्यांमधून निर्माण झालेली निव्वळ रोख (अ)	**–१,२१५.११**	**४,३२७.४४**
ब.	**गुंतवणुकींमधून रोख ओघ**		
	स्थावर मत्तांची खरेदी	–	–
	स्थावर मत्तांच्या विक्रीतून उत्पन्न	–	–
	व्याज व तत्सम बाबींमुळे मिळालेले उत्पन्न	२०७.४१	२४६.९३
	गुंतवणुकीतून निर्माण झालेली निव्वळ रोख (ब)	**२०७.४१**	**२४६.९३**

क.	**वित्तीय कृतींमधून निर्माण झालेली निव्वळ रोख**		
	असुरक्षित कर्जाची परतफेड	–	–
	घेतलेले कर्ज/धनकोंच्या थकबाकीचे निर्लेखन	–	–
	दीर्घमुदतीच्या कर्जांमधील वाढ/घट	–	–
	दीर्घकालीन दायित्वांमधील वाढ/घट	–	–
	वित्तीय कृतींमध्ये वापरलेली निव्वळ रोख (क)	–	–
	रोख आणि तत्सममध्ये झालेली निव्वळ वाढ/(घट): (अ+ब+क)	**–१,००७.७०**	**४,५७४.३७**
	वर्षाच्या सुरुवातीला असलेली रोख व तत्सम	४,७४१.२७	१६६.९०
	वर्षाच्या शेवटी असलेली रोख व तत्सम	३,७३३.५७	४,७४१.२७

टीपः वरील वित्तीय विवरण लेखा मानक ३ मध्ये विहित केलेल्या अप्रत्यक्ष पद्धतीचा अवलंब करून तयार केले आहे. सोबतच्या टीपा आर्थिक विवरणांचा अविभाज्य भाग आहेत.

आमच्या सम तारखेच्या अहवालानुसार.

एस आय जी एम ए सी अँड कंपनी करिता
सनदी लेखापाल
(फर्म नोंदणी क्रमांक ११६३५१डब्ल्यू)

कृपानिधी लिमिटेड करिता

राहुल सारडा (भागीदार)
सदस्यत्व क्रमांक: १३५५०१
ठिकाण: मुंबई
दिनांक: २१/०८/२०२५

अक्षय पाठक
(अध्यक्ष आणि संचालक)
(DIN)- 11164722
ठिकाण: मुंबई
दिनांक:

सुरेंद्र कुमार (संचालक)
(DIN)- 08926482
ठिकाण: मुंबई
दिनांक

कृपानिधी लिमिटेड

३१ मार्च २०२२ रोजीच्या सुधारित ताळेबंदाचा भाग असलेल्या नोंदी

टीप २ : भागभांडवल (रक्कम १००/– रुपयात)

अ.क्र.	तपशील	३१.०३.२०२२	३१.०३.२०२१
१	**अधिकृत :**		
	(३१.०३.२०२१ : ५०,०००) समभाग प्रत्येकी रु. १००/– प्रमाणे	**५०,०००.००**	**५०,०००.००**
		५०,०००.००	**५०,०००.००**
२	**निर्गमित केलेले, अभिदत्त आणि संपूर्ण भरणा केलेले :**		
	(३१.०३.२०२१ : १,०००) समभाग प्रत्येकी रु. १००/– प्रमाणे	**१,०००.००**	**१,०००.००**
	एकूण	**१,०००.००**	**१,०००.००**

समभागांचा ताळमेळ : (रक्कम १००/– रुपयात)

तपशील	३१ मार्च २०२२		३१ मार्च २०२१	
	संख्या	रक्कम (रु.)	संख्या	रक्कम (रु.)
आरंभीचे शिलकी समभाग	**१,०००**	**१,०००.००**	**१,०००**	**१,०००.००**
